म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.

वृत्ति तिसरी

# 'केळकर'

## पुरवणी

केळकरांच्या मुलाखती, समारंभप्रसंगींचीं त्यांचीं व इतरांचीं
भाषणें, मानपत्रें, स्वतंत्र अंकांतील लेख व इतर
सत्कारसमारंभाच्या वृत्तान्तासह

REFBK-0004608

किंमत ८६.

आवृत्ति तिसरी

# 'केळकर'

## पुरवणी

केळकरांच्या मुलाखती, समारंभप्रसंगींचीं त्यांचीं व इतरांचीं
भाषणें, मानपत्रें, स्वतंत्र अंकांतील लेख व इतर
सत्कारसमारंभाच्या वृत्तान्तासह

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ४६०८
REFBK-0004608

किंमत ८६.

मुद्रकः—गणेश काशिनाथ गोखले,
सेक्रेटरी, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स,
४९५-४९६ शनवार पेठ, पुणें नं. २.

प्रकाशकः—लक्ष्मण बळवंत भोपटकर,
अध्यक्ष केळकर वाढदिवस-मंडळ, पुणें.

# अनुक्रमणिका.

## पुरवणी (९२)

### केळकर यांच्या मुलाखती ( ३४ )


‘ सकाळ ’ दैनिक, पुणें ... ... ७४५–७५६
‘ रत्नाकर ’ मासिक, पुणें ... ... ७५७–७६९
‘ प्रेक्षक ’ ... ... ७७०–७७१
‘ किर्लोस्कर ’ किर्लोस्करवाडी ... ... ७७१–७७५
‘ श्री लोकमान्य–साप्ताहिक–मुंबई ... ... ७७५–७७८


### सत्कारसमारंभ व मानपत्रें (४२)


‘केळकर’ ग्रंथ समर्पण–के. वाढदिवस मंडळ, पुणें ... ... ७७९–७९०
श्री. आण्णासाहेब भोपटकर भाषण ... ... ७७९–८१
लोकनायक मा. श्री. अणे ,, ... ... ७८१–८२
श्री. न. चिं. केळकर यांचें भाषण ... ... ७८२–८९
केळकर यांस आहेर व पुष्पहार समर्पण करणाऱ्या कांहीं संस्था व व्यक्तिउल्लेख ... ... ७८९–९०
केसरी मराठा संस्थेंतील हृदयस्पर्शी समारंभ केळकर यांचें भाषण ... ... ७९१–७९४
मुंबईतील हीरकमहोत्सव ... ... ७९५–७९८
साहित्यसंस्थांतर्फें मानपत्र ... ... ७९९–८०२
श्री महाराष्ट्र शारदामंदिरातर्फें सन्मान ... ... ८०२–८०४
भारत स्नेहसंवर्धक मंडळातर्फें सन्मान ... ... ८०५–८०७
अ. म. हिंदुधर्म मठातर्फें सन्मान ... ... ८०७
पुणें मराठी ग्रंथसंग्रहालय ,, ... ... ८०८
‘ रत्नाकर ’ कचेरींतील पानसुपारी ... ... ८०९
नाट्यसंशोधनमंडळातर्फें सन्मान ... ... ८०९–८१०
पुणें महाराष्ट्रीय मंडळातर्फें ,, ... ... ८११
पुण्यांतील बोहरी समाजातर्फें ,, ... ... ८११–८१२
पुणें शहर म्यु. पा. तर्फें पानसुपारी ... ... ८१३–८१४
सार्वजनिक सभेतर्फें देण्यांत आलेलें मानपत्र व सन्मान ... ८१५–८१७
नियतकालिकांचे केळकर अंक ... ... ८१८
सत्कार, समारंभ, मानपत्रें, पानसुपाऱ्या ... ... ८१८–८१९
ठिकठिकाणच्या जाहीरसभा ... ... ८१९–८२०

नियतकालिकांतील लेख—( १६ )

न. चिं. केळकर—ज्ञानप्रकाश ... ... ८२१–८२३
केळकरांचें मतस्वातंत्र्य—दि. ब. अ. वा. लट्ठे ... ... ८२३–८२४
केळकरांचें इतिहासांतील अढळस्थान—
डॉ. र. पु. परांजपे ... ... ८२४
स्वमताविषयीं प्रामाणिकपणा—गो. कृ. देवधर ... ... ८२४
केळकर व सुभाषबाबू—केसरी ... ... ८२५–८२६
तात्यासाहेबांच्या अखंड देशसेवेचें असाधारण
स्वरूप—केसरी—अग्र. ... ... ८२६–८२७
टिळक व केळकर—ग. वि. केतकर ... ... ८२७
राजकारणांतील केळकरांची समेटदृष्टी—बॅ. रा. मा.
देशमूख—उदय ... ... ८२८–८३१
केळकरांचा ग्रहयोग—श्री. रा. शं. राजवाडे ... ... ८३२
केळकरांनीं केलेलें टिळकांचें कार्य—श्री. ना. रा.
बामणगांवकर—सं. उदय ... ... ८३३
टिळकांचे ज्ञानी अनुयायी—श्री. के. ल. ओगले ... ... ८३४
न्यायदीप न. चिं. केळकर ‘ ऐक्य ’ सातारा ... ... ८३६

# केळकर वाढदिवस मंडळ, पुणें.

ता. २५।८।१९३२



उभे—२ श्री. द. बा. रानडे चिट०; ४ श्री. शं. ना. जोशी–मुख्य चिट०; ५ श्री. स. वि. बापट.
खुर्चीं—१ श्री. ग. वि. देवधर, २ श्री. धों. कृ. साठे, ३ श्री. **न. चिं. केळकर**, ४ **लोकनायक श्री. अणे**, ५ श्री. ल. ब. भोपटकर, ६ श्री. श्री. म. माटे, ७ श्री. अ. बा. फडणीस.

४६०८



# केळकर यांच्या मुलाखती

## [' सकाळ '-पुणें, ता. २२ ऑगस्ट १९३२]

तात्यासाहेबांची ही मुलाखत वाचतांना आज ५० वर्षांतील त्यांच्या मनोभूमीचा चित्रपट अगदीं जवळ बसून आपण पहात आहों असें वाटतें. प्रत्येक प्रश्नाचें उत्तर म्हणजे तात्यासाहेबांच्या आयुष्याचें एक दालन आहे असा भास होतो. मुलाखत संपली तरी वाचकाच्या विचारांची परंपरा संपत नाहीं.

प्रश्नः—आपलें बालपण मिरजेंत गेलें असूनहि आपण वकिली करण्यासाठीं साताऱ्यास आलां हें कसें ?

उत्तरः—माझा शिक्षणक्रम संपला त्या वेळीं वडील संस्थानच्या सेवेंतून निवृत्त झाले होते. थोरले बंधु बी. ए. होऊन सातारच्या सरकारी हायस्कुलांत शिक्षक होते. तेथेंच आमची सर्व मंडळी रहात होती; म्हणून साताऱ्यास आलों झालं !

प्र.:—शाळा अगर कॉलेज यांमध्यें असतांना कांहीं शिक्षकांच्या सहवासापासून आपल्याला विशेष फायदा झाला असें म्हणतां येईल का ?

उ.:—माझ्या स्वभावाची घडणच अशी आहे कीं, कोणाच्याही सहवासामुळें माझ्या मनावर पगडा बसूं शकत नाहीं. चांगलें आढळेल तें मी कोणापासूनहि घेतों. त्यामुळें, विशेष अशी छाप मजवर कोणत्याहि शिक्षकाची पडूं शकली नाहीं. कै. वासुदेवशास्त्री खरे हे मिरजेच्या शाळेंत माझे शिक्षक होते. त्यांचा माझा मात्र विशेष परिचय झाला व तो अखेरपर्यंत टिकला.

प्र.:—विद्यार्थीदशेंत अगर तदनंतर वाचिलेल्या कोणत्या ग्रंथांवर आपली विशेष भक्ति जडली ?

उ.:—आमच्या विद्यार्थीदशेंत ' मराठी गद्य ' फारसें उदयाला आलेंच नव्हतें. विष्णुशास्त्री चिपळूणकर व आगरकर यांखेरीज दुसरा नांव घेण्यासारखा लेखक त्यावेळीं कोणी नव्हताच. या दोघांचेहि लेख मी विद्यार्थीदशेंत आवडीनें वाचीत असें. त्यावेळीं माझें जुन्या मराठी काव्याचें वाचन बेताचेंच होतें. ज्ञानेश्वर, रामदास व मोरोपंत या कवींचा कांहीं भाग मी वाचिला होता.

प्र.:—आपल्या विशेष आवडीचे असे इंग्रजी ग्रंथकार कोणते ?

उ.:—मेकॉले, गोल्डस्मिथ्, इमर्सन् व गिबन् यांचे ग्रंथ माझ्या विशेष आवडीचे आहेत. त्यांतल्या त्यांत गिबन्‌बद्दल मला विशेष आदर वाटतो.

प्र.:—विद्यार्थीदशेंत असतां आपला विशेष लौकिक कशाबद्दल असे ?

उ.:—तसें म्हणाल तर मला केव्हांहि क्लास मिळाला नाहीं. परीक्षेंत नापास झालों नाहीं म्हणजे बस्स, असेंच माझें एकंदर धोरण असे. आमच्या ' अण्णा '-

( श्री. तात्यासाहेबांचे द्वितीय चिरंजीव ) प्रमाणें शरीरसंपदा कमावण्यासाठींहि मी विशेष झटलों नाहीं. तरी, हरतऱ्हेच्या खेळांत मी भाग घेत असें. स्नेह्यांमधलीं भांडणें तोडण्यासाठीं मध्यस्थी करण्याबद्दल मात्र माझा चांगलाच लौकिक असे.

प्र.:––लेखनव्यवसायांत नांव कमावितां येईल अशी कल्पना आपल्या मनांत केव्हां प्रादुर्भूत झाली ?

उ.:––बी. ए. च्या वर्गांत असतांना मला प्रथम असें वाटूं लागलें कीं, आपण भाषाशैली कमवावी व मराठी वाङ्मयांत नव्यानव्या धाटणी ( Forms ) आणाव्या.

प्र.:––म्हणजे, यापूर्वींच आपण कांहींतरी लिहिलें असावें.

उ.:––यापूर्वी मी कांहींच लिहिलें नव्हतें असें नाहीं; पण तें अगदींच फुटकळ !

प्र.:––मग आपलें पहिलें ‘ लिखाण ’ कोणतें ? तें आपण केव्हां लिहिलें ?

उ.:––Sheridan च्या The Rivals चें “ नवरदेवांची जोडगोळी ” हें रूपांतर मी १८९४ च्या डिसेंबरांत लिहिलें. एल्‌एल्. बी. ची परीक्षा देऊन साताऱ्यास आलों, रिकामाच होतों; घेतलें लिहायला व निकाल लागण्याच्या आंत संपवूनहि टाकिलें.

प्र.––आपण केसरी संस्थेंत दाखल झालां ते केवळ यदृच्छेनेंच असें पुष्कळ वेळां म्हटलें जातें तें खरें का ?

उ.––हो, तें सर्वस्वी खरें आहे. केसरीच्या अगर दुसऱ्या एखाद्या पत्राच्या संपादकमंडळांत शिरण्याचा मी कधीं प्रयत्न केला नव्हता. साताऱ्यास आल्यापासून एक गोष्ट मात्र मी करीत असें. मराठी व इंग्रजी–विशेषतः इंग्रजी निबंध लिहून, ते तेथील सुशिक्षित मंडळींच्या सभेंत वाचून दाखविण्याचा मी परिपाठ ठेविला होता. त्यावेळीं साताऱ्यास ‘बोधसुधाकर’ नांवाचें पत्र निघत असे त्यांत व कै. रा. ब. पारसनीस यांच्या ‘महाराष्ट्र-कोकिळां’त मी बरेच वेळां लिहीत असें.

प्र.––मग, अशा परिस्थितींत आपण केसरीकडे कसे काय वळलां ?

उ.––त्या वेळीं साताऱ्यास रानडे नांवाचे एक वकील होते. त्यांचा व टिळकांचा जुना स्नेह. १८९६ सालीं टिळकांचा व्याप वाढत चालला होता. त्यामुळें लॉ-क्लासचें काम जबाबदारीनें पाहील व मराठ्यांत लिहील असा एकादा मदतनीस टिळकांना हवा होता. सदर्न मराठ्याच्या गाडींतून प्रवास करीत असतां एकदां टिळकांची व रानड्यांची अचानक भेट झाली. गोष्टीवरून गोष्टी निघाल्या व आपल्याला काय तऱ्हेचा मनुष्य पाहिजे हें टिळकांनीं रानड्यांना स्पष्ट करून सांगितलें. रानडे यांनीं टिळकांना माझें नांव सुचविलें. पुढें टिळकांना भेटण्यासाठीं मी पुण्यास गेलों. टिळकांचें लॉ-क्लासमधील मदतनीस श्री. वाकनीस यांना या सर्व गोष्टींची कुणकुण कळतांच त्यांनीं तत्काळ राजिनामा पाठविला व माझ्या कल्पनेपेक्षांहि अधिक तांतडीनें मला टिळकांचा ‘ स्नेही व सहाय्यक ’ म्हणून पुण्यास यावें लागलें.

प्र.—आपण केसरींत आल्यानंतर, ती संस्था सोडण्याचा प्रसंग येतो कीं काय अशी भीति आपल्याला कधीं वाटूं लागली होती का ?

उ.—मी प्रथम मराठा पत्राचें संपादकत्व पत्करलें होतें. १९०५चे सुमारास लाला लजपतराय यांना एका इंग्रजी पत्राकरितां संपादकाची जरूर लागली. संपादक शक्यतर महाराष्ट्रीय असावा अशी लालाजींची तीव्र इच्छा. मी त्या जागीं जावें यासाठीं त्यांनीं ना. गोखले व टिळक या दोघांनाहि लिहिलें. पण, मी जावें असें टिळकांच्या मनांत नव्हतें; म्हणून शेवटीं तें तसेंच राहिलें.

प्र.—असा आणखी एकादा प्रसंग आपल्याला स्मरतो का ?

उ.—दुसरा प्रसंग १९०७च्या सुमारचा आहे. त्यावेळीं मी मराठ्याचा संपादक होतों. केसरीचे लेख ज्या त्वेषानें लिहिले जातात त्या त्वेषानें मराठ्याचे लेख लिहिले जात नाहींत असें माझ्याबद्दल गाऱ्हाणें सांगणारे कांहीं सहकारी होते. हीं गाऱ्हाणीं टिळकांच्या कानावर घालण्याचेहि प्रयत्न वारंवार होत. ही भुणभूण बरेच वेळां माझ्या कानावर आली तेव्हां मी देखील जरा कंटाळलोंच ! मी बळवंतरावांकडे राजीनामा पाठवून दिला. पण, मी संस्था सोडून जाणार ही कल्पना त्यांना अगदीं असह्य वाटली.

प्र.—हा विषय ओघानेंच आला आहे म्हणून एक प्रश्न विचारतों. आपला 'भारतसेवक समाजा'कडे ओढा होता असें कांहीं लोक समजतात तें खरें का ?

उ.—हा समज कसा उद्भवला व पसरला याचें मला नेहमीं आश्चर्य वाटतें. टिळकांच्याबद्दल जशी मला आदरबुद्धि वाटे तशीच गोखल्यांबद्दलही वाटे. यामुळें हा समज फैलावला असावा !

प्र.—सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटींत घेतलेला आपला एक फोटो आहे त्याची उपपत्ति काय ?

उ.—ठीक विचारलेंत ! नेव्हिन्सनूसाहेब हिंदुस्थानांत आले ते प्रथम कांहीं दिवस मुंबईस राहिले. पुण्यास येतांना त्यांनीं ओळखीचें पत्र ( Introductory letter ) आणलें तें टिळकांनाहि आणलें नाहीं व गोखल्यांनाहि आणिलें नाहीं; तें आणलें मला ! त्यामुळें मला त्यांच्याबरोबर चार ठिकाणीं जाणेंच होतें. ते व मी सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटींत गेलों असतां सर्वांचा फोटो घेण्यांत आला. याखेरीज त्या फोटोचा कांहीं अर्थ नाहीं.

प्र.—आपण आजवर इंग्रजी व मराठी लेख पुष्कळ लिहिले. सहज फटकावून टाकिलेले पण छान साधलेले असे कांहीं लेख आपल्या स्मरणांत असतीलच ?

उ.—असा एक इंग्रजी लेख माझ्या चांगल्या स्मरणांत आहे. महात्माजींवर १९२२ सालीं खटला झाला. त्या खटल्याची चौकशी अहमदाबादेस झाली तेव्हां मी तेथें हजर होतों. श्री. महादेव देसाई यांनीं या प्रसंगावर लेख लिहिण्याबद्दल अनेकांना सांगितलें; त्यांत मलाहि सांगितलें. कबूल केल्याप्रमाणें मी लेख धाडून दिला. इतर कित्येकांप्रमाणें मी गांधींचा ' भक्त ' नसूनहि गांधींवरील या

प्रसंगाचें मी इतकें मार्मिक व हृदयंगम वर्णन करूं शकलों यांबद्दल महादेवभाईंनीं आश्चर्य व्यक्त केलें.

प्र.:—असेच कांहीं मराठी लेख—

उ.:—पुष्कळ आहेत. ‘ बंडखोरीचा वाष्कळ आरोप ’ हा लेख असा आहे. दिल्ली दरबारावरील लेख व करवीरकर छत्रपतींच्या पत्रव्यवहाराबद्दलचे लेखहि असेच आहेत.

प्र.:—लिहिण्यासाठीं बैठक टिकवून बराच वेळ बसण्याचे प्रसंगहि आपल्या-वर पुष्कळ आले असतील ?

उ.:—टिळकचरित्र संपवून हातावेगळें करावें यासाठीं पांचगणीस जाऊन राहिलों तेव्हां मला बैठक मारून १२।१४ तास बसावें लागे. एक लेखक पुरा पडणार नाहीं हें आगाऊ ओळखून मी दोन लेखक बरोबर घेतले होते.

प्र.—केसरीचा मजकूर लिहितांना असाच एकादा प्रसंग आल्याचें आठवतें का ?

उ.—टिळकांच्या निधनानंतरचा केसरीचा अंक अशीच टेक मारून तयार केला. टिळक शनिवारीं रात्रीं मुंबईस वारले. मध्यरात्रीपासून पहाटेपर्यंत सरदार-गृहांत सारा आक्रांतच उडाला होता. पहाटे माझ्यापुढें मंगळवारचा केसरीचा अंक दिसूं लागला. कसाहि प्रसंग असला तरी केसरी वेळेवर निघालाच पाहिजे हें टिळकांचें अभंग व्रत चालविण्यासाठीं, रविवारीं सकाळच्या गाडीनें मी पुण्यास यावयास निघालों. गाडी पुणें स्टेशनांत आली तो दुपारचा १ वाजण्याचा सुमार झाला होता. श्रमामुळें असें झालें होतें कीं, घर केव्हां गांठतों; पण स्टेशनवर पहातों तों पुण्याच्या मंडळींची ही गर्दी! लोकमान्यांचें शव न घेतां पुण्यास आलांत कां हाच ज्याचा त्याचा प्रश्न! असेच परत जा व टिळकांचें प्रेत अंत्यसंस्कारांसाठीं पुण्यास आणा, हा प्रत्येकाचा आग्रह ! अशा परिस्थितींत कोणालाहि कठोर बोलणें शक्यच नव्हतें. होतां होतां तब्बल दोन तास गेले. शेवटीं, ना. बेळवी वगैरे स्नेह्यांना मुंबईस रवाना करण्याचें आश्वासन लोकांना दिलें, केसरीचा दिवस ढळूं नये म्हणून मी पुण्यास राहतों असें समजुतीनें सांगितलें, तेव्हां संध्याकाळीं चारच्या सुमारास स्टेशनांतून सुटलों. घरीं येऊन स्नानादि सर्व आटोपलें तों संध्याकाळ झाली. तीनचार रात्रींचें अलोचन जाग्रण, दिवसभराची दगदग, त्यामुळें जरा कलंडलों तों झोंपच लागली. सोमवार उजाडला ! तेव्हां दुसरेंतिसरें कांहीं केलें नाहीं, सरळ केसरीकचेरींत गेलों. मजकूर सांगावा, कंपॉझिटराकडे द्यावा, प्रुफ आलें कीं तें पहावें, अशा क्रमानें वीस कॉलम मजकूर सांगून तपासून संप-विला; दुसऱ्या दिवशींच्या अंकाची सारी सिद्धता झाली असें पाहून रात्रीं आठ वाजतां घरीं परत आलों.

प्र.—आपल्या वयाच्या इतर पुष्कळ गृहस्थांच्या मानानें आपली प्रकृति सुदृढ राहिली आहे. ह्या निकोप प्रकृतीचें रहस्य काय आहे ?

नोंद नं. ......



उ.—माझी प्रकृति सुदृढ राहिली आहे ही गोष्ट खरी; पण, त्यासाठीं मी कांहीं विशेष केलें असें मला आठवत नाहीं. मात्र सुदैवाची गोष्ट अशी कीं, कधींही डोकें दुखल्याचेंहि मला आठवत नाहीं. याचीं कारणेंच हुडकून काढावयाचीं तर मी असें म्हणेन कीं, नियमित राहणी, मनःसमाधान व वृत्तीची प्रसन्नता ( Eqanimity of mind ) यामुळेंच माझें आरोग्य टिकलें आहे.

प्र.—लोकमान्यांचें जसें सुपारीवांचून चालत नसे—

उ.—तसें माझ्या बाबतींत कांहीं नाहीं. जेवल्यावर रुचिपालट करण्यासाठीं थोडी सुपारी तोंडांत टाकितों इतकेंच; मध्यंतरीं एकदां असें वाटूं लागलें होतें कीं, आपल्याला तपकिरीची संवय जडणार. थोडे दिवस मी जवळ डबीहि बाळगीत असें; पण तपकीरहि लौकरच सुटली. असेंब्लीच्या बैठकींना जात असें तेव्हां थंडीच्या कडाक्यामुळें अगर शिष्टाचाराच्या प्रभावामुळें सिगारेटदेखील कधींकधीं ओढीत असें. पण, सिगारेटचें 'व्यसन' असें लागलें नाहीं. नर्मदा ओलांडून खालीं दक्षिणेकडे आलों म्हणजे मला कशाची आठवणहि होत नसे !

प्र.—आपली ईश्वरविषयक बुद्धि काय प्रकारची आहे ?

उ.—माझ्या ठिकाणीं ईश्वरविषयीं आस्तिक्यबुद्धि आहे. या सृष्टीचा कोणीतरी निर्माता आहे हें माझ्या बुद्धीला पटतें; पण, Personal God वर मात्र माझा विश्वास नाहीं. त्यामुळें, नवससायास अगर व्रतवैकल्यें यांच्या नादीं मी केव्हांच लागलों नाहीं.

प्र.—आपण दैववादी आहांत असें कांहीं लोक मानितात, तें खरें का ?

उ.—या बाबतींत माझी काय वृत्ति आहे हें एका शब्दांत सांगतां येणार नाहीं. विश्वांत अनंत परिमाणु असतात व त्या प्रत्येक परिमाणूंत कांहीं शक्ति असते. समाजाचें तसेंच आहे. दैववादी म्हणजे दैवावर विसंबून राहून प्रयत्नाला पारखा होणारा असा अर्थ मानिला तर मी दैववादी नाहीं. मी आपल्या परीनें जास्तींत जास्त प्रयत्न केल्याशिवाय रहाणार नाहीं. पण, माझ्यासारखेच इतर घटकहि प्रयत्न करीत असतात ह्याची मला नेहमीं जाणीव असते. इतर घटक मजपेक्षां अधिक प्रभावी ठरले तर मी त्यांचा प्रभाव मान्य करीन. याअर्थी मी दैववादी आहें. अशा तऱ्हेचा दैववाद माझ्या ठिकाणीं दृढावला आहे याचें कारण मला कांहीं प्रसंगीं आलेला अनुभव.

प्र.—यांपैकी कांहीं अनुभव सांगण्यासारखे आहेत का ?

उ.—मला कल्पनाहि नसतां मी केसरींत आलों हें नियतिप्रभावाचें एक उदाहरण. नाहींतर, मी साताऱ्यास वकिली करीत राहिलों असतों अगर जमखंडीसारख्या संस्थानांतील न्यायखात्यांत नोकरींत शिरलों असतों. दुसरें उदाहरण टिळकांच्या मृत्युपत्राचें. हजार भानगडी संभाळून टिळकानीं मृत्युपत्र लिहिलें हा पाहिला विलक्षण योगायोग ; लिहिलेलें मृत्युपत्र रद्द करण्याची बुद्धि त्यांना झाली नाहीं हा दुसरा योगायोग व सर्वांत विलक्षण योगायोग असा कीं, हें मृत्युपत्र

टिळकांच्या खाजगी कागदपत्रांत न राहतां तें बाबांच्या (केसरीचे मॅनेजर श्री. बाबासाहेब विद्वांस) जवळ राहिलें. या गोष्टी दैववशात् घडल्या नसत्या तर आज केसरी संस्था कोठें असती व तिचें काय झालें असतें याची कल्पना तुम्हाला येईलच.

प्र.--आपल्यावर कौटुंबिक दुःखाचे विशेष खडतर प्रसंग कोणते ओढवले ? अशा प्रसंगीं आपण आपलें सांत्वन कसें करून घेतलें ?

उ.—अशा प्रकारचा पाहिला प्रसंग म्हणजे माझ्या थोरल्या बंधूंच्या मृत्यूचा. १९०४ सालीं ते वारले तेव्हां त्यांचें वय अवघें ३४।३५ वर्षांचें होतें. त्यांचें मजकडे फार लक्ष असे. मी मोठें व्हावें अशी त्यांची फार प्रबळ इच्छा. मी. एल्‌-एल्‌. बी. कडे गेलों तो मुख्यतः त्यांच्याच प्रोत्साहनानें. मुलीवरील वैधव्याचा आघात हा दुसरा दारुण प्रसंग. मनुष्य हा परावलंबी आहे, नियतीपुढें त्याचा नाइलाज होतो या विचारानें अशा प्रसंगीं माझें सांत्वन झालें आहे. पण, हे प्रसंग टाळण्याचा आपल्याकडून होण्यासारखा कांहीं प्रयत्न व्हावयाचा राहिला तर मात्र नियतीला दोष देण्याला माझें मन धजणार नाहीं. अशा चुकीमुळें माझ्या मनाला कायमचा रुखरुख लागून राहील ! कांहीं केलें व कितीही काळ गेला तरी ही रुखरुख नाहींशी होणार नाहीं.

प्र.--आपण बी. ए. मध्यें असतांना मराठी लिहिण्याला कांहीं फॉर्म द्यावा असें आपल्याला वाटूं लागलें. आपली ही कल्पना थोडी खुलासेवार सांगाल तर बरें.

उ.--जें वाचलें असतां आनंददायक ठरेल असें कांहीं लिहावें इतकीच माझी कल्पना होती. जें लिहावयाचें तें भाषांतरित असो, रूपांतरित असो अगर स्वतंत्र असो, तें आनंददायक व्हावें अशी महत्त्वाकांक्षा माझ्या मनांत त्या वेळीं प्रादुर्भूत झाली.

प्र.—आपल्या लेखनामुळें मराठींतील निबंधरचनेला एक प्रकारचें वळण लागलें, नव्हे ?

उ.--हें लोकांनीं ठरवावयाचें आहे. पण एवढें बरीक खरें कीं, कोणत्याहि विषयावर लिहितांना त्या विषयाची समग्र माहिती गोळा करून त्या विषयाची साधकबाधक चर्चा करावी अशी मला मुळचीच आवड. त्यामुळें मी कांहीं लिहिलें तरी त्याला निबंधाचें स्वरूप सहज येतें. माझ्या पुष्कळशा व्याख्यानांचीं लिहिलेलीं टिपणें माझ्या संग्रहाला आहेत. त्यांचा कोणी विस्तार केला तर त्यांतून चांगले भरघोस निबंध तयार होतील असें मला वाटतें.

प्र.--या दृष्टीनें टिळकांच्या लेखनाचें कांहीं वैशिष्ट्य होतें का ?

उ.--टिळकांचें मन आवेशयुक्त असल्यामुळें त्यांचें वर्तमानपत्रांतलें बहुतेक लिहिणें Propagandist स्वरूपाचें असे. माझ्या वर्तमानपत्रांतल्या लिहिण्यालाहि निबंधाचा घाट येतो; टिळकांचें लिहिणें 'आर्टिकल' च्या स्वरूपाचें असे.

प्र.—केसरींत आपण कांहीं नवीन लेखनप्रकार सुरू केले का ?

उ.—'रजःकण' या नांवाचें सदर मी बरेच वर्षांपूर्वी सुरू केलें होतें. 'प्रासंगिक बोल' हें सदर १९२० च्या सुमारास सुरू झालें त्यालाहि माझी संमति होती. या सदरांत एकदोन कॉलम विनोदी, गमतीदार मजकूर देतां आला तर मला पाहिजे आहे. आणखीहि लेखनप्रकार सुचवितां येतील; पण ते सुरू केल्यावर त्यांची भरतीहि मीच करीन म्हटलें तर तें शक्य नाहीं.

प्र.—आपण नुक्ताच 'राज्यशास्त्र' म्हणून जो ग्रंथ लिहिला आहे त्यांतील भाषाशैली आपण मुद्दाम कमाविली का ? अलीकडे केसरींतहि मधून मधून अशी भाषा आढळते ?

उ.—कोणताहि गहन विषय सोप्या भाषेंत मांडतां येणें हें मनःपरिणतीचें लक्षण आहे. सायक्लिस्ट नवाशिका असला म्हणजे तो खूप जोरानें सायकल हाणतो; उलट, तोच तरबेज झाला म्हणजे असें ओळखतो कीं, धिमेपणानें सायकल चालविण्यांतच खरें कौशल्य आहे. असाच प्रकार माझ्याहि बाबतींत झाला. आरंभीं आरंभीं मी इंग्रजी वळणावर वाक्यांचीं बोजकीं बांधीत असें. अच्युतराव कोल्हटकरांना सोपें लिहिण्याची हातोटी जन्मसिद्धच होती.

प्र.—आपण केसरींत लिहूं लागलां तेव्हांचा काळ व आतांचा काळ यांतले वाचक अभिरुचीच्या दृष्टीनें कितपत भिन्न ठरतील ?

उ.—विविध प्रकारची माहिती मिळण्याविषयींची उत्सुकता आजच्या वाचकवर्गांत जितकी आहे तितकी पूर्वीं नव्हती. सामाजिक सुधारणेच्या प्रश्नांकडे आजचा वाचकवर्ग अधिक उदारपणानें पाहतो. अच्युतराव कोल्हटकरांनीं अखेरी अखेरीस सुरू केलेलें व विविधवृत्तकारांनीं चालविलेलें Yellow journalism हें देखील अगदीं अलीकडच्या अभिरुचीचेंच निदर्शक आहे.

प्र.—समाजाला पटत नसलेलीं सामाजिक मतें आपण केसरींतून अट्टहासानें कधीं मांडली का ?

उ.—पटेल बिलावरील वाद चालला असतां असा प्रकार घडला. बिलाच्या मूळच्या मसुद्यांत माझ्या मताप्रमाणें कांहीं दुरुस्ती हवी होती. सुधारक मंडळीनीं ती दुरुस्ती मान्य केल्यामुळें मी त्यांनीं बोलाविलेल्या जाहीरसभेंत हजर राहण्याचें व भाषण करण्याचें आश्वासन दिलें. कांहीं सनातनी स्नेह्यांना हें आवडलें नाहीं व मी सभेला जाऊं नये अशीहि गळ त्यांनीं घातली. मी सभेलाहि गेलों व आपलें मत केसरींतून प्रतिपादिलें. त्या वेळीं सार्वजनिक सभेंत एक खासगी सभा होऊन असा ठराव पास करण्यांत आला होता कीं, केसरीचें धोरण हें सनातनी हिंदूंचें धोरण नव्हे. त्यावेळीं किर्लोस्कर थिएटरांत झालेली सभा कशी उधळली व भर बुधवारांतून 'शेम् शेम्'च्या गर्जना ऐकत मला कसें यावें लागलें हें तुम्हांला स्मरत असेल ! त्यावेळीं तुम्ही कॉलेजांत असाल ? ( उ.—'शेम् शेम्' ओरडणारांतहि होतों ) ( हंशा )

प्र.—आपण खुद्द केसरींतच अशी दांडगाई केली हें टिळकांना कितपत रुचलें ?

उ.—त्यावेळीं तें नीटपणीं समजण्याला मार्ग नव्हता. पण, बसू बिलाच्या वादासंबंधीं पुढें एकदां टिळकांचें गजाननराव वैद्यांपाशीं सहज बोलणें झालें. मी आपली बाजू फार कौशल्यानें मांडली असें टिळकांनीं या प्रसंगीं आनंदानें कबूल केलें. टिळक व गजाननराव यांमधलें हें संभाषण मला कळण्याचें वास्तविक कारणहि नव्हतें; पण टिळकांच्या खाजगी भाषणांचेहि रिपोर्ट करणाऱ्या एका गृहस्थाकडून मला ही हकीगत सहज समजली.

प्र.—आपल्या बरोबरच ज्यांनीं लेखनव्यवसाय सुरू केला अगर या व्यवसायांत जीं मागाहून आलीं अशा कांहीं माणसांच्या बद्दलचीं Impressions सांगतां?

उ.—खाडिलकर व मी तर जवळजवळ समकालीनच. खाडिलकर माझ्या मागून चारसहा महिन्यांतच आले. खाडिलकरांची बुद्धिहि प्रखर व भाषाहि तिखट. नाटककार म्हणून त्यांनीं नांव कमाविलें तसें इतर वाङ्मयशाखांतहि त्यांना कमावितां आलें असतें. पण त्यांनीं तिकडे लक्षहि दिलें नाहीं व उद्योगहि केला नाहीं. शिवरामपंतांच्या औपरोधिक लिहिण्याची सर फार थोड्यांना येईल! माधवराव बोडसांचें लिहिणें चांगलें; ते उद्योगहि चांगला करीत; पण प्रत्येक गोष्टींत दोषच काढीत बसण्याच्या वृत्तीमुळें ते टिळकांना अप्रिय झाले. 'कोणतेंहि काम बिघडवावयाचें तर बोडसांना पाठवावें' असें टिळक म्हणतच असत. आमच्या तात्या करंदीकरांच्या लेखनकौशल्याचेंहि मला फार कौतुक वाटतें. क्वचित्प्रसंगीं ते क्लिष्ट लिहितात. तेवढा दोष वगळला तर त्यांचे लिहिणें बहुमोल असतें. पांडित्यप्रचुर लिहिण्यांत मला आतां तरी दोनच नावें एकदम आठवतात; एक नानासाहेब वैद्यांचें व दुसरें मुंबईच्या प्रो. काण्यांचें. आमच्या अण्णासाहेब भोपटकरांच्यांत विचाराचा व भाषेचा जोम (Vigour) आहे; पण धंद्याचा व्याप फार; त्यामुळें त्यांना आपलें लिहिणें घटीव बनवितां आलें नाहीं.

प्र.:—नव्यानव्या होतकरू लेखकांबद्दल आपल्याला काय वाटतें?

उ.:—अलीकडल्या नवीन लेखकांपैकीं पुष्कळांच्या लिहिण्याचा फॉर्म चांगला असतो. त्यामुळें अलीकडच्या लेखनांत विविधता (Variety) खूप वाढली आहे. पण, परिश्रमपूर्वक माहिती गोळा करून लिहिण्याची वृत्ति फारशी आढळत नाहीं. अभ्यास करण्याची वृत्ति वाढली पाहिजे.

प्र.:—आपल्या नाटकांत 'तोतयाचें बंड' सर्वोत्कृष्ट आहे असें मागें एकदां आपण व्याख्यानांत सांगितलें होतें, नव्हे?

उ.:—'तोतयाचें बंड' हें सर्वांगसुंदर आहे खरें; पण मी नवीन विशेष कांहीं केलें असेल तर तें चंद्रगुप्तांत. हें नाटक Romantic आहे असें मी मानितों. नाट्यवस्तुपरिपोषाच्या (Plot Develop-ment) दृष्टीनेंहि या नाटकांत नाविन्य आहे.

प्र.:—लोकमान्यांच्या चरित्रांतील कोणते भाग आपण विशेष तल्लीनपणानें लिहिले?

उ.:—सुरत कॉंग्रेसचा भाग असा आहे. चिरोल केसचें विवेचन व ताईमहाराज प्रकरण हीं दोन्हीं फार सरस उतरलीं आहेत असें मला वाटतें.

प्र.:—टिळकचरित्राच्या पहिल्या खंडाच्या मानानें पुढील खंड फिके पडले असें फार लोक म्हणतात हें आपल्याला माहीत असेलच ?

उ.:—टिळकचरित्राच्या उरलेल्या खंडांत टिळकांच्या गुणवर्णनपर असा जो भाग यावयाचा तो न आल्यामुळें हा आक्षेप उद्‌भवला आहे असें मला वाटतें. १९२० सालीं टिळक वारल्यानंतर पुढील सातआठ वर्षांत मला त्यांच्याबद्दल इतकें बोलावें व लिहावें लागलें कीं, १९२७ सालच्या सुमारास मला करतां येण्यासारखें सगळें गुणवर्णन करून झालें होतें. या सुमारासच आमच्या बापूनें ' लोकमान्यांचें पुण्यस्मरण ' या पुस्तकाच्या रूपानें हीं सर्व भाषणें व हे लेख प्रसिद्ध केले. मी १९२८ सालीं चरित्र लिहावयाला बसलों; तेव्हां मोठी पंचाईत आली. पुण्यस्मरणांत आलेला मजकूर तसाच्या तसा चरित्रांत घ्यावा तर तेंहि वाईट. न घेतला तर चरित्रांत गुणवर्णन नाहीं हें न्यून राहतें. ' लोकमान्यांचें पुण्यस्मरण ' व चरित्राचे खंड हीं सर्व एकमेकाला पूरक आहेत. अशा दृष्टीनें लोक टिळक-चरित्राकडे पाहतील तर त्यांना वैगुण्य आढळणार नाहीं. मला तर टिळकचरित्राबद्दल असा विश्वास वाटतो कीं, जसजसा काळ जाईल तसतसा तो ग्रंथ Standard समजला जाईल !

प्र.—टिळकांच्या मृत्यूपूर्वी अत्यंत संघटित दिसणारा महाराष्ट्रपक्ष त्यानंतर थोडक्याच दिवसांत विस्कळीत झाला याचीं कारणें कोणतीं ?

उ.—याचें एक कारण असें कीं, टिळकांच्या बद्दल पुष्कळांच्या मनांत जी विभूतिपूजेची भावना होती ती भावना त्यांनीं महात्मा गांधींकडे वळविली.

प्र.—एवढें म्हणून या विस्कळितपणाची समग्र मीमांसा होत नाहीं असें मला वाटतें.

उ.:—समग्र मीमांसाच करावयाची तर बरेंच खोलांत शिरावें लागेल. कोणताहि पक्ष बुद्धीच्या अधिष्ठानावर स्थिरावलेला असला म्हणजे त्याची पांगापांग लौकर होत नाहीं. १९१९ सालचा महाराष्ट्रपक्ष अशा अधिष्ठानावर स्थिरावलेला होता असें म्हणतां येत नाहीं. टिळकांच्या वैयक्तिक थोरवीवर भाळून या पक्षांत सामील झालेले लोक थोडके नव्हते. टिळकांच्या प्रभावळींत असल्यानें आपणही मोठे दिसतों म्हणूनहि या पक्षांत आलेले कांहीं लोक होते.

प्र.:—अशी स्थिती होती तर हा पक्ष एकसंघ दिसलाच नसता.

उ.:—आणि, खोल दृष्टीनें पाहाणारांना तो खरोखरच तसा दिसत नव्हता. शिवरामपंत परांजप्यांसारखे अगदीं भिन्न विचारसरणीचे लोक या पक्षांत होते हें विसरूं नका. टिळकांना विध्वंसक म्हणण्याची आपली हौस अनेक लोकांनीं आजवर भागवून घेतली आहे. पण त्यांच्या हें लक्षांत आलेलें नाहीं कीं, टिळक स्वराज्या-

वर विशेष भर देत तर परांजपे स्वातंत्र्यावर भर देत असत; टिळक स्वदेशीसाठीं तळमळत तर परांजपे बहिष्काराखेरीज भाषा बोलत नसत.

प्र.:—असे मूलभूत मतभेद असूनहि हा पक्ष इतके दिवस टिकला हेंच आश्चर्य समजावयाचें कीं काय ?

उ.:—त्यांतहि फारसें आश्चर्य मानण्याचें कारण नाहीं. टिळकांच्या पॉलिटिक्स-कडे स्थूलमानानें पाहिल्यास असें दिसेल कीं, टिळकांचें राजकारण हें निदान १९१९ पर्यंत तरी प्रायः अव्यक्त स्वरूपाचें होतें. पक्षांतल्या लोकांच्या पोटांतले मतभेद प्रगट व्हावयाचे तर राजकारण व्यक्त स्वरूपाचें (Politics of Details) असावें लागतें. अशा व्यक्त स्वरूपाच्या राजकारणाला कांग्रेस डेमोक्रॅटिक पार्टीच्या मॅनिफेस्टोनें नुकतीच सुरवात झाली होती. या मॅनिफेस्टोप्रमाणें कांहीं वर्षें काम करून सुधारणा राबवून जी पक्षसंघटना टिकली असती तीच पक्षसंघटना खरी टिकाऊ म्हणतां आली असती.

प्र.:—बुद्धियोगी महाराष्ट्र–पुढाऱ्यांना गांधींच्या श्रद्धायोगांत खरोखर काय वावगें दिसतें ?

उ.:—गांधी भलत्याच मुद्द्यांवर ( False issues ) लढा चालवितात व भलत्याच मुद्द्यांवर समेट करतात. गांधींचें Suffering चें अगर कायक्लेशाचें तत्त्वज्ञान उदात्त खरें, पण नुसत्या Suffering च्या आधारावर राजकीय पक्षांची टिकाऊ संघटना होऊं शकत नाहीं हें विसरून चालणार नाहीं.

प्र.:—गांधींच्या कार्यक्रमाव्यतिरिक्त एखादा कार्यक्रम कोणी आखिल्यास तो लोकांना पटेल का ?

उ.:—मला असें वाटत नाहीं. रान उठविण्याच्या गांधींच्या कार्यक्रमापुढें कोणताहि विधायक कार्यक्रम फिक्काच पडेल. आजच्या मितीस कोणतीही चळवळ करावयाची तर ती लोकांना आकर्षक वाटली पाहिजे, लोकांच्या कल्पनाशक्तीला दिपविण्याचें व लोकांना तुरुंगाच्या मार्गाला लावण्याचें सामर्थ्य ज्या चळवळींत नाहीं ती चळवळ आज लोकांना मान्य होणार नाहीं.

प्र.:—आपण तुरुंगांत न गेल्यामुळें बऱ्याच लोकांचा आपल्यावर घुस्सा आहे !

उ.:—होय, या बाबतींत लोकांचे व माझें भांडणच आहे. मी तुरुंगाला भीत नाहीं हें पूर्वी सिद्ध झालेलें आहे. पण आजच्या तुरुंगाचा कार्यक्रम माझ्या मतांशीं जुळत नाहीं. आपल्या मतांना भलतीच मुरड घालण्याची मला संवय असती तर गांधी व पं. नेहरू यांनीं १९२५ सालीं कांग्रेसचें अध्यक्षपद मला मिळूं नये अशी खटपट केली नसती. अगदीं आटोक्यांत आलेला हा स्पृहणीय सन्मान मी जाणूनबुजून दूर लोटला हें धैर्य तुरुंगांत जाण्याच्या धैर्याइतकेंच मोठें आहे असें मी समजतों. लोक तुरुंगांत जाण्याचें धैर्य दाखवितात; मी माझ्या मतासाठीं लोकांचा रोष सहन करण्याचें धैर्य दाखवितों असें म्हणाना हवें तर !

प्र.:---आपण राजकारणांतून अंग काढिलें आहे अशी लोकांची समजूत झाली आहे ती खरी आहे का ?

उ.:---कौन्सिलच्या राजकारणांतून मी अंग काढलें आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. दिल्ली सिमल्याची राहणी माझ्या प्रकृतीला मानवत नाहीं. असेंब्लींत छाप पाडण्यासाठीं जरूर असणारें जिनांचें नाटकी वक्तृत्व अगर इतर कित्येकांचें वारेमाप वक्तृत्व मला साधतहि नाहीं.

प्र.:---पण बाकीच्या राजकारणाबद्दल काय ?

उ.:— राजकारणाचा वारू सर्कशीच्या रिंगणांत भरधांव सुटला आहे. सर्कशींतला रिंगमास्तर जसा घोड्याला १।२ चकरा घेऊं देतो व संधि येतांच स्वारी करतो तसेंच करावें असें म्हणतों.

प्र.:---महाराष्ट्रांतील राजकारण अंगीं लागण्यास महाराष्ट्रीयांच्या अंगीं असलेले कोणते गुणावगुण जमेस धरले पाहिजेत असें आपणांस वाटतें ?

उ.:---महाराष्ट्रीयांच्या गुणांविषयीं म्हणाल, तर मतस्वातंत्र्य, चिकित्सक बुद्धि व व्यावहारिक दृष्टि हे गुण विशेष ठळकपणानें दृष्टीस पडतात. परंतु या गुणांच्या बरोबर एक अवगुणही महाराष्ट्रीयांत दृष्टीस पडतो, व तो केवळ राजकारणांत पडलेल्या लोकांतच दृष्टीस पडतो असें नाहीं तर तो पब्लिक सर्व्हिसेसमध्यें असलेल्या लोकांतही आढळतो. महाराष्ट्रीयांत जुळून घेण्याची वृत्ति फार कमी. त्यामुळें सहकार्य करून कामाचा उठाव होत नाहीं. ही वृत्ति मद्रासी लोकांत फारच दृष्टीस पडते. त्यामुळें ते सरकारी नोकरींत सर्वत्र दृष्टीस पडतात. कोणत्याहि बाबतींत ते तक्रार करावयाचे नाहींत. व म्हणून त्यांनीं महाराष्ट्रावर उडी मारून उत्तर हिंदुस्थान व्यापलें आहे. महाराष्ट्रांत जर ही सहकारितेनें कामें करण्याची बुद्धि उत्पन्न होईल व ती होईल असें वाटतें, तर महाराष्ट्रांतील राजकारण अंगीं लागेल. कारण महाराष्ट्रांत स्वतंत्रपणें विचार करण्याची शक्ति चांगली आहे. याचें एक गमक म्हणून सांगतों. सन १८९८ सालीं आम्ही लोकमान्य टिळकांबरोबर मद्रास काँग्रेसला गेलों होतों तेथें लोकमान्य टिळकांच्या दर्शनाकरितां एक मद्रासी ग्रॅजुएट स्टेशनवर आला व डब्यांत शिरला. त्यानें लोकमान्यांशीं इतर कांहीं बोलणें झाल्यावर असे उद्गार काढले कीं, "आपले पाय आमच्या इलाख्याला लागले, आतां आमच्या येथील प्लेग नाहींसा होईल." गाडी चालू झाल्यावर लोकमान्य म्हणाले कीं, "महाराष्ट्रीय ग्रॅजुएट असें कधींहि बोलणार नाहीं." महाराष्ट्रीयांचा त्याच्याबद्दल आदर कमी होता असें नाहीं. पण अशा प्रकारची अंधश्रद्धा खास सांपडणार नाहीं.

महाराष्ट्रांत बुद्धिमत्ता कमी आहे असेंही तुम्हांस सांपडणार नाहीं. व जों जों काळ जाईल, तों तों विचारसरणीच्या जुन्या चाकोऱ्या सुटून नव्या उत्पन्न होतील व भौतिक शास्त्रें, आधुनिक सुधारणा, इत्यादींतही महाराष्ट्रीय चांगले पुढें येतील. पण त्यांनीं आपल्या स्वतंत्र बुद्धीला थोडी थोडी मुरड घालून सहकार्यानें काम केलें पाहिजे.

प्र.—आजपर्यंत महाराष्ट्रांत सहकार्यानें कामें झालीं नाहींत काय ?

उ.—ज्या वेळीं सर्वांना वरचढ असा अद्वितीय पुरुष निर्माण होतो, त्यावेळीं हे वैयक्तिक भेद बाजूस पडतात, व क्षणभर लोपल्यासारखे होतात, व त्याच्या दडपणाखालीं सहकार्यानें काम चाललेलें दिसतें. परंतु अशी विभूति नाहींशी होतांच पुन्हां फुटीरपणा दिसूं लागतो. तथापि हा दोष टाळतां आल्यास महाराष्ट्राची कामगिरी निःसंशय भरीव प्रकारची होईल यांत शंका नाहीं. हा दुर्गुण आपल्या-प्रमाणें बंगाली लोकांतही थोडाफार दिसून येतो.

प्र.—आपल्या अगदीं आवडीच्या अशा एकाद्या धर्मग्रंथाचें नांव सांगाल काय ? आपण एकादा आचार अगदीं निष्ठेनें रोज पाळतां काय ?

उ.—खरें म्हणाल तर असें कांहीं सांगतां येणार नाहीं. मी हिंदू खरा, परंतु अमूक एका धर्मग्रंथांतील तत्त्वें मी मानतों असें म्हणणें बरोबर होणार नाहीं. निसर्गाच्या स्वरूपाचें व नियमांचें जें योग्य स्पष्टीकरण भौतिक शास्त्रांच्या पुराव्या-वरून माझ्या बुद्धीला वाटतें तेंच खरोखर मी ईश्वरस्वरूप मानतों. सृष्टिधर्मांचे स्वाभाविक परिणाम होतील ते आचारांत आणणें जितकें शक्य असेल तितके आणण्याचा मी प्रयत्न करतों. तथापि याचा अर्थ मी घरांतील कुलाचार सोडले आहेत असें मुळींच नाहीं. वडिलांचे श्राद्धपक्ष, श्रावणी इत्यादि नित्याचीं कर्में मनापासून करतों. अहो, कांहीं सुधारकांची गम्मत अशी पहा कीं, ते वडिलांचें श्राद्ध करीत नाहींत; त्यास हसतात. पण 'ॲनिव्हर्सरी' मात्र करतात ! मग त्यापेक्षां चांगलें श्राद्ध कां करीत नाहींत ? आमच्या घरांत वडिलांच्या वेळेपासून रामाचा उत्सव होत असतो. मी तो मोठ्या हौसेनें करीत आलों आहें व हे कुलाचार टिकवावे व चालवावे असें माझें मत आहे. मला समाजांत व कुटुंबांत राहावयाचें आहे व माझ्याबरोबर त्यांनाही पुढें न्यावयाचें आहे. यासाठीं जरूर त्या सर्व गोष्टी करणें मी अवश्य मानतों.

आतां नित्याच्या आचारासंबंधानें म्हणाल तर असें सांगतों कीं, मी रोज स्नान करतों व देवासमोर बसून गंध लावण्यापूर्वीं एक मिनिट कां होईना निर्ध्यान होण्याचा प्रयत्न करतों. रोज हें साधतेंच असें नाहीं. पण मनांत कोणताही विचार किंवा कल्पना न येऊं देतां किंवा मूर्तीचें ध्यान न करतां निर्ध्यान अवस्थेंत एकादें मिनिट गेलें तरी तें मला फार फायदेशीर वाटतें व नंतर देवाला चार फुलें वाहतों. हा आचार बहुतेक नियमानें पाळीत आलों आहे.

प्र.—आपण आपल्या आयुष्यांत स्वतःपुढें कांहीं ध्येयभूत असें वाक्य किंवा तत्त्व ठेविलें होतें काय ? असल्यास कोणतें ?

उ.—एकादें ध्येय डोळ्यापुढें ठेवून त्याप्रमाणें आपल्या आयुष्याची घडण बनवावयाची असें मीं कांहीं केलेलें नाहीं. परंतु याचा अर्थ मी बेछूट वागणारा आहें असें मात्र मुळींच नाहीं. करारी, ध्येयनिष्ठ लोकांबद्दल मला फार आदर वाटतो. तसेंच माझ्या लहानपणच्या विचारांत कालांतरानें फार फरक पडला असें

घडलें नाहीं. किंबहुना ज्यांच्या आयुष्यांत, आचारविचारांत फारच कमी फरक पडला अशीं जीं काय थोडीं माणसें असतील त्यांतला मी एक आहें असें मी म्हणेन.

प्र.—आपला फार वेळ घेतला, पण आतां एकच प्रश्न विचारून आवरतों. आपण आत्मचरित्र लिहीत आहां व त्याच्या फक्त ५०० प्रती काढणार आहां असें ऐकिलें तें खरें का ?

उ.—मी आत्मचरित्र लिहीत आहें हें खरें. प्रतींबद्दल तुम्हांला जें कळलें ती नुसती गप्प. हा ग्रंथ मी प्रसिद्ध मात्र केव्हां करीन हें सांगवत नाहीं. अगदीं अखेर-पर्यंत करूं नये असा इरादा आहे.

---

## [ 'रत्नाकर '-पुणें, ऑगस्ट १९३२ ]

प्र.—आपल्या आयुष्यास साठ वर्षें पूर्ण झालीं. गतायुष्याचें सिंहावलोकन करतांना आपल्या मनांत काय विचार येतात ?

उ.—माझ्या गतायुष्याबद्दल मला पूर्ण समाधान वाटतें. मला आतांपर्यंत जें करतां आलें त्याचा विचार करतां मी पूर्ण संतुष्ट आहें. किंबहुना मला असेंहि वाटतें कीं माझ्या अल्प कर्तृत्वशक्तीच्या मानानें मला पुष्कळच करतां आलें व माझ्या योग्यतेपेक्षां मला यशहि अधिक मिळालें. विशेषतः माझ्या समकालीनांच्या तुलनेनें विचार करतां मला तक्रारीस जागाच नाहीं. माझ्या बाबतींत सर्वच दृष्टीनें समाधान मानण्यासारखी स्थिति होती. एक तर माझी आवड व माझा व्यवसाय हीं जुळली होतीं. लहानपणापासून मला लेखन-वाचनाची फार हौस. केसरी ऑफिसमध्यें गेल्यामुळें मला मनमुराद लिहितां वाचतां आलें, आणि माझे विचार व माझीं मतें प्रदर्शित करायला अगदीं भरपूर वाव मिळाला. माझा असा कोणताही लेख नव्हता कीं, जो कधीं छापला गेला नाहीं असें कधीं झालेंच नाहीं. कवितांचेंही तसेंच. बाकी त्या मानानें मी बाहेर फारसें कुठें लिहिलेंच नाहीं जें लिहिलें तें लोकांनीं आग्रहपूर्वक मागून नेऊन छापलें.

प्र.—बरें पुढें !

उ.—दुसरे असें कीं, मला आयुष्यभर गृहसौख्य अगदीं पूर्णपणें मिळालें. एक दोन दुःखकारक गोष्टी घडल्या, नाहीं असें नाहीं; एक—मुलीवरील वैधव्याचा प्रसंग व दुसरा वडील बंधु नारायणराव यांचा मृत्यु—अशा गोष्टी दुर्दैवानें व्हायच्याच. परंतु एकंदरींत माझें हें आयुष्य अत्यंत सुखकारक गेलें असें म्हणायला कांहीं हरकत नाहीं. सांपत्तिक दृष्टीनें पहिलीं १८।१९ वर्षेंपर्यंत स्वार्थत्यागाचा चिमटा थोडा फार बसत होता, पण पुढील आयुष्यांत त्या दृष्टीनें तक्रार करण्यास फारशी जागा

राहिली नाहीं. पाहिल्यापासून माझा कटाक्ष असे कीं, कांहीं झालें तरी कर्ज म्हणून काढायचें नाहीं. त्यामुळें जमाखर्चांच्या दोन्ही तोंडांची मिळवणी करणें प्रारंभीं कठीण जात असे. तसा मी कांहीं छानछोकीच्या राहणीचा मनुष्य नाहीं. माझी राहणी अगदीं साधी आहे. तथापि तशाही स्थितींत प्रथम स्वार्थत्याग जाणवत असे. पण पुढें कांहीं तशी स्थिति राहिली नाहीं. त्यामुळें माझें आयुष्य एकंदरींत ' खाऊन पिऊन सुखी ' अशा प्रकारें गेलें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

प्र.—वाङ्मयलेखनांत आपणांस प्रारंभापासून आतांपर्यंत किती अर्थप्राप्ति झाली ?

उ.—वाङ्मयलेखनापासून मला आतांपर्यंत कमींत कमी ३०,००० रुपये मिळाले असें म्हणायला हरकत नाहीं.

प्र.—साधारणतः कोणत्या पुस्तकांबद्दल किती, तसेंच केव्हांपासून पैसे मिळायला सुरुवात झाली, स्फुट लेखनाबद्दल कांहीं मिळालें काय त्याची माहिती हवी.

उ.—साधारणपणें सन १९१२ पासून मला पुस्तकांपासून प्राप्ति व्हायला लागली. माझ्या कांहीं पुस्तकांच्या दोनदोन तीनतीन आवृत्त्या निघाल्या आहेत. तें सर्व धरून ठोकळमानानें असें म्हणतां येईल कीं, नाटकें, त्यांचे प्रयोगाचें हक्क व आवृत्त्यांचे हक्क मिळून दहाअकरा हजार; टिळकचरित्र मराठी हिंदी तेरा हजार व बाकीचीं पुस्तकें सहासात हजार. मी वेळोवेळीं मासिकांत वगैरे जें लिहिलें त्याबद्दल मी कधींच कांहीं मागितलें नाहीं. हौसेखातर लिहीत होतों व लोकही आग्रहपूर्वक स्नेहाखातर लेख मागत; त्यांत प्राप्तीचा भाग असा नव्हताच. जें काय मिळालें तें माझ्या पुस्तकांवरच मिळालें.

प्र.—आपण आतापर्यंत सार्वजनिक संस्थांना देणग्यांच्या रूपानें वगैरे किती वर्गण्या दिल्या ?

उ.—मी कसच्या देणग्या देणार ? मध्यम प्रतीनें लोकयात्रा करीत होतों इतकेंच काय तें. परंतु मी यथाशक्ति कांहीं कांहीं संस्थांना वेळोवेळीं देणग्या दिल्या आहेत. नक्की आठवत नाहीं. परंतु एकंदरीनें कमीतकमीं सुमारें चार हजार रुपये तरी देणग्या–वर्गण्या, म्हणून मी यापूर्वी दिले असतील. पण येत्या ता. २४ रोजीं मात्र कांहीं देणगी मनासारखी देणार आहें.

प्र.—टिळकांच्या सहवासापासून आपणास काय फायदा झाला ? किंवा त्यांच्या सान्निध्याचा आपणावर परिणाम काय झाला ?

उ.—साक्षात् टिळकांच्यापेक्षां त्यांच्या संस्थेमुळें मला निरनिराळ्या विषयांचा अभ्यास करण्याची संधि मिळाली हा मोठाच फायदा झाला. त्यानंतर ' मराठा ' पत्रांतील माझ्या लेखनामुळें मी परप्रांतांत प्रसिद्ध झालों. मी केसरींत व मराठ्यांत दोन्हीकडे लिहीत असल्यामुळें मला दुहेरी फायदा झाला. शिवाय जवळजवळ २० वर्षेंपर्यंत मी टिळकांचा राजकारणमंत्री (Political Secretary) असल्यासारखा होतों. त्यांना लागणारीं पत्रकें तयार करून देणें, पत्रें वगैरे लिहिणें लेख लिहिणें वगैरे अनेक कामें मी करीत असें. टिळकांचें बहुतेक राजकारण

७५९

इंग्रजीमधून चाले व त्या कामीं माझी त्यांना जरुरी नेहमीं लागे. त्यांचें माझे नेहमीं वादविवाद होत. मला नापसंत असणारी गोष्ट मी निर्भीडपणानें त्यांच्यापुढें कारणांसहित मांडीत असें. त्याला दुसरी बाजू असली तर ते सांगत व समजाऊन देत. माझी टीका पटली तर तेही फेरविचार करीत. इतकेंही करून जर मतभेद शिल्लकच राहिला तर जाणूनबुजून ते सांगतील त्याप्रमाणें मी करीत असें. असे प्रसंग वरच्चेवर येत. परंतु आमचे मतभेद कार्याच्या आड कधींच आले नाहींत. कारण त्यांना ठाऊक असे, कीं माझ्यामध्यें कपट नाहीं, ढोंग नाहीं, कारस्थानीपणा नाहीं. मी जें सांगेन तें प्रांजलबुद्धीचें व प्रामाणिकपणाचेंच असेल. ह्याबद्दल त्यांची पूर्ण खात्री असल्यामुळें नेहमीं ते मला मुद्दाम बोलावून कित्येक गोष्टींची चर्चा करीत व माझें मत घेत. इतकें माझ्या मताबद्दल त्यांचें सहानुभूतीचें—सहिष्णुतेचें धोरण असे. कित्येक प्रसंगीं त्यांच्या विरुद्ध असूनही माझ्याबद्दल त्यांनीं कधींही गैरसमज करून घेतल्याचें मला आठवत नाहीं. उदाहरणार्थ, सुरतेच्या कॉंग्रेसच्या वेळीं त्यांनीं अध्यक्षाबद्दलची जी उपसूचना आणिली त्याच्याबद्दल माझा मतभेद होता. त्यांनीं मला त्या उपसूचनेला अनुमोदन द्यायला सांगितलें; पण मी तें नाकारलें. त्यांना अर्थातच प्रथम फार राग आला. परंतु तें त्यांनीं मनावर घेतलें नाहीं. मी माझीं मतें विचारपूर्वक बनविलेलीं असतात हें त्यांना माहीत होतें व म्हणूनच त्यांचा गैरसमज झाला नाहीं.

टिळकांपासून मी जर कांहीं शिकलों असेन तर त्यांची सारासारविचारपद्धति ( Judgement ) त्यांच्याशीं अनेक वेळां चर्चा करण्याचा प्रसंग येत असल्यामुळें अमुक एका गोष्टीचा सर्वांगीण विचार ते कसा करीत हें माझ्या नित्याच्या परिचयाचें होतें. टिळक लोकांना वाटतात तसे आत्यंतिक ध्येयवादी ( Rank Idealist ) नव्हते. त्यांची देशभक्ति अत्यंत उज्ज्वल होती व त्या श्रेष्ठ भूमिकेवरून भाषण करतांना किंवा लिहितांना लोकांना ते अंतिम ध्येयवादी वाटत; परंतु प्रत्यक्ष राजकारणांत पक्के व्यावहारिक असत व लोकांच्या गरजा लक्षांत घेऊन लोकांच्या पुढें चारदोन पावलेंच जाऊन ते सरकाराकडून राजकीय हक्कांची मागणी करीत. शिवाय त्यांची धडाडी विलक्षण होती. सरकारवर छाप कशी पाडावी, धाक कसा घालावा याबद्दलची त्यांची हातोटी अप्रतिम होती. ध्येयवादी राजकारणी पुरुषापेक्षां ते व्यवहारचतुर राजकारणीच अधिक होते. फार दूरवरच्या अज्ञात भविष्यकाळांत काय पाहिजे याविषयीं वितंडवाद माजवीत बसण्यापेक्षां उद्यां काय पाहिजे हें ते चट्कन् बोलत व त्यामुळें सरकार त्यांना भीत असे. सरकारला नेहमींच व्यावहारिक राजकारणी प्रतिपक्षी नको असतो. कारण तो काय मागतो तें लोकांना चट्कन् कळतें व पटतें आणि सरकारला तर तें द्यायचें नसतें. परंतु लोकक्षोभाच्या भीतीनें कांहीं ना कांहीं तरी त्यांना द्यावेंच लागतें. टिळकांची ही जी राजकारणविषयक व्यावहारिक दृष्टि ती मी त्यांच्यापासून शिकलों.

अर्थात् त्यांनीं जीं साधनें निर्माण केलीं त्यांचा मात्र मला पुष्कळच उपयोग झाला यांत शंका नाहीं.

## धर्म व सामाजिक सुधारणा

प्र.——आतां मी कांहीं सामाजिक प्रश्न विचारतों. सामाजिक सुधारणेचा प्रश्न निघाला कीं, त्यांत स्त्रियांसंबंधींच्या प्रश्नांना आद्यस्थान दिलें पाहिजे. त्यांचे जे कित्येक प्रश्न आहेत त्यांसंबंधीं आपलीं मतें काय आहेत ?

उ.——खरें सांगूं ? स्त्रियांच्या शिक्षणामुळें त्यांचे सर्व प्रश्न आतां सुटण्याच्या मार्गास लागले आहेत. त्यांना आतां मताधिकार व प्रतिनिधित्व मिळाल्यामुळें तर त्यांच्या अडचणी मांडण्यास त्यांना पूर्ण संधि मिळाली आहे व लोकही त्यांचें म्हणणें आदरानें ऐकून घेतील अशी स्थिति आहे.


प्र.—स्त्रियांना द्यावयाच्या शिक्षणाचें उद्दिष्ट काय असावें, याबद्दल अजूनहि मोठाच मतभेद आहे. सुसंस्कृततेबरोबरच त्या सुगृहिणी, सुमाता व्हाव्यात अशा प्रकारचेंच शिक्षण त्यांना योग्य आहे असें म्हणणारा एक पक्ष आहे, तर कांहीं पुरुष घेतात तसेंच शिक्षण त्यांनीं घ्यावें असेंही म्हणणारा पक्ष आहे. आपलें त्यासंबंधीं काय म्हणणें आहे ?

उ.—दोन्ही तऱ्हेचें शिक्षण पाहिजे असें मला वाटतें. ज्यांच्या त्यांच्या कर्तृत्वाप्रमाणें व जीवनांतील ध्येयाप्रमाणें शिक्षण घेण्याचा हक्कच आहे. कौटुंबिक सुख हेंच ज्यांचें ध्येय व कार्यक्षेत्र आहे त्यांना कर्वे युनिव्हर्सिटीचा शिक्षणक्रमच योग्य वाटणार. परंतु ज्यांना स्वावलंबनाचा मार्ग पत्करून अविवाहित राहून युरोपांतलें शिक्षण घेऊन नोकरी करून कांहीं कार्य करावयाचें असेल त्यांनीं मुंबई विद्यापीठाचा अभ्यासक्रम घेण्यास हरकत कोणती ?

प्र.—सहशिक्षणाबद्दल आपलें काय म्हणणें आहे ?

उ.—मुद्दाम सहशिक्षण ठेवावें असें कोणी म्हणेलसें वाटत नाहीं. आजचें सहशिक्षण परिस्थितीनें बळजबरी चालविल्यामुळें होत आहे. इतके दिवस हायस्कूलचें शिक्षण एकत्र घेणें भाग पडत होतें. परंतु आतां मुलींकरितां स्वतंत्र हायस्कुलें ज्या शहराच्या ठिकाणीं झालीं त्यांत माध्यमिक शिक्षण एकत्र देण्याची आवश्यकता राहिली नाहीं. आज कॉलेजमध्यें सहशिक्षण द्यावें लागत आहे याचें कारण स्त्रियांकरितां उच्च शिक्षणाच्या स्वतंत्र संस्था नाहींत. नाहींतर मुद्दाम पुरुषांच्या संस्थांत जाणें मुलींना आवडेल असें नाहीं. इंग्लंडमध्यें अशीच स्थिति होती. आतां त्यांच्याकडेही स्त्रियांच्या पुष्कळशा स्वतंत्र शिक्षणसंस्था झाल्यामुळें ‘ मुद्दाम होऊन ’ सहशिक्षण घेण्याच्या भानगडींत कोणी पडत नाहीं. मी इंग्लंडमध्यें असतांना अशा संस्था पाहिल्या आहेत. आज सहशिक्षणाचा जो पुरस्कार केला जातो तो ‘ विरोधाची प्रतिक्रिया ’ किंवा ‘ आहे त्याचें समर्थन ’ अशा भावनेनेंच होत आहे असें मला वाटतें.

केळकर यांच्या ६१ व्या वाढदिवशीं समर्पिलेल्या कांहीं वस्तू.



प्र.—एकंदरींत आमच्या समाजाची घडी विसकटत चालली असून त्याची पुनर्घटना व्हावयास पाहिजे असें आपणांस वाटत नाहीं काय ?

उ.—समाजाची सध्यांची स्थिति झपाट्यानें पालटत आहे यांत शंका नाहीं. त्याला शिक्षण व आर्थिक परिस्थिति हें मोठें प्रभावी कारण आहे. आज शिक्षणाकडे स्त्रिया काय अगर पुरुष काय एक प्रकारच्या ध्येयभूत हेतूच्या भावनेनें पहातात. तो एक उपकारक व प्राप्त करून घेण्यासारखा गुण व अलंकार असून त्यापासून आपली संस्कृति वाढते व उपजीविकेचें साधन म्हणून त्याचा आपल्याला उपयोग होतो अशीच सर्वांची भावना आहे.

आज जर सुधारणांची प्रवृत्ति पाहिली तर कुटुंबांमध्यें संयुक्त कुटुंबांतून विभक्त कुटुंबांकडे व आर्थिक जीवनांत व्यक्तिस्वातंत्र्य व स्वावलंबन यांकडे आहे; आणि सध्यांच्या समाजस्थितींत तें जरूरही आहे. आर्थिक स्वावलंबनामुळें व्यक्तीमधील स्वाभिमानहि थोडाफार वाढूं लागला आहे. शैक्षणिक व आर्थिक अशा दोन प्रचंड शक्तींचा परिणाम एकंदर समाजस्थितीवर होऊन राहिला आहे. आजचें विचार-उच्चार-आचार-स्वातंत्र्य हाही शिक्षणाचाच परिणाम म्हटला पाहिजे. यापुढें समाजसुधारणा ही कांहीं कांहीं ठळक ठळक तत्त्वांना अनुसरून होणार असा रंग दिसतो.

प्र.—आजकालच्या तरुणांमध्यें जो एक प्रकारचा बेबंदपणा आढळतो, किंवा जातपाततोडकसारख्या किंवा समाजस्वास्थ्यासारख्या ज्या संस्था प्रचार करतात तो हानिकारक आहे असें आपणांस नाहीं का वाटत ?

उ.—त्याचें असें आहे कीं, समाजाच्या स्थितीमध्यें ज्या उणिवा किंवा ज्या दुष्ट रूढि असतात त्यांची प्रतिक्रिया म्हणून अशा एकांतिक गोष्टी घडत असतात. कोणत्याही टोंकाला गेलेली एकांतिक गोष्ट ही सारखीच त्याज्य व निषेधार्ह होय. समाजाची सुधारणा होण्यास प्रतिक्रिया ही पाहिजेच. परंतु ती योग्य मर्यादेच्या आंत असली पाहिजे व ज्या विशिष्ट उणिवा अगर दुष्ट रूढि असतील त्यांच्याच विरुद्ध पाहिजे तरच योग्य सुधारणा होईल. या मर्यादा कोणत्या व सदभिरुचि म्हणजे काय हें ज्याचें त्यानेंच ठरवावयाचें आहे. हा ज्याच्या त्याच्या वैयक्तिक समीकरणाचा प्रश्न आहे. नुसत्या मताला कांहीं किंमत नाहीं.

प्र.—धर्माच्या बाबतींतसुद्धां पुनर्घटना होणें जरूर आहे असें नव्हे काय ?

उ.—काळाच्या ओघाबरोबर तें होतच आहे. हल्लीं काय झालें आहे कीं, पूर्वी जी आप्तप्रामाण्य, ग्रंथप्रामाण्य वगैरे बाबतींत प्रामाण्यबुद्धि होती ती ज्ञानाच्या प्रगतीमुळें नष्ट झाली आहे. परंपरागत धर्माधिकार आतां कोणी जुमानीत नाहीं. तरी पण योग्य प्रकारची धर्मभावना (Proper Perception of Religion) कायमच आहे. उलट भौतिकशास्त्रांच्या प्रगतीमुळें धर्मभावना वाढतच चालली आहे. लोक अधार्मिक होत आहेत असें वाटत नाहीं. फक्त ही धर्मबुद्धि कांहीं वेगळ्या

प्रकारची आहे इतकेंच. पूर्वीचें कर्मकांड ( Ritualism ) मात्र बदललें. नास्तिकवाद कांहीं बळावत नाहीं, तर उलट आस्तिकांची संख्याच वाढत आहे असें मला वाटतें. अर्थात् अमुक एक वर्ग कितपत धर्मप्रवृत्त आहे अगर नाहीं हा प्रश्न केव्हांहि राहीलच; परंतु एकंदरींत धर्मबुद्धीचा ऱ्हास होत चालला आहे असें मला वाटत नाहीं. फक्त स्वरूप बदललें इतकेंच कायतें.

प्र.—आपलें ' थिऑसफिस्ट ' संबंधानें काय मत आहे ? आपण स्वतः कधीं थिऑसफिस्ट झालां होतां काय ?

उ.—मी कधींच थिऑसफिस्ट झालों नाहीं. थिऑसफीबद्दल माझें चांगलें मत आहे. थिऑसफीनें हिंदुधर्माला फार मोठी मदत केली आहे. परक्या लोकांनीं आमच्या धर्मावर, चालीरीतींवर व संस्कृतीवर जे आक्षेप घेतले होते त्यांना त्यांच्या जातिबांधवांकडून परस्परच उत्तरें मिळत गेलीं व त्यामुळें हिंदु-धर्माविषयीं चांगल्या कल्पना पाश्चात्य लोकांत प्रसृत होण्यास मदत झाली. या दृष्टीनें हिंदु लोकांना तो पंथ पसंत पडला. बरें, त्यांत कांहीं नवीन होतें असें नाहीं. कांहीं स्वतंत्र असें धर्मखातें किंवा धर्ममतें त्यांनीं निर्माण केलीं असें नाहीं. त्यांचें ध्येयच हिंदूचा चांगला हिंदु, मुसलमानाचा चांगला मुसलमान,खिस्त्याचा चांगला खिस्ती करण्याचें होतें. त्यामुळें विरोधाचें कारणच नाहीं. उलट त्यांनीं निरनिराळ्या धर्ममतांबद्दल एकप्रकारचें सहिष्णुतेचें वातावरण निर्माण करण्यास मदत केली आहे.

प्र.—हिंदुधर्माविषयीं अभिमान बाळगून जगभर त्याचा प्रसार व्हावा असा आपण प्रयत्न करणें जरूर आहे असें आपणांस वाटत नाहीं काय ?

उ.—खरें सांगूं ? मी एकांतिक अभिमान कशाचाच धरीत नाहीं. मी हिंदु कुटुंबांत जन्मलों म्हणून हिंदुधर्माचा अभिमान धरायचा हें ठीक; पण मुसलमान कुटुंबांत जन्मलों असतों तर मुसलमानधर्माचा धरला असता. खिस्ती कुटुंबांत जन्मतों तर खिस्तीधर्माचा धरला असता. हें स्वाभाविक नव्हे काय ? अमुक एका धर्माचा अभिमान एका विशिष्ट मर्यादेपलीकडे जातां कामा नये. अभिमान धरा-यचा असेल तर तो प्रत्येक धर्मातील बुद्धीला पटणाऱ्या अशा ज्या गोष्टी असतील त्यांचाच धरला पाहिजे.

प्र.—आज आधिभौतिक सुखाच्या मागें लागलेल्या जगाला आध्यात्मिक ज्ञानाची तळमळ लागली आहे व तें ज्ञान एक हिंदुधर्मच देऊं शकेल असें असल्यानें स्वामी विवेकानंदांप्रमाणें त्याचा जागतिक प्रसार होणें जरूर नाहीं काय ?

उ.—हिंदुधर्माचा परदेशांत प्रसार होण्यांत धार्मिक फायद्यापेक्षां ऐहिक फायदा अधिक आहे असें मला वाटतें. विवेकानंदांच्या प्रचाराला राष्ट्रीय दृष्टीनें मी किंमत देतों. पाश्चात्य जगामध्यें त्यांनीं आपल्या धर्मप्रचारानें हिंदुस्थानची प्रतिष्ठा वाढविली हा राष्ट्रीयदृष्ट्या मोठा फायदा झाला यांत शंका नाहीं व त्याच दृष्टीनें त्याचें महत्त्व आहे. धार्मिक उन्नति ही ज्याची त्यानेंच आपआपल्या मगदुराप्रमाणें करावयाची

४६०८

असल्यानें त्याला इतरांकडून प्रोत्साहनापलीकडे फारशी मदत होणार नाहीं. म्हणून विवेकानंदांच्या कामगिरीकडे आध्यात्मिक कामगिरीच्या दृष्टीनें मी पहात नाहीं.

## टिळक-सोसायटीची आवश्यकता

प्र.—महाराष्ट्रांत टिळकपक्षाचें सार्वजनिक कार्य करणारे लोक तयार करण्याकरितां एखादी ‘ टिळक-सोसायटी ’ काढणें जरूर नाहीं काय ? आपण त्यासंबंधीं काय करायचें योजिलें आहे ?

उ.—गोखल्यांच्या सर्व्हंट्स् ऑफ् इंडिया सोसायटीसारखी संस्था, कीं जिला कांहीं लोकांनीं विशिष्ट अटी कबूल करून कायमचें वाहून घेतलें आहे अशी एकादी संस्था टिळकांच्या नांवानें काढावी असें मला वाटत नाहीं. अशा तऱ्हेच्या संस्थेच्या मी विरुद्ध आहें आणि टिळकही विरुद्धच होते. याचें एक कारण असें कीं, अगोदर टिळकांच्या जवळ अशी एखादी संस्था चालवायला पुरेसे पैसेच कधीं नव्हते. गोखल्यांना जसे बाहेरून पैसे मिळाले तसे टिळकांना मिळूं शकले नाहींत. पहिला मोठा फंड सन १९१६ सालचा, एक लाख रुपयांचा मी जमविला; तो चिरोल केसकरितां खर्च झाला. पुढें जुबिली फंडाचेही पैसे त्यांचेजवळ राहिले नाहींत; कर्जाच्या कामीं लागले. होमरूल लीगच्या प्रचाराकरितां होमरूलचा फंड लागला. सारांश, निर्वेधपणें याच कामाकरितां खर्च करतां येतील इतका पैसा टिळकांच्या हयातींत त्यांचेजवळ जमलाच नाहीं. अशा संस्थांना खरें पाहिलें तर चांगलें १०–१५ लाख रुपये पाहिजेत. तेव्हां त्यांच्या बुडाशीं असलेली कल्पना यशस्वी होईल, त्याशिवाय नाहीं.

पण टिळकांच्या हयातींतच त्यांना अशी संस्था काढण्याबद्दल पुष्कळांनीं सुचविलें. त्यांना टिळकांनीं जें उत्तर दिलें तेंच मलाहि मान्य आहे. एक तर शपथ घेऊन एकाद्या संस्थेला कायमचें बांधून घेण्यानें काम योग्य प्रकारें होईल अशी त्यांची कल्पना नव्हती. प्रथम प्रथम जेसुइट पंथाच्या रचनेबद्दल व कार्यपद्धतीबद्दल त्यांना फार आदर वाटत असे व त्या धर्तीवर महाराष्ट्रांत कार्य व्हावें असें त्यांना वाटत होतें. परंतु या बाबतींत त्यांना जो प्रत्यक्ष अनुभव डेक्कन एज्युकेशन सोसायटींत असतांना आला त्यावरून त्यांचीं यासंबंधींचीं मतें पुढें बदललीं. कायम वाहून घेण्यानें लग्नाच्या बायकोसारखी स्थिति होते. एकदां लग्न झालें, कीं त्या नवऱ्याशीं बायकोला व त्या बायकोशीं नवऱ्याला कसल्याहि परिस्थितींत संसार करावाच लागतो. घटस्फोट शक्य होत नाहीं. त्यांत दोघांनाही शेवटीं वाईटपणाच पदरीं घ्यावा लागतो. त्यापेक्षां कार्यानिमित्त स्वखुषीनें होणारें सहकार्य अधिक इष्ट. वरील प्रकारांत एखाद्या मनुष्याचें व आपलें पटलें नाहीं तर त्याला काढणें जिवावर येतें. कारण त्यानें स्वार्थत्याग केलेला असतो व कष्टहि सोसलेले असतात; बरें, ठेवावा तर कार्य सुरळीत चालत नाहीं. म्हणून अनुभवान्तीं ही कायमचें वाहून घेण्याची योजना मला त्याज्य वाटते. दुसरी पद्धत बिनधोक्याची

आहे. एकमेकांचें जमतें तोंपर्यंत सहकार्य; नाहीं त्या दिवशीं एकमेकांना आपला स्वतंत्र मार्ग मोकळाच आहे.

## विलायतेंतील चळवळ

प्र.—आपण विलायतेंत होतां त्या वेळीं मजूर पुढाऱ्यांच्या व आपल्या ओळखी झाल्या असतीलच. मॅकडोनॅल्डची व आपली ओळख झाली होती काय ?

उ.—आम्ही विलायतेंत असतांना ज्या गोष्टी केल्या त्यांची साग्र हकीगत माझ्या 'विलायतचीं वातमीपत्रें' या पुस्तकांत येऊन गेलीच आहे. तेथें असतांना विशेषतः मजूर पुढाऱ्यांपैकीं कर्नल वेजवुड व बेनस्पूर यांचा व आमचा विशेष परिचय होता. मला वाटतें, त्या वेळीं मॅक्डोनॅल्ड हा कांहीं विशेष प्रसिद्ध नव्हता. त्याची व माझी गांठ विलायतेंत पडली नव्हती. परंतु तो जेव्हां हिंदुस्थानांत आला होता तेव्हां खडकीच्या स्टेशनवर मी त्याला भेटायला गेलों होतों.

प्र.—विलायतेंत आपण असतांना तेथील चळवळीसंबंधानें अडचणी वगैरे काय आल्या त्याची थोडक्यांत हकीगत सांगितली तर बरें होईल.

उ.—विलायतेंत आम्हांला दोन मोठ्या अडचणी येत. पहिली आमचा प्रचार लेखरूपानें होण्यास खूपच अडचणी येत; व दुसरी अशी कीं, सभा भरविणें कठीण पडत असे. लो० टिळकांनीं मजूरपक्षाच्या ' डेली हेरल्ड ' ला तीस हजार रुपये देऊनही त्यांत हमखास आमचे लेख येतील असें सांगतां येत नसे. तिकडील वर्तमानपत्रांचे स्वतंत्र तट आहेत, धोरणें आहेत. त्यांच्या व्यतिरिक्त, त्यांच्या धोरणास जुळणार नाहींत असे लेख त्यांत प्रसिद्ध होणें ही गोष्ट अशक्य.

प्र.—आपल्याला तेथें कसलें काम विशेषतः करावें लागत असे ?

उ.—' इंडिया ' मधील आर्टिकल्सपैकीं कधीं मिस् नॉरमॅन्टन् ही लिही, कधीं मी लिहीत असें. मला विशेषतः जॉइंट पार्लमेन्टरी कमिटीपुढील साक्षी ऐकून ती चर्चा ' इंडिया ' पत्राकरितां तयार करण्याचें काम करावें लागत असे. तेथें असतांना मी ठिकठिकाणीं कांहीं व्याख्यानेंही दिलीं होतीं. पण माझ्यावर पत्राचीच जबाबदारी विशेष असल्यानें मला लंडन सोडून फारसें कुठें जातां येत नसे. फावल्या वेळांत मी पार्लमेंटमध्यें जाऊन तेथील मुत्सद्द्यांचीं भाषणें ऐकत असें. अशाच एका प्रसंगीं अर्ल ' ग्रे ' चें एक सुंदर भाषण मला मिळालें होतें. लॉईड जॉर्जचेंही भाषण मी ऐकलें आहे.

प्र.—परदेशांत व विशेषतः इंग्लंडांत हिंदुस्थानाबद्दल राजकीयदृष्ट्या प्रचार चालू रहावा असें आपणांस अजूनही वाटतें काय ?

उ.—हिंदुस्थानाला जिकडून मिळेल तिकडून सहानुभूति पाहिजेच आहे. परदेशांतील प्रचाराचा इंग्लंडवर नैतिक वजन पाडण्याचे कामीं फार उपयोग आहे. खुद्द इंग्लंडांत हिंदुस्थानांतील परिस्थितीची यथार्थ कल्पना करून दिली गेली पाहिजे. आम्ही एवढ्याचकरितां कॉंग्रेसनें ही चळवळ चालू ठेवावी, ब्रिटिश

इंडियन काँग्रेस कामिटी मोडून टाकूं नये, असें वेळोवेळीं सांगत आलों; पण त्याचा उपयोग झाला नाहीं आणि काँग्रेसनें अखेर ती मोडून टाकली व तिच्या-बरोबर तिचें मुखपत्र ' इंडिया ' हि बंद पडलें.

प्र.—महाराष्ट्राच्या वतीनें आपण हें कार्य थोड्या फार प्रमाणांत कां चालू ठेवूं नये ?

उ.—हा सारा पैशाचा प्रश्न आहे. विलायतेंत एक मनुष्य ठेवावयाचा म्हणजे दरसाल कमींत कमी पांच हजार रुपये पाहिजेत. शिवाय तेथील प्रचाराला व इतर प्रत्यक्ष कार्याला काय लागेल तें निराळेंच. इतके पैसे कोठून आणायचे ? सध्यां आम्ही तिथल्याच कोणाला तरी हें काम सांगतों व मराठ्यांत आणि केसरींत त्याचें बातमीपत्र अगर त्याचा सारांश छापतों; पण आम्हाला असा मनुष्य स्वतंत्र रीतीनें ठेवणें परवडणार नाहीं.

## भावी महाराष्ट्र विद्यापीठ

प्र.—नवीन होऊं घातलेल्या महाराष्ट्र युनिव्हर्सिटीसंबंधानें आपलें म्हणणें काय आहे ?

उ.—या बाबतींत माझें असें म्हणणें आहे कीं, आतां महाराष्ट्र युनिव्हर्सिटी होणें अपरिहार्य आहे. हिंदुस्थानला प्रांतिक स्वायत्तता मिळाली, कीं महाराष्ट्र युनिव्हर्सिटीचा हा प्रश्न धसास लागेल. कांहीं झालें तरी प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च असें सर्वच्या सर्व शिक्षण मातृभाषेंतूनच झालें पाहिजे असें माझें मत आहे. त्याशिवाय लोकशाहीची खरी वाढ होणार नाहीं. आपल्या महाराष्ट्राची जी विशिष्ट संस्कृति आहे ती अगदीं खालच्या थरापर्यंत जाऊन पोंचली पाहिजे व त्यासाठीं निरनिराळ्या विषयांवर निरनिराळ्या दर्जाचीं लहानमोठीं अनेक पुस्तकें झालीं पाहिजेत. त्याशिवाय समाजाचा नैतिक दर्जा वाढणार नाहीं. हें पुस्तकलेखनाचें व प्रकाशनाचें काम मोठ्या प्रमाणावर चालण्यास युनिव्हर्सिटीच पाहिजे. एरवीं तें होणार नाहीं.

प्रांतिक स्वायत्तता मिळाली, कीं गुजराथी लोक अगोदर आपली युनिव्हर्सिटी बनवितील. त्यांना, अमदाबाद, सुरत, बडोदें, काठेवाड ( भावनगर, जुनागड, राजकोट वगैरे ) इत्यादि तयार केन्द्रें आहेतच. त्यांचे बाबतींत पैशाचा प्रश्न नाहीं. त्यांची तशी इच्छाही पण आहे. अर्थात् अनुकूल संधि मिळतांच गुजराथ युनिव्हर्सिटी स्थापन होण्यास उशीर लागणार नाहीं.

गुजराथच्या मागोमाग कर्नाटक. कर्नाटक एकीकरणाचा प्रश्न धसास लागले-लाच आहे. कदाचित् म्हैसूर युनिव्हार्सिटी हीच कर्नाटकाला अभिप्रेत युनिव्हर्सिटी होईल. नाहीं कोणी म्हणावें ?

राहतां राहिला प्रश्न महाराष्ट्र युनिव्हार्सिटीचा. ती आपली सर्वांच्या शेवटीं होणार. मुंबई युनिव्हार्सिटी ही सार्वजातीय (Cosmopolitan) आहे. ती मुंबई-

पुरतीच राहील व तिला शेवटीं ( Unitary and Teaching University ) एकमुखी व शैक्षणिक युनिव्हर्सिटीचें स्वरूप प्राप्त होणार असाच एकंदरींत रंग दिसतो.

महाराष्ट्रापुढें पैशाचा मोठा प्रश्न आहे. शिवाय आपसांतील भांडणें आहेतच. परंतु युनिव्हर्सिटी होऊं घातली म्हणजे पैसाही उभा राहील व मतभेदही वितळून जाऊन त्यांतून मार्ग निघेल. पुणें जरी एकमुखी युनिव्हर्सिटीला अनुकूल किंवा सोईस्कर असलें तरी प्रारंभीं तरी निदान ती संयोजक ( Affiliating ) युनिव्हर्सिटीच राहील. किंबहुना अध्यापन व परीक्षा अशीं तिचीं दोन स्वतंत्र अंगें कायमच राहतील असें दिसतें. प्रांतिक स्वायत्तता मिळाली तर अनुकूल प्रसंग पाहून महाराष्ट्र-युनिव्हर्सिटी-बिल त्यांत आणून तें पास करून घेणें शक्य होईल. सध्यां जरी सरकारी मदतीचा प्रश्न काढतां येत नसला तरी पुढें मागें तो काढतां येईल व सरकारी मदत आणि मान्यता महाराष्ट्र युनिव्हर्सिटीला मिळणें शक्य होईल असें मला वाटतें.

ता. २४ रोजीं मी महाराष्ट्र युनिव्हर्सिटी-फंडाला सुमारें आठ हजार रुपये देणगी देऊन सुरवात करून देणार आहें. हे आठ हजार रुपये युनिव्हर्सिटी झाल्यावरच तिला मिळावयाचे आहेत. तोंपर्यंत मराठी वाङ्मयाच्या उत्तेजनासाठीं त्यांच्या व्याजाचा विनियोग व्हावा अशी व्यवस्था मी करणार आहें.

प्र.—यापुढें आपण कोणकोणतीं पुस्तकें लिहिण्याचें योजिलें आहे ?

उ.—ज्याप्रमाणें विद्यार्थ्यांकरितां सुलभसें ‘ राज्यशास्त्र ’ म्हणून नुकतेंच लिहून प्रसिद्ध केलें, त्याचप्रमाणें ‘ अर्थशास्त्र ’ या विषयावरहि मी एक लहानसें पुस्तक ( पृष्ठें अदमासें २५० ) लिहिणार आहें. येथील शिवचरित्र–कार्यालयास जी साधनसामुग्री उपलब्ध झाली आहे तिचा उपयोग करून लहान मुलांमुलींना वाचण्यास सोपें आणि मनोरंजक वाटेल असें ‘ शिवचरित्र ’ लिहिण्याचें माझ्या मनांत आहे. टिळक महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांकरितां मी ‘ नागरिकशास्त्रावर ’ जीं व्याख्यानें दिलीं होतीं त्यांचीं साधनें, टिपणें वगैरे सर्व तयार आहेतच. त्यांत भर घालून नागरिकशास्त्रावरहि मला पुस्तक लिहितां येण्यासारखें आहे.

प्र.—हीं विद्यार्थ्यांकरितां लिहावयाचीं पुस्तकें झालीं; पण आपलें विशेष महत्त्वाचें असें पुस्तक कोणत्या विषयावर होणार आहे ?

उ.—मोर्लेच्या ‘ कॉंप्रमाइज् ’ च्या धर्तीवर जरी नाहीं तरी तसल्याच प्रकारचें तात्त्विक विवेचनात्मक असें ‘ मध्यम-मार्ग-दीपिका ’ म्हणून एक पुस्तक मला लिहावयाचें आहे. त्याची निश्चित रूपरेखा अद्याप ठरली नाहीं. परंतु साधारणपणें असें सांगतां येईल कीं, त्यांत मला ‘ Golden Mean Theory ’ ( सुवर्णमध्य उपपत्ति ) बद्दलची तात्त्विक मीमांसा करावयाची असून माझ्या आयुष्यांत मला जें अनुभवास आलें तें तत्त्व लोकांना पटवून द्यावयाचें आहे. Golden Mean हेंच तत्त्व सर्व व्यवहारांत, इतकेंच काय, पण शास्त्रांत देखील

कसें अंतिम हिताचें आणि चिरकालिक असतें हें मला निरनिराळ्या शास्त्रांच्या परिशीलनानें सोपपत्तिक दाखवावयाचें आहे. त्याचप्रमाणें प्रगतीची गति ही सातत्याची असते ( Continuous ) कीं क्रिया-प्रतिक्रियेची ( Action and reacton ) असते हेंहि त्यांत विस्तारपूर्वक दाखवावयाचें आहे. अशा कांहीं कल्पना आहेत, पण आज सगळ्या विचाराऱ्याच अवस्थेंत असल्यामुळें यापेक्षां निश्चयात्मक सांगतां येत नाहीं ! परंतु याच्या आधीं मला एक दोन कादंबऱ्या लिहायच्या आहेत. वाङ्मयाचा तो एक प्रकार असा आहे कीं त्या प्रांतांत मी अद्यापि पाऊल टाकलें नाहीं. तेव्हां एक दोन कादंबऱ्या लिहिण्याची इच्छा आहे व सवड सांपडतांच अगोदर तें काम हातीं घ्यायचें आहे. माझें शेवटचें पुस्तक म्हणजे माझें ' आत्मचरित्र '.

## महाराष्ट्रसंगीत

प्र.—महाराष्ट्र-संगीतासंबंधीं 'रत्नाकारां'त आलेला वाद आपण वाचलेला असेलच. त्यासंबंधीं आपलें म्हणणें काय आहे ?

उ.—मराठी संगीताचा वाद चाललेला मी वाचला आहे. पण प्रथम 'संगीताची महाराष्ट्रीय-पद्धति' आणि 'संगीताचें मराठीकरण' या दोन मुद्द्यांची गुंतागुंत असमंजसपणानें केली जाते हें पाहून हंसू येतें. हा भेद 'रत्नाकरा'च्या संपादकांनीं पूर्वीं थोडासा दिग्दर्शित केला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें जुन्या काळीं, म्हणजे हिंदुस्थानी संगीतपद्धतीची छाप पडण्यापूर्वीं, महाराष्ट्रांत जी संगीत पद्धति अमलांत असेल तीच महाराष्ट्र-संगीत-पद्धति. ती कोणास नक्की ठरवितां आल्यास तो प्रयत्न राष्ट्रीय कलेचें पुनरुज्जीवन या सदराखालीं पडेल. पण मी या प्रश्नाचा त्या दृष्टीनें कधींच विचार केलेला नाहीं. मी वादांत पडतों इतक्यापुरताच कीं, केवळ निरक्षर आलापांमध्यें नसेल—म्हणजे सरगम स्वरूपाचें नसेल—अशा संगीताची भाषा मराठी असावी; कोणतीहि परकी असूं नये, व हें माझें म्हणणें केव्हांहि कायम आहे. यांत परभाषेचा द्वेष नाहीं; तर फक्त स्वभाषेचा अभिमान आहे. निरक्षर आणि केवळ मुग्ध आलापमय गाणें, तंतुवाद्य व पियानो यांवरील गाणें, हें सार्वदेशीय व जागतिकहि होऊं शकेल. त्यांत अभिमानाला जागा नाहीं. पण शेंकडा नव्याण्णव इतकें संगीत वर्णाक्षरमय असतें. म्हणजे तेथें अर्थबोध अभिप्रेत असतो. हा अर्थबोध संगीत म्हणणाऱ्याला मातृभाषेशिवाय कसा खरा होणार ? शिवाय अर्थबोध झाल्याशिवाय काव्याचा भावनेवर परिणाम होत नाहीं व गायनकलेचा निम्मा अधिक हेतु फुकट जातो.

मराठींत उच्च प्रतीचें संगीतप्रबंध होऊं शकत नाहींत ही तक्रार मनाला न पटल्यामुळें, मी स्वतः असे संगीतप्रबंध करूं लागलों; व तसें करतांना फिरून रागाचें नांव प्रबंधांत गोंवल्यानें जातां जातां रागाचेंहि ज्ञान होतें म्हणून प्रबंधांत रागांचीं नांवेंही गोवूं लागलों. अशा प्रकारें मी सुमारें साठ-सत्तर प्रबंध तयार

केले आहेत व त्यांतील कांहीं गायलेहि जातात. कै० पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर यांनीं व ग्वाल्हेर येथील गवई राजा भय्या यांनीं हे कांहीं प्रबंध हिंदुस्थानी भाषेंतील प्रबंधांप्रमाणें म्हणतां येतात असें मला सांगितलें आहे; व राजा भय्या यांनीं तर श्रीमंत पुरंदरे यांचे वाड्यांत झालेल्या मैफलींत माझा जयजयवंती रागाचा मराठींतला ख्याल मुद्दाम गाइलाहि होता.

यानंतर प्रश्न उरला तो भाषेच्या सौष्ठवाचा व गोडीचा. प्रत्येक भाषेला कांहीं वेगवेगळ्या प्रकारची अनुकूलता असते. व्रिज भाषा फार गोड. याचें कारण तींत कोणताहि शब्द किंवा अक्षर कठीण किंवा ताठर न ठेवितां तें हवें तसें मऊ करून घेतलें जातें. मराठींत ही प्रथा पडलेली नाहीं हें खरें. तथापि मराठींत कवन करावयास बसलेल्या कवींना, मोरोपंताच्या निरोष्ठ रामायणाप्रमाणें, कठिण अक्षरांचे शब्द वगळून, जोडाक्षरें टाळून, अगदीं मऊ अक्षरांचे शब्द वापरून गायनप्रबंध रचतां येणें कठिण नाहीं. हिंदी भाषा झाली तरी वर्णमाला ही तिची व मराठीची एकच आहे, व संस्कृत भाषा हाच त्या दोहोंचाहि फिरून मूळ आधार आहे. त्या संस्कृतांतील गीतगोविंद घेतलें तर त्यापेक्षां अधिक मऊ शब्द कोठें सांपडतील ? संगीतप्रबंध हें कांहीं महाकाव्य नव्हे. एक लहानशी कल्पना पांच सात ओळींत काव्यमय लिहावयाची. त्याला शब्दांची अडचण काय म्हणून दुस्तर होईल ! पण शेवटीं 'आवड गोड' एवढ्यावरच वाद माजतो व संपतो. कोल्हापुरास कॉलेजांत माझे दोघे स्नेही 'हलवाई' व 'मेवे-करी' या दोन शब्दांपैकीं अधिक गोड कोणचा, असा वाद पंधरा मिनिटें घालीत असलेले मी पाहिले आहेत. तसाच हिंदी भाषेचा प्रकार. व्रजभाषा स्वाभाविक गोड असेल; पण मराठींत कवन मऊ गोड शब्दांनीं लिहितां येणारच नाहीं, हें काय म्हणून म्हणावें ! तात्पर्य, तालाचा ठेका, गायनप्रबंधाची ख्याली-अस्ताई वगैरे पद्धत, व गोड भाषा इतक्या गोष्टी मराठीस हिंदीप्रमाणेंच अनुकूल होऊं शकतात. शिवाय रूढ हिंदी कवनांत जो एकच शृंगाररस असतो तो नवीन केलेल्या मराठी कवनांत टाळतां येऊं शकतो हाहि एक मोठा फायदा होणारा आहे. आवड गोड अशा दुराग्रहाची अप्रयोजकता प्रतिपक्षाच्या पदरीं बांधण्याकरितां मी एक उदाहरणच मुद्दाम बनविलें आहे. तें असें.—

'पानि भरेली०' ही हिंदुस्थानी ठुंबरी फार लोकप्रिय आहे. म्हणून तोच राग व तीच ठुंबरीची चाल घेऊन मी एक मराठी ठुंबरी बनविली, व शिवाय 'गारा' हें रागाचें नांव प्रथमच त्यांत घातलें. हीं दोन कवनें एकासमोर एक मी खालीं देतों.

राग—गारा.

हिंदी

पानि भरेली । कोन गयी अलबेली कि नार । झमाझम ॥ ध्रु० ॥ हाथमें लंगरिया । खांदे गगरिया । बागे चित्र बनसे । कोन गयी अलबेली कि नार । झमाझम ॥ १ ॥

मराठी

गारा भरारा । दाहि दिशा करिति किति मारा । तडातड ॥ध्रु०॥ घडा काखेचा । चुडा लाखेचा । घडा मातीचा । चुडा हातींचा । काय करूं । कोठें शिरूं । जवळिं न वृक्ष घ्यावया थारा ॥ १ ॥ सासुरवासी । मी दीन अबला । सासुबाइ । रागें भरतिल । देतिल दोष तो मला सारा ॥ २ ॥

माझ्या अल्प बुद्धीला वाटतें कीं, ही मराठी ठुंबरी हिंदीसारखीच रागदारीनें व रंग भरून म्हणतां येईल. यांत जोडाक्षर बहुधा नाहीं व कठीण अक्षरही नाहीं. शेंकडा साठ—सत्तर अक्षरें मृदु आहेत. याशिवाय सांगण्याची गोष्ट अशी कीं, हिंदी ठुंबरी गायिली असतां तिचा अर्थ मराठी श्रोत्यांना एक कळणार तरी नाहीं, किंवा कळला तर त्यांतील चटोर शृंगारिक भावनेमुळें तो खेदकारक वाटेल. कारण हिंदी ठुंबरींतील कल्पना अशी आहे कीं, पाणवठ्यावर जाणाऱ्या एका तरुण स्त्रीचें वर्णन एक तरुण शृंगारिकभावनेनें करीत आहे. उलट मराठी ठुंबरींत मुख्य विषय पाणवठ्यावर जाणाऱ्या तरुण स्त्रीचाच ठेवला आहे; पण ‘ घडा व चुडा गारांनीं फुटलेला पाहून सासू मलाच दोष देईल ’ अशी तिची करुण भावना रंगविली आहे. हा अर्थ कळला तर तो सदभिरुचीला अधिक धरून आहे.

इतकें सगळें झालें तरीपण ‘ पानि भरेली ! ’ एवढे शब्द ऐकल्याबरोबर डोळे मिटून माना हलवून ‘ अहाहा ! काय गोड चीज आहे ! ’ असें म्हणणारे, आणि मराठी ठुंबरीला नाक मुरडणारे लोक मला भेटले आहेत. मग दोन्ही ठुंबऱ्या म्हणणारा तोच कुशल गायक असेना का ? इतका सगळा खुलासा मी मुद्दाम केला, याचें कारण संगीत प्रबंध मराठींत असावे असें म्हटलें, कीं त्यावर लोक हास्यास्पद आक्षेप घेऊन उठतात.

प्र.—आपण तयार केलेल्या रागमालेच्या सगळ्या प्रबंधांचे स्वरलेख झाले आहेत काय ?—

उ.—सगळ्यांचे स्वरलेख झाले नाहींत. फक्त उदाहरणाकरितां ‘ रत्नाकरां ’त पूर्वीं स्वरलेखासह दोनतीन प्रबंध दिले होते. पण बाकीचे कांहीं हिंदुस्थानी चालीबरहुकूम आहेत अशी मी खात्री करून घेतली आहे. कांहीं बीजात्मक पद्यरूपाचे आहेत.

## [ प्रेक्षक—पुणें, ता. २० ऑगस्ट १९३२ ]

प्रतिनिधि—कै० लोकमान्यांच्या बरोबर आपण इंग्लंडमध्यें गेलांत त्या वेळीं तिकडे आपण कांहीं चित्रपट पाहिलेच असतील !

श्री. केळकर—नाहीं, त्या वेळीं तिकडे मी एकहि चित्रपट पाहिला नाहीं. तीन चार नाटकें मात्र पाहिलीं. हीं नाटकें कोणत्या नाटककारांचीं होतीं तें आतां मला आठवत नाहीं. येथें हिंदुस्थानांत मात्र मी कांहीं चित्रपट पाहिलेले आहेत. गौतमबुद्धाच्या चरित्रावरील एक चित्रपट, लंकादहन, वत्सलाहरण, भस्मासुर–मोहिनी वगैरे मूकचित्रें मी पाहिलेलीं आहेत. अजून मी एकहि बोलपट पाहिलेला नाहीं. साधारणपणें मी एक प्रकारचा पुराणप्रिय ( Orthodox ) मनुष्य आहें. ' अयोध्येचा राजा ' आमच्या पुण्यांत कित्येक दिवस चालू होता पण मी तो पाहण्यास गेलों नाहीं. साधारणपणें चित्रपट मग ते मूक असोत कीं बोलके असोत मला फारसे आवडत नाहींत. मला नाटकच सर्वांत फार आवडतें. एकंदरींत मला तीन प्रमाणें ( Three Dimensions ) असलेल्या गोष्टी मला आवडतात; व नाटकांत नटाचा आवाज, नटाचें शरीर व रंगभूमि ( Stage Technique ) हीं तीन प्रमाणें असल्यामुळें मला नाटकच फार आवडतें.

प्र.—सिनेमासृष्टींतील कोणत्याहि नटाशीं किंवा नटीशीं आपली वैयक्तिक ओळख आहे काय !

उ.—नाहीं; एकहि सिनेमा–नटाशीं अगर नटीशीं माझी ओळख नाहीं.

प्र.—समाजांतील कुलीन स्त्रियांनीं कीर्तीसाठीं व धनार्जनासाठीं म्हणून चित्रपटसृष्टींत प्रवेश करावा किंवा नाहीं याबद्दल आपलें काय मत आहे ?

उ.—कुलीन स्त्रियांनीं चित्रपटसृष्टींत प्रवेश केल्यानें विशेष कांहीं फायदा होणार आहे असें मला मुळींच वाटत नाहीं. पण ही गोष्ट आतां रूढ होऊं पहात आहे हें दिसतच आहे व त्याला इलाज नाहीं. व्यक्तिशः मला ही गोष्ट आवडत नाहीं. ही गोष्ट आतां टळत नाहीं हें मी समजून चूकलों आहे व म्हणून विद्यमान परिस्थितीशीं सर्वांना मिळतें घ्यावेंच लागतें त्याप्रमाणें मलाही मिळतें घेतलेंच पाहिजे. परंतु हा किंवा तो पक्ष स्वीकारण्याची मला जर मोकळीक व अधिकार असता तर मी ही गोष्ट होऊं दिली नसती.

प्र.—सिनेमाच्या धंद्याविषयीं आपलें एकंदर मत काय आहे ?

उ.—चित्रपट हे सार्वजनिक शिक्षणाचें एक उत्कृष्ट साधन आहे. परंतु मनःक्षोभ करणारे व खळबळ उत्पन्न करून अंगावर एकदम कांटा उभा राहील अशा तऱ्हेचे प्रसंग दाखविण्याची जी प्रवृत्ति ( sensationalism ) अलीकडे उत्पन्न झाली आहे तिच्या मी विरुद्ध आहें. स्वभावतःच मला असल्या गोष्टी रुचत नाहींत व पचत नाहींत. अलीकडे लोकांना क्षोभक प्रसंगांची ( sensations ) दृश्यें फार हवीं असतात. ज्याच्यापासून शिक्षण मिळवून बोध घेतां येईल असा सौम्य

चित्रपट मला आवडत असतो. उदाहरणार्थ, एकाद्या सामाजिक कादंबरीवर चित्रपट उभारलेला असून त्यांतील कथानकाचा परिपोष व प्रसंगाची उठावणी चांगली झालेली असेल, त्यांतील अभिनय उत्कृष्ट असेल व त्यांतील एकंदर वातावरण सौम्य स्वरूपाचें असेल तर मला असा चित्रपट मनापासून आवडेल. व असलेच चित्रपट मला आवडतात. अतिरंजन ( exaggeration ) व क्षोभक प्रसंग मला आवडत नाहींत. मी स्वतः सौम्य वृत्तीचा आहे व मला सौम्य गोष्टीच हव्या असतात.

प्र.—हिंदी सामाजिक चित्रपटांवर पुरेसें उत्पन्न होत नाहीं व अजून आपल्या प्रेक्षकांना हाणामारीचेच चित्रपट हवे असतात. हिंदी सामाजिक चित्रपटांची आवड संपादक लोकांनीं प्रेक्षक जनतेमध्यें उत्पन्न केली पाहिजे, असें या धंद्यांतील डायरेक्टर वगैरे लोकांनीं मजजवळ अनेक वेळां बोलून दाखविलें आहे; तरी आपण एकादें सामाजिक कथानक चित्रपट तयार करण्यासाठीं कां लिहून देत नाहीं ?

उ.—मी नाटकें लिहिलेलीं आहेत त्यांपैकीं दोनतीन आज रंगभूमीवर असण्यास योग्य आहेत. लोकांना पुरेसे क्षोभकारक व हास्योत्पादक प्रसंग–पाहिजे तर विनोदाचे म्हणा–हवे असतात. तर अशा उघड उघड स्थितींत चित्रपटांसाठीं सामाजिक कथानकें मागण्यास माझ्याकडे कोण येणार आहे व माझ्या कथानकांचा स्वीकार तरी कोण करणार आहे ? तरीहि चित्रपट तयार करणाऱ्या माणसांनीं जनतेचे गुलाम न बनतां त्यांनीं जनतेला ताब्यांत ठेवावें असें माझें मत आहे.

---

## [ किर्लोस्कर मासिक, सप्टेंबर १९३२ ]

प्र.—वक्ता जन्मसिद्ध असतो कीं यत्नसिद्ध असतो ?

उ.—वक्तृत्व हें दोन तीन प्रकारचें असतें. त्यांतील एक प्रकारचा वक्ता हा जन्मसिद्धच असतो, तो यत्नानें तयार होत नाहीं. दुसऱ्या प्रकारचा वक्ता हा प्रयत्नानें व अनुभवानें तयार होऊं शकतो. म्हणजे भावनाप्रधान व नाटकी वक्ता हा जन्मसिद्ध असतो, आणि विषयप्रतिपादनानें वक्तृत्व उमटविणारा वक्ता हा प्रयत्नानें तयार होतो.

प्र.—जन्मसिद्ध वक्तृत्वकलेच्या गुणविकारासाठीं मनुष्यानें कोणत्या दिशेनें प्रयत्न करावा ?

उ.—उपजत वक्तृत्व अंगी असलें तरी मनुष्यानें बहुश्रुतता मिळवावी म्हणजे त्या जन्मसिद्ध वक्तृत्वगुणाचें चीज होईल. कांहीं तरी सांगण्यासारखें महत्त्वाचें असल्याशिवाय नुसतें वक्तृत्व वाहावत जातें व हास्यास्पद होतें.

प्र.—वक्तृत्वकला शिकवितां येईल काय ?

उ.—शाळाच काढली तर वक्तृत्वकला शिकवितां येणार नाहीं असें नाहीं. पण शिकून तयार झालेला वक्ता कोणी माझ्या पाहाण्यांत आजवर नाहीं.

प्र.—आपण अगदीं पहिलें भाषण केव्हां केलें ? त्याच्या कांहीं आठवणी सांगतां येतील काय ?

उ.— मी माझें पहिलें भाषण १८९३ सालीं केलें. सातारा येथें एल्एल्. बी. चा अभ्यास करीत असतां, राष्ट्रीय सभेहून करंदीकर, पारसनीस इत्यादि प्रतिनिधी आले त्यांचें गद्यात्मक व पद्यात्मक स्वागत करण्याचें काम माझ्यावर आलें होतें. त्या वेळीं मी माझें भाषण लिहून काढलें होतें, व तेव्हां स्मरणशक्ती चांगली असल्यामुळें तें भाषण पाठ न करितां मी बोलल्यासारखें म्हणून दाखविलें. पण तसे प्रयोग पुनः मी कधीं केले नाहींत. प्रारंभी मला मुळींच बोलतां येत नसे. इंग्रजी नाहीं व मराठीहि नाहीं. आणि अजूनही मला कोणी ‘ वक्ता ’ असें म्हटलें तर मी त्याला मनांत हंसतों. कारण माझ्या समजुतीप्रमाणें मजमध्यें वक्तृत्व असें मुळींच नाहीं. वक्तृत्व दोन प्रकारचें असतें एक फुलबाजीचें किंवा भुइनळ्याचें वक्तृत्व व दुसरें चिचुंद्रीचें वक्तृत्व. खरा वक्ता, कलावान् वक्ता, दारुच्या चिचुंद्रीसारखा कोणीकडे धावेल, पळेल, कोणाच्या अंगावर जाईल याचा नियम नाहीं. पण चमत्कृति उत्पन्न करील. ‘ फुलबाजीचा ’ वक्ता किंवा ‘ भुइनळ्याचा ’ वक्ता म्हणजे तो असा असतो कीं, तो प्रारंभ कसा करील, त्याच्या भाषणाचा शेवट कसा होईल, या गोष्टीसंबंधानें किंचित् परिचय असलेल्याहि श्रोत्यांना अदमास करितां येतो. मात्र यांत आणि त्यांत फरक हा कीं, चिचुंद्रीचा वक्ता साधलें तर बहार करील नाहीं तर कांहींच परिणाम न होता तो हास्यास्पद ठरेल. पण दुसऱ्या प्रकारचा वक्ता आपल्या मुद्देसूद विषयाच्या मांडणीनें लोकांच्या मनावर केव्हांहि, निदान मध्यम प्रतीचा परिणाम केल्याशिवाय राहणार नाहीं. माझें वक्तृत्व हें दुसऱ्या प्रकारचें आहे. मी विषयाची आखीव मर्यादा सहसा कधींच सोडीत नाहीं. माझ्या ‘ वक्तृत्वा ’ ची रुंदी फारच थोडी असते. पण विषयाची पुष्कळच असते. ज्याला इंग्रजींत ‘ रेलेव्हन्स ’ म्हणतात तें माझें सहसा कधींहि सुटत नाहीं. एकंदर भाषण घेतलें तर त्यांत उपक्रम, उपसंहार व दरम्यानचा युक्तिवाद साधारण प्रमाणबद्ध असतो. एखाद्या प्रसंगीं विनोद, कोटी, खटका हीं सुचलीं तर माझ्या भाषणांत रंग भरतो. नाहींतर “ माहिती बरी होती. ” असें म्हणून श्रोत्याला समाधान करून घ्यावें लागतें व तें करून घेतां येतेंहि.

प्र.—आपल्या वक्तृत्वांत कोणता गुण प्रारंभीं नव्हता व तो आपण कशा प्रयत्नानें आणला ?

उ.—प्रारंभीं म्हटलें तर मजजवळ वक्तृत्व नव्हतें व त्यासंबंधीं कोणता गुणहि नव्हता. शिवाय आवाज वाईट चिरका, कोरड्या खोकल्याची ढास फारच लागते व आवाज लहान मोठा किंवा उचित अंगविक्षेप किंवा चेहेऱ्याच्या हश्यां-

तील सूक्ष्म फरक दाखविण्याची कला यांपैकीं मजजवळ कांहीं नाहीं. पण विचार केल्याशिवाय सहसा न बोलण्याची खबरदारी मी घेतों. मुद्द्याचीं टिपणें कागदावर आठवणीकरितां उतरून घेण्याला व त्यांचा उघड उपयोग करण्याला मी लाजत नाहीं. विषयासंबंधीं शक्य तितकी भरपूर माहिती व टिपणांच्या सहायानें त्यांचा बरोबर क्रम, या दोन गोष्टीच मी प्रयत्नानें वाढविल्या; व सुदैवानें मला बोलण्याचें काम गेल्या २० वर्षांत इतकें पडलें कीं इतक्या सरावानें बोलतां आलें नसतें तर मी अगदीं दगडच ठरलों असतों. पण तितका निर्बुद्ध मात्र मी नाहीं. माझें भाषण एकादे वेळीं सजलें किंवा रंगलें तर प्रमाणबद्ध व मर्यादित उंचीच्या ठिणग्या पाडणाऱ्या भुइनळ्याप्रमाणें तें आल्हाददायक होत असेल. पण वक्तृत्वाची खरी वीज म्हणतात ती माझ्या भाषणांत कधीं चमकून जाते असें मला वाटत नाहीं. मी वक्तृत्वकलेची उणीव आपल्या माहितीनें व युक्तिवादानेंच निघेल तेवढी भरून काढतों. मात्र एक गोष्ट अभिमानानें सांगतों कीं, कंटाळवाणें भाषण करून ' पुरेपुरे ' म्हणण्याच्या अर्थाची टाळी मी श्रोत्यांकडून जन्मांत घेतली नाहीं ! दीड दीड तास बोलूनहि लोकांना भाषण थांबावें असें वाटण्याच्या आंत मी भाषण पुरें केलें असें होई.

प्र.—गेल्या वीस वर्षांत वक्तृत्वाचें तंत्र बदललें आहे काय ?

उ.—गेल्या वीस वर्षांत वक्तृत्वाची पद्धत थोडथोडी बदलत आहे. म्हणजे ती अवघड, बोजड यावरून निघून सोपेपणावर येत आहे. शिवाय भाषणांच्या विषयांत फारच विविधता येत चालली आहे. राजकारणाच्या विषयांतील भाषणें मात्र आतां कंटाळवाणीं होऊं लागलीं आहेत, कारण त्यांतील मुद्द्यांत नवेपणा राहिला नाहीं. भावनाच भाषणाला काय रंग आणील तेवढाच. पण इतर दृष्टीनें भाषणांचे विषय पुष्कळ वाढले आहेत. यामुळें वसंतव्याख्यानमालेसारखी एखादी माला सबंध ऐकली तर पूर्वीपेक्षां ती अधिक चित्ताकर्षक होते.

प्र.—आपल्या भाषणांपैकीं स्वतः आपणास कोणतीं फार आवडलीं आहेत ?

उ.—या प्रश्नाचें उत्तर देणें कठीण आहे. तथापि माझीं कांहीं कांहीं भाषणें मला स्वतःलाहि आवडण्यासारखीं झालीं आहेत असें वाटतें. त्यांतील कांहीं मराठींत व कांहीं इंग्रजींत, असेंब्लीमध्यें. पण तीं आतां स्मरणानें सांगतां येत नाहींत. दोन भाषणें मात्र मला आठवतात, तीं क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्टवरील व पब्लिक सेफ्टी बिलावरील. या दुसऱ्या भाषणाच्या प्रसंगींच असेंब्लींतील एक मोठा वाङ्मयप्रेमी युरोपियन, सर डेनिस ब्रे, यानें खालील शब्दांनीं माझ्या भाषणाची तारीफ केली.

" Ordinarily, Sir, when my Hon. friend gets up to speak, I settle myself down in my chair for a delightful half-hour. For, I greatly enjoy his charm of manner, his urbanity of

speech, his delightful quips and literary anecdotes, his touches of humour, the tolerance and moderation of his views. "

प्र.—वक्तृत्वाच्या बाबतींत मद्रास व बंगाल यांच्याहून महाराष्ट्र कंगाल आहे असें कोणी म्हणतात हें खरें आहे काय ?

उ.—बंगाल व मद्रास हे दोन्ही प्रांत वक्तृत्वाच्या दृष्टीनें महाराष्ट्राच्या पुढें आहेत असें म्हणण्यांत येतें हें इंग्रजी वक्तृत्वाच्या बाबतींत अधिक खरें आहे. देशी भाषेंतील भाषणासंबंधीं तें खरें आहे असें मला वाटत नाहीं. महाराष्ट्रांतील लोकांना इंग्रजी वक्तृत्व येणार नाहीं असें मला वाटत नाहीं. पण ते इंग्रजींत सहसा भाषणेंच करीत नाहींत. मी स्वतः असेंब्लींत जें पहिलें भाषण केलें तें त्या वेळेपर्यंतच्या आयुष्यक्रमांतील माझें तिसरें किंवा फार तर चवथें इंग्रजींतील भाषण असेल. यावरून इंग्रजी भाषणाचा आमचा सराव लक्षांत येईल ! ! विषयाच्या तपशिलांत मद्रासी व भावनेंत बंगाली हा महाराष्ट्रीयांच्या पुढेंहि कांहींसा असतो. तथापि महाराष्ट्रीय वक्त्याचें भाषण कोठेंहि आदरबुद्धीनेंच ऐकलें जातें, व मद्रासी किंवा बंगाली व्याख्याता जितके वेळां स्वतःला हास्यास्पद करून घेतो तितका महाराष्ट्रीय वक्ता करून घेत नाहीं.

प्र.—लोकांमध्यें एक असा समज आढळतो कीं, लेखकाला वक्ता होणें अवघड आहे व वक्त्याला लेखक होणें अवघड आहे. या कल्पनेंत सत्याचा किती अंश आहे व असल्यास त्याबद्दल मानसशास्त्रदृष्ट्या कसा उलगडा कराल ?

उ.—लेखनाची संवय ही वक्तृत्वाला किंचित् विघातक आहे; व वक्तृत्वाची संवय लेखनाला थोडी विघातक आहे, असें मला वाटतें. माझा प्रथमपासूनचा सराव लिहिण्याचा पडल्यामुळें मला भाषणें करण्याला अडचण झाली असा अनुभव आहे. त्याचें कारण असें कीं, लेखक हा स्मरणशक्तीवर फारसा अवलंबून रहात नाहीं. कारण त्याला संदर्भ-ग्रंथ हाताशीं असतात. टिपणें केलीं तरी शब्दांकरितां वक्त्याला स्मरणशक्तीवरच भिस्त ठेवावी लागते. मी तोंडानें मराठी इंग्रजी मजकूर सर्रास सांगू शकतों, व पुष्कळ वर्षें तोच परिपाठ ठेवला. यामुळें तोंडानें सांगून लिहिण्याची जी गति असते तितकें सावकास बोलणें जर वक्तृत्वाला चाललें असतें तर मी मोठा वक्ता झालों असतों. पण दुर्दैवानें सावकाश बोलण्याचीहि गति याहून फार अधिक द्रुत असावी लागते. हातानें कितीहि जलद लिहिलें तरी ती गति व बोलण्याची गति यांत तर फारच अंतर असतें. शिवाय माझा विशेष स्वभाव असा कीं, शब्द होईल तितका समर्पक व उचित पडावा अशी फार इच्छा. यामुळें बोलतांना जर मनाप्रमाणें शब्द बाहेर पडला नाहीं, भलताच शब्द बाहेर पडला तर मी तेथल्या तेथेंच मनांत विरमून जातों व त्या विरमण्याचा परिणाम लगेच माझ्या भाषणावर होतो. मला आहे याहून कमी लज्जास्पदतेची जाणीव असती तर मी आहें याहून अधिक चांगला वक्ता झालों

असतों. मी स्वतःला हास्यास्पद करून घेतल्याची जाणीव नसेल तर मी अधिक चांगलें बोलेन. माझी स्मरणशक्ति फार वाईट आहे. यामुळें मला मुद्द्याची टिपणें करावीं लागतात; आणि तशीं न केल्यामुळें जर योग्य शब्द किंवा युक्तिवादाला अवश्य असा दुवा आठवला नाहीं तर माझें बोलणें फिकें पडतें. लिहिण्याची फार संवय झाल्यानें गाडीचें चाक खोल चाकोरींत जाऊन बसावें तशी माझी स्थिति झाली आहे. पण उलट पुष्कळ नामांकित वक्ते हातांत लेखणी पडल्याबरोबर दिङ्मूढ कसे होतात, व बोलण्याच्या निम्मेहि स्वारस्य त्यांच्या लेखनांत उतरत नाहीं, हेंहि मी पाहिलें आहे. म्हणजे एकाला एक आहे तर दुसरें नाहीं. लिहिणें व बोलणें दोन्ही गोष्टी सारख्याच सौष्ठवानें करणारा मनुष्य क्वचितच आढळला.

प्र.—शाळेंतील व कॉलेजांतील होतकरू तरुण वक्त्यांस विशेषतः सांगण्यासारख्या कोणत्या सूचना आपणांस करतां येतील !

उ.—तरुण विद्यार्थ्यांना मी इतकाच उपदेश करीन कीं, त्यांनीं खूप वाचावें, बहुश्रुत व्हावें व बोलण्याचा प्रत्येक प्रसंग मिळेल तो विचार करून बोलून साधावा. म्हणजे दुसऱ्या कोणाला न विचारतांहि त्यांच्यांत वक्तृत्वाचे गुण कोणते आहेत हें त्यांचें त्यांना कळून येईल. पुढें येणारे दिवस पूर्वीपेक्षांहि वक्तृत्वाला अधिक वाव देणारे असणार यांत शंका नाहीं. तेव्हां त्यांनीं आपल्या गुणांचा भरपूर उपयोग करण्याची तयारी ठेवावी.

---

## [ 'श्री-लोकमान्य'—ता. २२ ऑगस्ट, १९३२ ]

प्र.—आपल्या ६० वर्षांच्या आयुष्याचें सिंहावलोकन करतांना आपल्या दृष्टीपुढें अनेक बरे वाईट प्रसंग उभे रहात असतील. ते लक्षांत घेऊन सार्वजनिक कार्य करूं इच्छिणाऱ्या तरुणाला आपण सावधगिरीच्या कोणत्या सूचना करूं शकाल !

उ.—सार्वजनिक कार्य करूं इच्छिणारानें प्रथम स्वावलंबी होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. **स्वाभिमान न गमावतां स्वतःची उपजीविका त्याला करतां आली पाहिजे.** सार्वजनिक कार्यांकरितां जनतेजवळ भिक्षा मागण्यांत लाज नाहीं, पण स्वतःच्या उपजीविकेकरितां देखील लोकांजवळ पैसा मागणें अत्यंत लाजिरवाणें आहे. दरिद्री, मध्यम स्थितींतला किंवा श्रीमान् यांपैकीं कोणत्या दर्जाचें आयुष्य आपणास पुढें घालवावयाचें याचा प्रथम मनाशीं निश्चय करून त्याप्रमाणें उपजीविकेचें साधन प्राप्त करून घेतलें पाहिजे. **आपल्यावर जीं जीं माणसें अवलंबून असतील त्यांच्याबद्दलचीं कर्तव्यें बजावणें हें मी प्रत्येकाचें कर्तव्य समजतों.**

उपजीविकेच्या साधनांचे सामान्यतः चार प्रकार सांगतां येतील. स्वतंत्र धंदा करून पोट भरणें हा सर्वांत युक्त मार्ग होय. एकाद्या संस्थेला वाहून घेऊन तिची सेवा करीत रहाणें हा दुसरा प्रकार. खाजगी धन्याची नोकरी हा तिसरा प्रकार. ज्याच्या हातून ह्या तिन्ही गोष्टी होणें शक्य नाहीं, त्याला सरकारी नोकरी हा शेवटचा उपाय आहे. सरकारी नोकरी करीत असतांहि स्वत्व राखतां येतें, समाजाची व देशाची यथाशक्ति सेवा करतां येते, असें माझें मत आहे.

आयुष्याचें कार्य उचलावयाचें तें आपली नैसर्गिक प्रवृत्ति पाहून उचलावें. केवळ कीर्तीकरितां भलत्याच कार्याला हात घालणें आत्मघातकीपणाचें आहे.

**एकदां उचललेलें कार्य जन्मभर करीत राहीन अशा प्रतिज्ञेनें तें उचलावें.** अगदीं अशक्यच झालें तर दुसरीकडे वळावें. पण अंगीकृत कार्य होतां होईल तों सोडूं नये. असें करण्यानें त्या त्या कलेंत मनुष्य वाकबगार बनतो व अधिकांत अधिक यशहि मिळूं शकतें.

बहुश्रुतता किंवा सर्व गोष्टींचें थोडथोडें ज्ञान असणें चांगलें; कारण त्याचा सर्वत्र उपयोग होतो; हें करूनहि पण विशिष्ट धंद्यांत पूर्ण निष्णात होणें अधिक चांगलें.

**आपला सार्वजनिका पैशाशीं संबंध असेल तेव्हां कोणाहि एकाच व्यक्तीकडे त्याचा संबंध ठेवूं नये. अनेकांकडे ठेवणें श्रेयस्कर असतें.**

वैयक्तिक कलह शक्य तेवढे टाळावे किंवा कमी करावे.

या सर्व गोष्टी विचारांत घेऊन जें कार्य होईल तें पाहिल्या प्रतीचें असें मी म्हणेन; मग मापाच्या दृष्टीनें तें कमी भरलें तरी त्याबद्दल मी कर्त्याला जबाबदार धरणार नाहीं. कारण हें परिस्थितीवर आणि कर्त्याच्या बुद्धीवर अवलंबून असतें.

हें सगळें सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीनें झालें. ज्यांचा आत्मविश्वास दांडगा आणि बुद्धिमत्ताहि विशेष त्यांना अर्थात् कोणताच नियम लागूं पडत नाहीं.

विद्यार्थिदशा पूर्ण करून नंतरच सार्वजनिक कार्यास लागावें असें माझें स्पष्ट मत आहे. प्रत्येकाचें आयुर्मान ६० वर्षांचें धरलें, तर पहिलीं ३० वर्षें विद्यार्जनांत घालवून पुढचीं ३० वर्षें सार्वजनिक कार्य करीत राहिलें तरी पुष्कळ झालें.

प्र.—हें सर्वसामान्य सार्वजनिक कार्याविषयीं झालें, वृत्तपत्राच्या धंद्यांत आपण जवळ जवळ तीन तपें घालविलीं आहेत. वृत्तपत्राच्या किंवा लेखनाच्या धंद्यांत यशस्वी होण्याचा होतकरू तरुणास आपण कांहीं अचूक मार्ग दाखवूं शकाल काय?

उ.—वृत्तपत्रलेखनाची आवड असेल तर जेव्हां जेव्हां संधि मिळेल तेव्हां तेव्हां लिहिण्यास चुकूं नये. पण वृत्तपत्रांत लिहिण्यास संधि मिळत नाहीं म्हणून अडून रहाण्याचें कारण नाहीं. कारण त्याच्याबाहेर देखील लेखनाचें मोठें क्षेत्र आहे. मामुली संपादकीय लिखाणापेक्षां हें काम मी अधिक चांगलें मानतों. आपला विषय परिणामकारक रीतीनें मांडतां येणें हा वृत्तपत्रलेखनाचा मुख्य हेतु

आहे. संपादकीय कचेरीच्या बाहेर आपल्या घरांत बसून देखील हा हेतु साधतां येण्यासारखा आहे.

पुष्कळ लोक पुष्कळ वाचतात आणि स्वस्थ बसतात. ही वृत्ति मला अत्यंत तिरस्कार्य वाटते. वाचन Productive ( उत्पादक ) असलें पाहिजे. वाचनानंतर कांहीं तरी लेखन उत्पन्न झालें तरच त्या वाचनाची किंमत अजमावणें शक्य होतें. वाचणाराची विचारक्षमता त्याच्या लेखनावरूनच कळते. " मला लिहितां येत नाहीं " असें पुष्कळ लोकांना उगीचच वाटत असतें. " Have something to say, it is easily said " असे कोल्हापूरचे प्रो. शिवराम बापूजी परांजपे आम्हांला नेहमीं सांगत असत. मनांत आणलें तर प्रत्येक माणसाला आपल्या आयुष्यांत निदान एक तरी मनोरंजक पुस्तक लिहितां येण्यासारखें आहे. आमच्या वेळेला दैनिक वर्तमानपत्रांची आतांइतकी वाढ झालेली नव्हती. म्हणून त्या वेळीं अमुक विषयांत नैपुण्य ( Specialise ) मिळविण्याला सवड नसे. सर्वसामान्य विषयांचा अभ्यास करायला सांपडेल तेवढाच. पण आतां दैनिकपत्रें निघाल्यामुळें विशिष्ट शाखेंत नैपुण्य मिळविण्यास पुष्कळ वाव आहे.

प्र.—लेखनव्यवसायावर उपजीविका करणें आज महाराष्ट्रांत शक्य आहे काय?

उ.—मला तसें आज तरी शक्य दिसत नाहीं. शिक्षणाचा प्रसार नाहीं म्हणून मागणी नाहीं आणि मागणी नाहीं म्हणून वाङ्मयाला खप नाहीं. वृत्तपत्रांवर फारच थोड्या माणसांना जगतां येईल. दुय्यम व्यवसाय म्हणून लेखनाचा धंदा पत्करून उपजीविकेचें साधन वाढवितां येण्यासारखें आहे. लेखनावर चांगले पैसे मिळविल्याचीं उदाहरणें माझ्या डोळ्यांसमोर आहेत; पण दुसरा व्यवसाय नसता तर केवळ लेखनावरच ते उपजीविका करूं शकले असते कीं नाहीं याबद्दल मला जबर संशय आहे. कै. हरीभाऊ आपटे यांनीं पुष्कळ कादंबऱ्या लिहिल्या व त्या पुढें लोकप्रिय झाल्या पण उपजीविकेच्या दृष्टीनें त्यांना त्यांपासून विशेष फायदा झाला नाहीं. कै. वासुदेव गोविंद आपटे यांनीं ' आनंद ' मासिकावर व बालवाङ्मयावर शेवटीं शेवटीं इस्टेट केली; पण आयुष्यांतील पुष्कळसा काल उपजीविकेकरितां त्यांना अन्य व्यवसाय करावा लागलाच. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांना दोन नाटकांवरच काय ते चांगले पैसे मिळाले. पण तेवढ्यावरच त्यांची उपजीविका चालणें शक्य नव्हतें. वकिलीचा मुख्य व्यवसाय त्यांना करावाच लागला. पांगारकरांनीं बराच धनसंचय केल्यासारखें दिसतें. पण तो केवळ लेखनावरच नव्हे. ज्या पुस्तकांवर त्यांना बहुतेक पैसा मिळाला तीं पुस्तकें स्वातंत्र्यानें लिहिलेलीं नसून उतारेवजा आहेत आणि जीं पुस्तकें त्यांनीं परिश्रमपूर्वक स्वातंत्र्यानें लिहिलीं, त्यांवर त्यांना फारसा पैसा मिळालेला नाहीं असेंच दिसून येईल. लेखनाच्या जोडीनें पुराणिकाचा किंवा प्रवचनकाराचा पेशा स्वीकारून त्यांना बरीच मिळकत झाली आहे. माधवराव जोशी यांनीं नाटकांत पुष्कळच पैसा

कमावला असें मी म्हणेन. खाडिलकरांना नाटकांपासून बरीच मिळकत झाली. 'केसरी'कडून त्यांना नेहमींच वेतन मिळत असे असें नाहीं. त्या वेळीं उपजीविकेच्या कामीं नाटकांची त्यांना चांगलीच मदत झाली असावी. नाटकांची किंमत वाढायला सुदैवानें त्यांना कंपनीहि चांगली लाभली होती. स्वतः मला १९१२ पर्यंत लेखनापासून कांहीं प्राप्ति झाली नाहीं. पुढें थोडथोडी होऊं लागली. पण माझें उपजीविकेचें मुख्य साधन 'केसरी'कडून मिळणारा पगार हेंच राहिलें. हा पगार अर्थात् उपजीविकेपुरताच असे. मला जी काय थोडी मालमत्ता करतां आली असेल ती मात्र माझ्या लेखनबळावरच हें कबूल केलें पाहिजे. वाङ्मय-लेखनावर मला तीस हजार रुपये मिळवितां आले.

प्र.—"मराठी वाङ्मयांतील तुम्हांला वाटतील तीं १०।१५ पुस्तकें निवडून घ्या; बाकीचीं आम्ही जाळून टाकणार आहों" असें उद्यां आपल्याला एकदम कोणी सांगितलें तर आपण कशी निवड कराल ?

उ.—आगीचाच विषय काढलांत म्हणून तो ऐकतांच माझ्या मनांत एक कल्पना आली ती सांगून टाकतों. घराला आग लागली म्हणजे आई प्रथम आपल्या पोरांना पोटाशीं धरून बाहेर पडते, त्याप्रमाणें मराठी वाङ्मयाला जर उद्यां कोणी आग लावूं लागला, तर अपत्यवात्सल्यामुळें प्रथम मी माझीं पुस्तकें घेऊन दूर होईन. पण हा विनोद दूर करून बोलावयाचें झालें तर प्रश्नाचें उत्तर देणें जरा कठीण आहे. क्रम लावणें तर अगदींच शक्य नाहीं. कारण त्या त्या विषयांत पहिल्या दर्जाचीं पुस्तकें निरनिराळीं दाखवितां येतील. तथापि विषयवार निवड करणें भागच झालें तर मी खालीलप्रमाणें निवड करीनः—

( १ ) **करमणूक**—महाभारत (२) अरेबियन् नाइट्स ( ३ ) **तत्त्वज्ञान**—गीतारहस्य ( ४ ) **मराठ्यांचा इतिहास**—खरेशास्त्री यांचे ऐतिहासिक लेख ( ५ ) **नाट्यकला**—मूकनायक (श्री. कृ. कोल्हटकर) ( ६ ) **निबंध**—निबंधमाला (विष्णुशास्त्री चिपळुणकर) ( ७ ) **विनोद**—साहित्यबत्तिशी (श्री. कृ. कोल्हटकर) ( ८ ) **कादंबरी**—पण लक्षांत कोण घेतो ? ( आपटे ) ( ९ ) **संत वाङ्मय**—ज्ञानेश्वरी ( १० ) **शास्त्र**—भारतीय ज्योतिषशास्त्राचा इतिहास ( शं. बा. दीक्षित ).

दहा पुस्तकांची मर्यादा किंचित् वाढविण्याची मला परवानगी दिल्यास राजवाडे यांचे संकीर्ण लेख व मृच्छकटिक किंवा शाकुंतल यांची मी निवड करीन. शेवटचीं दोन नाटकें माझ्या दृष्टीनें सारख्याच योग्यतेचीं आहेत.

[ मुलाखती संपूर्ण दिल्या नाहींत; कांहीं प्रश्नोत्तरेंच उद्धृत केलीं आहेत. ]

—संपादक

# सत्कारसमारंभ व मानपत्रें

## 'केळकर'-ग्रंथ-समर्पण-समारंभ

साहित्यसम्राट् श्री. नरसिंह चिंतामण केळकर यांच्या ६१ व्या वाढदिवसा-प्रीत्यर्थ त्यांस 'केळकर' ग्रंथ समर्पण करण्याचा समारंभ, या समारंभासाठींच स्थापन झालेल्या केळकर-वाढदिवस-मंडळातर्फें ता. २४ रोजीं पुणें टिळक स्मारक-मंदिराच्या विस्तीर्ण पटांगणावर वऱ्हाडचे पुढारी **लोकनायक माधव रावजी अणे** यांच्या अध्यक्षतेखालीं अपूर्व उत्साहानें व थाटानें साजरा करण्यांत आला.

पुण्यांत हा मुख्य समारंभ होण्यापूर्वी ता. २२ रोजीं बृहन्महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं अनेक संस्थांमार्फत श्री. केळकर यांचा जाहीर सत्कार करण्यांत आला व त्यांस ठिकठिकाणीं मानपत्रें व अहेरहि अर्पण करण्यांत आले होते. अशा रीतीनें ठिकठिकाणीं महाराष्ट्रांत केळकरांच्या आदराचें व प्रेमाचें अनेक प्रवाह उत्पन्न झाले त्या सर्वांचा मधुर संगम पुण्यास या समारंभाच्या निमित्तानें होऊन लोकगंगेला विलक्षण पूर आला.

बृहन्महाराष्ट्रांतील म्हणजे बेळगांवपासून नागपूरपर्यंतच्या सर्व भागांतून अनेक संस्थांचे प्रतिनिधि उपस्थित होते. महाराष्ट्रांतील सर्व पक्षांच्या व जातींच्या सुसंस्कृत व निवडक अशा लोकांचें या निमित्तानें एक अपूर्व असें संमेलनच भरलें होतें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. एकंदर या समारंभास पांच हजार स्त्रीपुरुषांचा समुदाय उपस्थित होता. समारंभास बरोबर सहा वाजतां सुरुवात झाली.

संगीतनिपुण प्रो. विनायकराव पटवर्धन यांनीं आपल्या मधुर स्वागतपर गायनानें सभामंडपांत शांतता प्रस्थापित केल्यावर समारंभाचे स्वागताध्यक्ष **श्री. अण्णासाहेब भोपटकर** यांचें भाषण झालें. ते म्हणाले,

" दे. भ. तात्यासाहेब केळकर, लोकनायक बापूजी अणे व बंधुभगिनींनो--

केळकर-वाढदिवस-मंडळाच्या निमंत्रणाचा स्वीकार करून आपण सर्वजण या समारंभास उपस्थित झालां आहांत, याबद्दल सदरहु मंडळाच्या तर्फेनें मी आपलें अंतःकरणपूर्वक स्वागत करतों व आपले आभार मानतों.

गेल्या शंभर वर्षांत बृहन्महाराष्ट्रांत जे दहा-पांच थोर पुरुष निर्माण झाले, त्यांमध्यें तात्यासाहेबांची गणना कोणालाहि करावी लागेल. इतकी सरस व बहुमोल सेवा त्यांनीं आपल्या राष्ट्राची, समाजाची, धर्माची व वाङ्मयाची केलेली आहे. त्या सेवेचें यथार्थ स्वरूप जाणण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांनीं आमचा ग्रंथ लक्षपूर्वक वाचल्यावांचून राहूं नये.

सध्याची देशस्थिति उत्सव-समारंभाला अनुकूल नाहीं, ती अनुकूल असती तर तात्यासाहेबांच्या योग्यतेस साजेलं असा भरीव अहेर अर्पण करण्याची व इतर तऱ्हेनें समारंभ मोठ्या प्रमाणावर करून आपली कृतज्ञता व्यक्त करण्याची आमची

फार इच्छा होती. पण समारंभास अजिबात फांटा देण्याची तात्यासाहेबांची सूचना मात्र आम्हांस मान्य होईना आणि त्याचें कारण हें कीं, परिस्थिति सर्वस्वीं अनुकूल नसली तरी नित्य–नैमित्तिक लक्षांत घेऊन तो तो प्रसंग त्या त्या वेळीं कांहीं प्रमाणांत तरी साजरा करावाच लागतो व आपण करीतहि असतों.

ह्याच न्यायानें तात्यासाहेबांच्या ६१ व्या वाढदिवसाचा हा प्रसंग अगदींच सुना जाऊं देणें आम्हांस प्रशस्त वाटेना. प्रसंग कांहीं कोणाकरितां थांबून रहात नाहीं. आणि ६१ व्या वाढदिवसासारखा प्रसंग उपस्थित झाला असतां, तात्यासाहेबांना आयुरारोग्य चिंतणें व त्यांच्या अनेकविध कामगिरीबद्दल महाराष्ट्राला त्यांचेविषयीं वाटणारा पूज्यभाव व्यक्त करणें, हें महाराष्ट्राचें केवळ कर्तव्य होय. कोणत्याहि सबबीवर तें टाळणें कृतघ्नपणाचें झालें असतें. आणि म्हणूनच परिस्थिति कांहींशी अनुकूल नाहीं ही तात्यासाहेबांची नाजूक भावना दुखवूनहि कांहीं आग्रह, कांहीं भीड, व कांहीं राग या उपायांनीं आम्ही त्यांची संमति शेवटीं मिळविलीच; व परिस्थिति ठीक असती तर तात्यासाहेबांच्या योग्यतेस साजेल अशा जेवढ्या मोठ्या प्रमाणावर हा समारंभ केला असता, तेवढा नसला तरी, कांहीं प्रमाणांत तरी तो करण्याचें आम्ही निश्चित केलें.”

यानंतर ‘केळकर’ ग्रंथाची रूपरेषा थोडक्यांत सांगून ते पुढें म्हणाले,

“ वाढदिवस–मंडळानें योजिल्याप्रमाणें हा ग्रंथ तयार करण्याच्या कामीं अनेकांनीं अनेक प्रकारचें साहाय्य मंडळास वेळोवेळीं केलें, त्याबद्दल मंडळातर्फें मी सर्वांचे साकल्यानें मनःपूर्वक आभार मानतों.

ग्रंथाची पहिली आवृत्ति तो प्रसिद्ध होण्यापूर्वींच म्हणजे ता. १४ ऑगस्टला खलास झाली. ग्रंथ प्रसिद्ध होण्यापूर्वींच त्याची पहिली आवृत्ति खलास व्हावी, व वाढती मागणी भागविण्यासाठीं दुसरी आवृत्ति झपाट्यानें काढण्याची गरज भासावी असा सुयोग, मला वाटतें, मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रांत फारच थोड्या ग्रंथांच्या नशिबीं आलेला असेल; किंबहुना, कोणत्याहि ग्रंथाच्या नशिबीं आलेला नसेलहि. यावरून आमच्या ग्रंथाची योग्यता व दे. भ. तात्यासाहेब यांची लोकप्रियता कोणाच्याहि निदर्शनास आल्यावांचून रहाणार नाहीं.

आमच्या मंडळानें ग्रंथाची योजना केली, कवीनें कविता रचिल्या, लेखकांनीं लेख लिहिले, छापखानेवाल्यांनीं छापण्याची सिद्धता केली, व ग्रंथ समारंभानें अर्पण करण्याचे बेत झाले; परंतु “ सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः” या न्यायानें सर्व गोष्टी पार पाडण्यास पैशाची जरूरी होतीच. परंतु तात्यासाहेबांच्या भक्तांनीं व अनुयायांनीं मंडळास या बाबतींत अत्यंत उल्हासानें ताबडतोब निश्चित केलें, हें कळविण्यास मला अतिशय आनंद वाटतो, व याबद्दल मी मंडळातर्फें त्या सर्वांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतों.

अशा प्रकारें सर्व सिद्धता झाल्यावर या समारंभाचे अध्यक्षस्थानीं कोणाची योजना करावी, याबद्दल मंडळ विवंचनेंत असतां लोकनायक बापूजी अणे यांची

तुरुंगांतून सुटका झाल्याबद्दलची सुखवार्ता आम्ही वर्तमानपत्रांतून वाचली. त्या-बरोबर आम्ही त्यांना या समारंभाचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल विनंति केली व ती त्यांनीं लगेच मान्य केली. लोकमान्यांच्या एका पट्टशिष्याच्या ६१ व्या वाढदिवसाचा समारंभ त्यांच्या दुसऱ्या एका पट्टशिष्याच्या अध्यक्षतेखालीं साजरा करणें, यापेक्षां दुसरा कोणता शुभ व उचित योगायोग असूं शकेल? तेव्हां जास्त पाल्हाळ न करतां, मी अशी सूचना करतों कीं, या समारंभाचें अध्यक्षस्थान माझे मित्र **लोकनायक बापूजी** अणे यांनीं स्वीकारावें, व समारंभाचा कार्यक्रम पार पाडावा.''

स्वागताध्यक्षांचें भाषण झाल्यानंतर अध्यक्षांच्या सूचनेला नगरशेठ **रा. ब. हणमंतराम रामनाथ** यांनीं अनुमोदन दिलें. त्याचप्रमाणें **डॉ. वेलकर** यांचें अनुमोदनात्मक भाषण झाल्यावर **श्री. बापूजी अणे** यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें. त्यांस पुष्पहार समर्पण केल्यावर मंडळाचे एक चिटणीस प्रो. रानडे यांनीं समारंभास सहानुभूति दाखविण्यासाठीं आलेले कांहीं संदेश वाचून दाखविले.

**एकंदर संदेश सुमारें ५०० च्यावर** व हिंदुस्थानच्या कानाकोंपऱ्यांतून आले होते. त्यांत राजेरजवाडे, सरदार, जहागिरदार, वृत्तपत्रकार, अनेक वाङ्मय-संस्था, राजकारणी संस्था व व्यक्तिशः अनेक गृहस्थ यांचा समावेश झाला होता. संदेश निवेदनानंतर **श्री. अणे** यांचें भाषण झालें. ते म्हणाले—

''सार्वजनिकरीत्या ज्यांचा असा ६१वा वाढदिवस साजरा झाला असे लोक फार थोडे आहेत. लो. टिळकांच्यानंतर असा हा मोठा समारंभ हाच असावा असें मला वाटतें. गुरु आणि शिष्य यांची ही जोडी खरोखरीच अनुरूप आहे. लोकमान्यांनीं श्री. केळकर यांची जी निवड केली ती खरोखरीच अनाठायीं नव्हती ही गोष्ट लोकमान्य कारागृहांत गेले त्यावेळीं लोकांच्या ध्यानीं आपोआप आलीच. लोकमान्य मंडालेच्या तुरुंगांतून सुटून आल्यावर श्री. केळकर यांना हुरूप येऊन पुढची कामगिरी जोरानें करतां आली. पण पुढें म्हणजे लोकमान्यानंतर सर्व बाजूंनीं आपत्ति आली असतां श्री. केळकर यांनीं जी कामगिरी केली ती स्वतःच्या कर्तबगारीवरच केली ही गोष्ट विसरून चालावयाचें नाहीं. त्यांनीं 'केसरी' ची इभ्रत व इज्जत वाढवून लो. टिळकांचें वैशिष्ट्य राखलें असें म्हणण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं.

लो. टिळकांचे पुष्कळ शिष्य आहेत. पण त्यांच्या कार्याची जाणीव बाळगून त्याप्रमाणें कार्य करणारा एखादाच सांपडतो. ही जाणीव केळकर यांना उत्तम असल्यानें त्यांनीं लोकमान्यांस अनृणी करून सोडलें. त्यांनीं त्यांचे सर्व लेख छापून प्रसिद्ध केले. तात्यासाहेबांच्या परिश्रमाचें दुसरें पूर्ण फल म्हणजे टिळक-मंदिर होय. श्री. केळकर यांनीं आपले अनेक व्याप संभाळून या गोष्टी केल्या हे लक्षांत ठेवण्यासारखें आहे. श्री. केळकर हे असेंब्लींत असतांना त्यांची काम करण्याची पद्धति पाहाण्याचा मला योग आला होता. त्यांचीं असेंब्लींमधील

भाषणें वाचावींत म्हणजे आपली खात्री होईल कीं, तीं कोणत्याहि कसलेल्या तज्ज्ञांपेक्षां निःसंशय भारदस्त व नवीन माहितीनें पूर्ण अशींच आहेत. त्यांच्या बुद्धीची ग्राहकता खरोखरीच विशाल आहे. असेंब्लीचें काम सांभाळून त्यांना आपल्या पत्राकरितां बातमीपत्रें व लेख लिहावे लागत ते निराळेच. यावरून वर जें मी विधान केलें तें बरोबरच असल्याबद्दल आपली खात्री होईल.

वाङ्मयांत मोकळें मैदान सांपडल्यानें त्यांनीं दाखविलेली बुद्धिमत्ता खरोखरीच वाखाणण्यासारखी आहे. वाङ्मयाची सेवा करून त्यांनीं आपल्या मायभाषेची फारच मोठी सेवा केली. असे पुरुष खरोखरीच विरळा. कारण त्यांच्या तोडीचा एखादा तरी सांपडेल काय, असा मी शोध घेऊं लागलों तेव्हां बंगालमधील **कै. रमेशचंद्र दत्त** यांचें नांव माझ्या डोळ्यांसमोर उभें राहिलें. त्यांनींहि श्री. केळकर यांच्याप्रमाणें आपल्या भाषेची अनुपम सेवा केली. राजकारणांत त्यांचा दर्जा खरोखरीच श्रेष्ठ होता. राजकारणांत धक्केचपेटे सोसून वाङ्मयनिर्मिती करणें खरोखरीच दुर्घट काम आहे व तें करण्याची जी कुशलता श्री. तात्यासाहेब यांनीं दाखविली त्याबद्दल त्यांना साहित्याचार्य असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. श्री.केळकर यांनीं आपल्या वाङ्मयाच्या द्वारें लोकांना नवीन वळण लावलें यांत नाहीं.

असो. एवंगुणविशिष्ट श्री. केळकर यांना राष्ट्रपुरोहित म्हटल्यास वावगें होणार नाहीं. जो स्वतः तीन वेदांचें अध्ययन करून त्याप्रमाणें आचरण ठेवतो तोच खरा राष्ट्रपुरोहित होय. अशा तऱ्हेचे पुरोहित ज्या राष्ट्रांत निर्माण होतात त्यांतील सर्व समाजाचें बळ आपोआपच वृद्धिंगत होतें. पूर्वभूमिका न सोडतां प्रगति करण्याची त्यांची शिकवण असते. जी गोष्ट श्री. केळकर यांना पटली ती सर्व समाजाला पटेलच असा सर्व वर्गांतील लोकांचा विश्वास आहे. राजकारणांत जरी कांहीं मतभेद असले तरी १९२० ते –३२ सालापर्यंच्या इतिहासलेखकाला श्री. केळकर यांच्या नांवाचा प्रामुख्यानें उल्लेख करावाच लागेल ही गोष्ट निर्विवाद आहे. श्री. केळकर यांना परमेश्वरानें देशाची सेवा करण्यास उदंड आयुरारोग्य द्यावें अशी मी प्रार्थना करतों.''

श्री. माधवरावजी यांच्या भाषणानंतर श्री. तात्यासाहेब केळकरांस त्यांचे हस्तें ग्रंथसमर्पण करण्यांत आला. यासाठीं केसरीवर सिंह आहेत त्याप्रमाणें चांदीच्या बैठकीवर दोन सिंह असून त्यामागें ग्रंथ ठेवण्याची चांदीची पेटी बनविण्यांत आली. आहे. हें सर्व काम फार सुबक झालें असून तें नाशिकचे श्री. वैशंपायन यांनी फार मेहनतीनें तयार केलें आहे. श्री. तात्यासाहेबांस ग्रंथ समर्पण केल्यानंतर त्यांचें भाषण झालें.

## श्री. न. चिं. केळकर यांचें भाषण

" वाढदिवस–मंडळाचे अध्यक्ष, चालक, सभासद व या ठिकाणीं उपस्थित झालेले सर्व सज्जन स्त्री–पुरुष !

" आज या ठिकाणीं असा व एवढा मोठा समारंभ करून, आपण सर्वांनीं माझा ६१ व्या वर्षाचा वाढदिवस साजरा केला, याबद्दल मी आपणा सर्वांचा अत्यंत ऋणी आहें. त्यांतूनहि प्रथमतः व मुख्यतः या मंडळाचेच आभार मला मानले पाहिजेत. कारण या समारंभाची मूळ कल्पना त्यांचीच असून ती सिद्धीस नेण्याला त्यांना किती श्रम पडले असतील व किती खर्च आला असेल, याची कल्पना मला आहे, व ती आपणा सर्वांनाहि सहजच करतां येईल. वास्तविक मजसंबंधीं असला कोणताहि समारंभ होऊं नये असा प्रथमपासून माझा आग्रह होता. कोणाला हें माझें म्हणणें विश्वसनीय वाटो वा न वाटो; परंतु आहे ती खरी गोष्ट मला जाहीर रीतीनें सांगितलीच पाहिजे. मी सामान्यतः अगदीं रुक्षच नसलों तरी फारसा भावनायुक्त असा मनुष्य नाहीं. आदर, स्नेह, प्रेम यांची भावना व जाणीव हीं असलीं तरी तीं मनोमन साक्ष असावीं, त्यांचें दृश्य बाह्य-स्वरूपांत भडक रंगांत दाखविलेंच पाहिजे असें नाहीं, या मताचा मी आहें. आणि माझी खरी माहिती असणारे लोक सांगूं शकतील कीं, माझ्या स्वभावाचा हा तऱ्हेवाईकपणा किंवा विशेष मी खासगी व सार्वजनिक अशा दोनहि खात्यांमध्यें शक्य तितका सारखाच अमलांत आणण्याचा प्रयत्न यथाशक्ति करीत असतों. यामुळें या समारंभाची कल्पना गेल्या नोव्हेंबरांत, म्हणजे देशांत पूर्ण शांतता नांदत असतां, प्रथम निघाली तेव्हांहि तिला मी जोराचा विरोध केला; व गेल्या जानेवारींत कायदेभंगाची चळवळ सुरू झाली तेव्हां तर ती कल्पना रहित कर-विण्यांत मला प्रत्यक्ष यशहि आलें. पण फिरून गेल्या एप्रिलपासून या कल्पनेचें पुनरुज्जीवन झालें व शेवटीं मित्रप्रेमाची सरशी होऊन, हें नाहीं तें नको असें म्हणत म्हणत असतांहि त्या कल्पनेला आजच्या या समारंभाचें स्वरूप आलें. त्यांत अकृत्रिम मित्रप्रेमाचा विजय आहे, व भिडस्त स्वभावाचा पराजय आहे. पण हल्लीं समाजाची स्थिति सर्वच बाजूंनीं विपन्न असल्यामुळें असल्या समारंभाचा आनंद सेवन करतां येण्यासारखी आपली किंवा माझी कोणाचीहि मनःस्थिति नाहीं. म्हणून आज जरी हा समारंभ घडून येत आहे तरी आपणा सर्वांप्रमाणेंच माझेंहि अंतःकरण या प्रसंगीं थोडेंबहुत उदासीन व व्यग्रच आहे !

आतां झालेलीं भाषणें आपण ऐकलींच. त्यांत माझा इतका गुणगौरव केलेला आहे कीं, तो माझ्या हक्काचा माल असें मला मानतां येत नाहीं किंवा तो स्वीकारतां येत नाहीं. तर त्यांत मित्रप्रेमाचा कांहीं पक्षपात व कांहीं अतिशयोक्ति आहे असेंच मला म्हणावें लागतें. उपचाराची भाषाच ठरून गेल्यासारखी असते, म्हणूनहि कदाचित् तें लिहिणारांचा नाइलाज होत असेल. तथापि सुदैवानें मला लोकनिंदा व दूषणें हीं स्तुतिबरोबर, निराळ्या रीतीनें, इतकीं ऐकावयास मिळतात कीं, आज येथें होणाऱ्या, किंबहुना या चारसहा दिवसांत महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं होणाऱ्या, गुणगौरवानें मला मानसिक अजीर्ण होण्याचा संभव नाहीं. जेथें रोग तेथेंच औषध किंवा जेथें विष तेथेंच त्याचा उतारा निर्माण करण्याची सृष्टीची

रीतच आहे. म्हणून ज्या कानांनीं स्तुति त्याच कानांनीं निंदा ऐकण्याचा सराव मला पडला आहे. आणि गणित हा जरी माझा अद्यापि कच्चा राहिलेला असा एक शिक्षणविषय आहे, तरी मनाच्या रेषेच्या वरच्या बाजूला स्तुतीच्या निरनिराळ्या रकमा आणि तिच्या खालीं निंदेच्या निरनिराळ्या रकमा, अशा मांडल्या गेल्या असतां, अंशाचा छेदाशीं जाईल तितका संक्षेप देऊन व्यवहारी अपूर्णांकाचें हें उदाहरण मी बरोबर सोडवूं शकतों याविषयीं अनेक तज्ज्ञ लोक साक्ष देऊं शकतील असा भरंवसा मला वाटतो. पण अशा उदाहरणाच्या सर्वच उत्तरांत सगळाच संक्षेप न जातां कांहीं थोडी बाकीहि केव्हां केव्हां उरूं शकते; व प्रस्तुत उदाहरणांत ती मला अनुकूल अशी उरते असें मला वाटतें. म्हणूनच आजच्यासारखे समारंभ, अप्रिय असले तरी केवळ दुःसह असे वाटत नाहींत. ते तसे दुःसह वाटण्याइतका खरोखरच मी नादान आहें असें माझें मन मला सांगतें तर मी या ठिकाणीं आलोंच नसतों. कित्येक वेळां निंदेविरुद्ध मनांत प्रतिक्रियाहि आपोआप घडते. आणि असेंहि प्रसंग मनुष्यावर येऊं शकतात कीं, शेवटीं विनयाला मर्यादा घालून, आत्मविश्वासानें आत्मसमर्थन करणें ही गोष्ट स्वतःसंबंधानेंहि अहंकाराची न ठरतां केवळ न्यायाच्या आग्रहाची वाटावी, व ती त्यानें करावी.

कोणताहि मनुष्य घेतला तरी, मी वर दर्शविल्याप्रमाणें तें एक व्यवहारी अपूर्णांकाचें उदाहरणच असतें. ईश्वराशिवाय पूर्णगुण असें कोण असूं शकेल ? म्हणून कोणीहि मनुष्य अपूर्णच पण सर्वसाधारणरीत्या एकंदरीनें कसा काय आहे, हें ठरवूनच निर्वाह करून घ्यावा लागतो. आत्मनिरीक्षण करण्याची मला नुसती पात्रताच नव्हे तर संवयहि आहे; म्हणून माझ्या स्वभावांतले व माझ्या कामांतले गुणदोष माझे मलाहि कळतात. तथापि इतक्या उतारवयांत अंगीं असलेले दोष हटकून टाळणें व नसलेले गुण हटकून अंगीं आणणें, ही गोष्ट मला इतरांप्रमाणेंच दुःसाध्य वाटते. कसेंहि असो, आपण माझा जो गौरव करीत आहां त्यामुळें मला धन्यता वाटते ही गोष्ट मी नाकबूल करीन तर मी ढोंगी ठरेन. म्हणून मी ती करीत नाहीं. माझ्या अंगच्या ज्या गोष्टींना विशेष अनुलक्षून आपण माझा गौरव केला त्या तरी आपल्या या उत्तेजनानें वाढोत इतकीच माझी प्रार्थना आहे.

असो. 'वाढदिवस' या शब्दाला प्रेमाच्या पण मनुष्याच्याच बाळपणाच्या आठवणी चिकटून रहात असल्यानें, "६१ वा वाढदिवस" हा शब्दच मनाला मोठा मौजेचा वाटतो. मनुष्यसृष्टीच्या रंगभूमीला एकच दार आहे. आणि तें बाळपण हेंच होय. त्यांतूनच त्या रंगभूमीवर अवतरणाऱ्या पात्रांनीं प्रवेश व निर्गम करावे अशी ईश्वरी योजना दिसते. उतार वय हें दुसरें बाळपणच होय. "Old-age is second child-hood" हें कविवर्य शेक्सपीयर याचें वचन सुप्रसिद्ध आहे; व तें खरेंहि आहे. क्षुधा हटलेला, दांत पडलेला, टक्कल पडलेला, पोंक आलेला काठीच्या आधाराशिवाय चालतांना लटपटणारा, स्मृतिभ्रंश झालेला,

चिरचिरा बनलेला वृद्ध मनुष्य, व एतद्‌गुण लहान मूल यांत किती तरी साम्य आहे! व ही गोष्ट मनाला पटल्यामुळेंच बहुधा बाळपणाप्रमाणें ६१ व्या वर्षापासून वाढदिवसांचे समारंभ पुनः करण्याची आठवण होत असावी. पण इतर रीतीनें समारंभ साजरा झाला तरी मुलाला घुसळखांबावर म्हणजे धारण्यावर चढवितात, तसा साठ वर्षांच्या मुलाला चढवितां येत नाहीं, म्हणून त्या प्रसंगीं त्याची स्तुति करून त्याला लक्षणेनें हरभऱ्याचे झाडावर चढविण्याची कल्पना सुचली असावी! पण नेणतें मूल घुसळखांबावर चढतांना खळखळ करतें तसें जाणतें म्हातारें होऊं घातलेलें मूलहि हरभऱ्याच्या झाडावर चढण्याला खळखळ करतें हा अनुभव या ठिकाणीं आतांच आपणांला आला आहे!

नेणतें बाळपण व जाणतें बाळपण यांतील अधिक चांगलें कोणतें हें ठरविणें कठिण आहे. लहान मूल हें या जगांतल्या अनुभवासंबंधी नेणतें असेल, पण त्याला तेव्हां पूर्वजन्माची आठवण असते म्हणतात. त्याच्या अकारण हास्यरुदनाची मीमांसा तत्त्ववेत्ते वरील मोहक कल्पनेनें करितात. माझ्या गतजन्माची आठवण मलाहि केव्हां असली तरी ती लहानपणीं नष्ट झाली. आतां पुढच्या जन्माचीच "तयारी" करावयाला लागलें पाहिजे. पण त्या जन्माविषयीं झालें तरी अज्ञानच! रेल्वेहून दूर असणाऱ्या गांवीं जाण्याकरितां रेल्वेच्या प्रवासाला निघावें, आणि रेल्वे–गाइडच घरीं विसरावें तशी या मधल्या जन्मांत मनुष्यजीवाची स्थिति होते.

वर्डस्वर्थ मनुष्याच्या जीवयात्रेसंबंधानें म्हणतोः—

"Not in entire forgetfulness  
Not in utter nakedness,  
But trailing clouds of glory  
Do we come from God  
Who is our home"

एखाद्या अपघातानें स्मरणशक्ति नष्ट झालेला मनुष्य घरून निघतो व फिरून त्याला घरींच परत जावयाचें असतें, तथापि मार्ग मात्र सांपडत नाहीं. तसाच हा प्रकार होय. मनुष्याच्या अंगावरचें बाळलेणें, वर्डस्वर्थनें म्हटल्याप्रमाणें ईश्वराघरचेंच घातलेलें आहे. पण रस्त्यांत चुकलेल्या मुलाच्या अंगावरील केवळ दागिन्यांवरून त्याचें घर नक्की सांपडणें जसें हुशार पोलिसालाहि कठिण जातें, त्याप्रमाणें पुढच्या जन्मघराची ओळख या जन्मींच्या कृत्यांवरून आपली आपणांस जेथें लागत नाहीं तेथें इतरांना कशी लागणार? अर्थात् भूत व भविष्य दोहोंचा नाद सोडून विद्यमान स्थितीकडे पाहावें यांतच समाधान आहे.

या दृष्टीनें पाहतां माझ्या आयुष्यांत माझ्या हातून जेवढें कांहीं मला करतां आलें त्याबद्दल मला समाधान वाटतें. आत्मतुष्टि हा अलंकाराचा एक प्रकार

होऊं शकेल. पण मायावी कांगावखोर असंतुष्टता दर्शविणें हा त्याच अहंकाराचा एक अधिक मोटा व दोषास्पद प्रकार होऊं शकतो हें विसरतां येत नाहीं. "केलें यापेक्षां अधिक करतां आलें असतें व अधिक करावयास पाहिजे होतें" या शेऱ्यांतून कोणीहि सुटणार नाहीं. तसाच मीहि. तथापि आपण मजविषयीं काढलेल्या उद्गारांत योग्य तो नागपुरी आंकडा बाद घातला असतां, "मी यथाशक्ति थोडेंबहुत समाजसेवेचें काम केलें" असली आत्मतुष्टतेची भावना त्या उद्गारावरून समर्थनीय ठरेल असें मला वाटतें.

'यापुढें काय ?' हा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. त्यासंबंधानें मी इतकेंच सांगतों कीं, आजवर चालल्याप्रमाणें पुढेंहि होईल तें करीत राहावें अशी मनांतून इच्छा आहे. तथापि प्रकृतीला कमकुवतपणा आतांच भासूं लागला आहे ही गोष्ट खोटी नाहीं. आपण मला आयुरारोग्य लाभावें अशी प्रार्थना मानपत्रांत केली ती ठीकच आहे. पण अशी प्रार्थना करण्याची वेळ आली हेंच हा वाढदिवसाचा समारंभ सुचवीत नाहीं काय ? आजच्या समारंभाला टाइपरायटरवर वाजणाऱ्या घंटेची उपमा द्यावीशी वाटते. या घंटेचा नाद गोड असतो, घंटा वाजल्यावरहि चार–दोन अक्षरें लिहितां येतील इतकी जागा असते. यामुळें आरंभिलेला शब्द तरी पुरा करूं, सोडून द्यावा लागणार नाहीं, अशी खात्री असते. पण मात्र तो तेवढाच शब्द ! यामुळें या मंजुळ घंटानादाला धोक्याचें निदान सावधगिरीच्या सूचनेचें स्वरूप येतें. आजच्या ६१ व्या वाढदिवसाच्या समारंभांतील भाषणें टाइपरायटरच्या घंटेसारखींच नादमधुर होतीं. पण त्यांना माझ्या हातून झालेल्या कामगिरीच्या समारोपाचें स्वरूप आहे. उपक्रमाच्या सूचनेचें स्वरूप नाहीं, असें मी समजतों. अर्थात् जो थोडा काळ यापुढें उरला त्याचा उपयोग कसा करावयाचा हा प्रश्न मनांत आल्यावर मन असें सांगतें कीं, आजवरची कामाची मामुली पद्धति म्हणजे अनेक कार्यें एकाच वेळीं करीत राहण्याची पद्धति सोडून द्यावी, व कोणतें तरी एखादेंच काम हातीं घेऊन, मिळेल तो सर्व सवडीचा वेळ खर्चून तेंच करावें, म्हणजे तें कदाचित् मनासारखें होईल, व त्याला कांहीं स्वरूपहि येईल. आजवर माझ्या मुख्य व्यवसायाशिवाय, लोकांच्या शिफारशी करणें, चिठ्याचपाट्या लिहून देणें, हस्तलिखितें वाचणें, अभिप्राय देणें, प्रस्तावना लिहिणें इत्यादि गोष्टी मी इतक्या केल्या व निरनिराळ्या संस्थांच्या कार्यकारी मंडळांवरहि इतकें काम केलें कीं, आता यापुढें सर्व सोडून दिलें आहे, असें मी म्हटल्यास निराशा होणारे लोकहि यापुढे मला क्षमाच करतील. केसरीचा संचालक म्हणून शक्य असेल तें राजकारण व लेखन आणि अद्यापि लिहिण्याचे राहिलेले कांहीं वाङ्मयप्रकार या दोन कामांवरच मिळेल तो वेळ व शक्ति यापुढें खर्च करावी अशी निदान इच्छा आहे. काय घडेल तें खरें !

वाङ्मयप्रेम ही एक प्रकारची खोड आहे. "जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाहीं" ही म्हण प्रसिद्धच आहे व ती मलाहि लागू पडणार असें वाटतें.

वर आत्मसंतुष्टतेचा जो मी उल्लेख केला त्यांत मुख्य भाग वाङ्मयसेवेलाच उद्दे-शून होता. म्हणून शेवटीं या समाधानाच्या उद्गाराला केवळ वाचेपेक्षां कांहीं निराळ्या प्रकारानें स्वरूप द्यावें असें वाटतें. तरी त्यासंबंधीं दोन शब्द सांगून हें आभारप्रदर्शक भाषण मी पुरें करणार आहें. वाङ्मयसेवेचा आनंद मला सर्व जन्म-भर पुरला. प्रथम कांहीं वर्षें माझी सेवा कसोटीला लावण्याकरितां, वाङ्मयानें मला कांहींच वेतन किंवा मुशाहिरा दिला नाहीं. या ३६ वर्षांतील जवळ जवळ निम्मा काळ तसा गेला असें म्हणतां येईल. पण नोकराची सेवा पसंत पडल्यास नेहमींच ती निर्वेतन घेण्याचें निष्ठुर काम वाङ्मय झालें तरी कां करील ? त्याप्रमाणें पुढील १९–२० वर्षांत वाङ्मयानें मला सुमारें ३० हजार रुपयांची प्राप्ति करून दिली. अद्यापि महाराष्ट्रांत केवळ वाङ्मयावर उपजीविका करणें अशक्य किंवा निदान फार कठिण आहे. अशा स्थितींत झाला या द्रव्यलाभाबद्दल मला कृतज्ञ-ताच वाटली पाहिजे. आतां कृतज्ञता या शब्दाचा अर्थ एका विनोदी इंग्रज ग्रंथकारानें "अधिक लाभ होण्याची आकांक्षा" असा केला आहे. पण थट्टा म्हणून ही सोडून दिली तर, किंवा तो अर्थ अंशतः बरोबर म्हणून स्वीकारला तरीहि, कृत-ज्ञता याचा अर्थ 'उपकाराची फेड' असाच केला पाहिजे. म्हणून वाङ्मयाच्या उपकाराची फेड करण्याची एक योजना मी केली आहे. ती अशीः—महाराष्ट्र युनिव्हर्सिटीची कल्पना अद्यापि असिद्ध आहे व अमूर्तहि आहे. तिला निश्चित रूप व प्रत्यक्ष सिद्धि केव्हां लाभेल ती लाभो. पण ती केव्हां तरी लाभेल अशी माझी श्रद्धा आहे. ती गोष्ट माझ्या हयातींत होऊं शकत नाहीं; तथापि ती होईल तेव्हां माझा कांहीं तरी पै पैसा तिच्या कारणीं खर्च पडावा अशी माझी इच्छा आहे. महाराष्ट्र विद्यापीठ स्थापन झालें म्हणजे मराठी भाषेचें दैन्य संपलें, तिचे पांग फिटले, व सर्व प्रकारच्या उच्च संस्कृतीचा सुलभ लाभ तिच्या द्वारें समाजांतील सर्व वर्गांच्या लोकांना होण्याची कायम व्यवस्था झाली असें मी मानतों. म्हणून त्या भावी कार्याला मदत करण्याकरितां आज मी पुणें येथील भारत–इतिहास–संशोधक मंडळाचे पांच टक्के व्याजाचे आठ हजार रुपयांचे कर्ज–रोखे खरेदी केले आणि वरील उद्देशानें त्या रकमेची स्वत्वनिवृत्ति करण्याकरितां ते कर्ज–रोखे (१) सेक्रेटरी, डेक्कन् एज्युकेशन् सोसायटी ( २ ) सेक्रेटरी, शिक्षणप्रसारक मंडळ यांचे नांवें मालकी लिहून त्यांचे स्वाधीन केले आहेत.

महाराष्ट्र युनिव्हर्सिटी ज्या वेळीं सरकारी कायद्यानें अस्तित्वांत येईल त्या वेळीं ही सर्व रक्कम त्या युनिव्हर्सिटीच्या अधिकृत मंडळाच्या स्वाधीन केली जाईल. तोंपर्यंत दरसाल–निधिधारकांकडून त्या रकमेवरील व्याज घेऊन तें मी मराठी वाङ्मयाच्या अभिवृद्धीकरितां खर्च करीत जाईन. शिष्यवृत्ति, पारितोषिक, सुवर्ण-पदक किंवा ग्रंथप्रसिद्धीला मदत, यांपैकीं कोणत्या ना कोणत्या रूपानें दरसालच्या व्याजाची रक्कम पुढें ठरेल त्याप्रमाणें खर्च होईल. ही रक्कम मी माझ्या वडील मातोश्रींच्या स्मरणार्थ देऊं इच्छित आहें. म्हणून त्यासंबंधानें कांहीं कायमची

योजना मित्रमंडळींचा सल्ला घेऊन मी सवडीनें करीन. आज मी इतकेंच सांगूं इच्छितों कीं, वडील–मातोश्रींच्या स्मरणार्थ आठ हजार रुपयांची रक्कम मी बाजूस काढून ती स्वतंत्र निधिधारकांचे हातीं देऊन मी त्यावरील स्वत्वनिवृत्ति केली आहे. त्याच्या खर्चाची योजना होईल ती मागाहून प्रसिद्ध करीन. तशाच इतर दोन देणग्याहि या प्रसंगीं मला द्यावयाच्या आहेत. माझ्या कुटुंबाची श्रद्धा गोरक्षणाच्या कार्यावर आहे, म्हणून त्याकरितां गोभक्तिपरायण श्री. चौंडेमहाराज यांच्या गोरक्षण संस्थेला माझे कुटुंबाची म्हणून एक हजार रुपयांची देणगी मी देत आहें. दुसरी देणगी सातशें रुपयांची प्रो. कर्वे यांनीं स्थापिलेल्या महिला–विद्यापीठाला मला द्यावयाची आहे. या संस्थेला मी पूर्वीं तीनशें रुपये दिले आहेत. त्यांचे भरतीला सातशें रुपये घालून मी आज त्या संस्थेचा आश्रयदाता झालों आहें.

या देणग्यासंबंधानें मला हें मुद्दाम सांगावयाचें आहे कीं, नऊ हजार सातशें रुपयांची रक्कम केवळ मला स्वतंत्र ग्रंथ-लेखानें मिळालेल्या पैशांतूनच मी खर्च करीत आहें. त्यांत केसरीकडून मिळणाऱ्या पगाराचा कांहीं संबंध नाहीं. कोणत्याहि उद्योगधंद्यानें मिळालेल्या पैशापैकीं कांहीं अंश त्या उद्योगधंद्याला करभार म्हणून प्रत्येक मनुष्यानें देणें योग्य आहे. शिवाय धंद्यांतील मिळकत परत धंदा वाढविण्याकडेच खर्च व्हावी हा अर्थशास्त्राचा एक नियम आहे. म्हणून इतर अनेक सत्कार्यें डोळ्यापुढें येत असतांहि ही माझी लहानशी देणगी वाङ्मयाच्या अभिवृद्धीकडेच मी स्वाभाविकपणें देत आहें. ही देणगी वाङ्मय लिहून मिळालेल्या पैशांतून देण्याइतकी सुस्थिति मला प्राप्त झाली त्याचेंहि श्रेय मनानें मी सर्वस्वीं कै. लो. टिळक यांचेकडेच देत आहें. सत्संगतीचा लाभ केव्हांहि श्रेयस्कर व फलप्रदच होतो. मला केसरी–मराठा संस्थेला येऊन मिळण्याची संधि देण्याची इच्छा लो. टिळकांना व्हावी; ती संधि घेण्याची इच्छा मला व्हावी, आणि या संस्थेंत ३६ वर्षांहून अधिक काळपर्यंत मी स्थिरपद होऊन तिची सेवा मला करतां यावी, हा सर्वस्वी सुदैवयोग होय. आणि आपल्या सुदैवाबद्दल आनंदानें उल्लेख करणें यांत कोणत्याहि प्रकारें अहंकारबुद्धि नाहीं. आज ३६ वर्षे माझी लोकयात्रा नीट चालली. माझ्या आवडीचा व्यवसाय सतत भरपूर माझ्या हातून घडला. लौकिक दृष्ट्या यश किंवा कीर्ति ज्याला म्हणतात त्याचा थोडाबहुत लाभ मला झाला; व समाजोपयोगी असें कांहीं कार्य माझ्या हातून झालें; हें सर्व लो. टिळकांचा व त्यांच्या संस्थेचा संबंध मला दैवयोगानें जडवून दिल्यामुळेंच घडलें. म्हणून यांत माझा भाग्योदय असेल तो सर्वच एक प्रकारचें माझें 'हलवायाच्या घरावर तुळशीपत्र' म्हणण्यास हरकत नाहीं; किंवा तसें उघड म्हणण्याला मी आनंदानें तयारहि आहें; कारण अहंकारबुद्धि धरल्याशिवाय तें मला म्हणतां येतें. जगांत मित्रसंबंध हा पुत्रसंबंधासारखाच जिव्हाळ्याचा मानितां येईल. एखाद्या भाग्यवान् पुरुषाच्या पोटीं पुत्र म्हणून जन्माला येणें काय, व सहकारी विश्वासू मित्र म्हणून त्याचा संगतिलाभ घडणें काय, हे दोनहि यदृच्छालाभ होत. कदा-

चित् फरक असला तर तो इतकाच म्हणतां येईल कीं भाग्यवानाच्या पोटीं जन्माला येण्याला स्वतः पुत्रानें कांहींच केलेलें नसतें; पण मित्राचा संबंध येऊन तो टिकणें-टिकविणें या गोष्टीला मनुष्याचा कांहीं तरी स्वतःचा म्हणून उद्योग, बुद्धिमत्ता, सत्प्रवृत्ति इत्यादि गुण खर्चीं पडावे लागतात. एवढी गोष्ट लक्षांत घेतली असतां, उपयुक्त व उपकारक अशा स्वरूपाचें जें जें म्हणून मला कांहीं करतां आलें तें तें, लो. टिळकांच्या पुण्याईच्या हलवाई दुकानावर मी माझें तुळशीपत्र ठेवलें असेंच समजतों. लोकमान्यांच्या हयातींत तीन लक्ष रु. जमवून त्यांचें चिरोल केसचें कर्ज फेडलें व त्यांच्या मागें १२ वर्षें केसरीसंस्था टिकवून फिरून तीन लक्ष रुपये देऊन मित्रऋणहि मी फेडलें हें जसें त्या लोकमान्य हलवायाच्या बरावर तुळशीपत्र, तसेंच आज दोन-तीन देणग्यांच्या रूपानें मी जे सुमारें १० हजार रुपये खर्च करीत आहें हेंहि एका अर्थानें लोकमान्यांच्या पुण्याईच्या व प्रसादाच्या हलवाई दुकानावर तुळशीपत्र होय. असो.

इतकें सांगून व फिरून वाढदिवसमंडळांतील सर्व कार्यकारी लोकांचें व त्यांच्या उत्साहाचें चीज करण्याकरितां जमलेल्या आपणा सर्व मंडळींचे मी कृतज्ञतापूर्वक आभार मानून हें भाषण संपवितों. ''

श्री. केळकर यांच्या भाषणानंतर त्यांस पुण्याबाहेरील व पुण्यांतील अनेक संस्थांतर्फें विविध स्वरूपाचे अनेक प्रकारचे आहेर व पुष्पहार समर्पण करण्यांत आले. त्यांत पुढील संस्थांचा प्रामुख्यानें उल्लेख करतां येईल.

**मुंबई**—मुंबई नगरवासीयांचें केळकर वाढदिवसमंडळ, श्रीलोकमान्य, ब्राह्मण-सभा, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, पाठारे प्रभू सोशल समाज, पैसाफंड, गोग्रास संस्था. **दादर**—माध्यंदिन ब्राह्मणसभा. **ठाणें**—भारतसेवक नाट्यमंडळ. **मिरज**— स्नेहसंवर्धक संघ, मिरज सं प्रजापरिषद्, विद्यार्थीसंघ, अंबाबाई व भानू तालीम, गीतामंडळ. **वांई**—स्वस्तिक संघ, वैराज वसंतव्याख्यानमाला व वांईकर नागरिक. **सांगली**—सार्वजनिक सभा, गजानन मिल्स, सं. प्रजापरिषद्, यूनि-यन क्लब आरोग्यमंडळ, टिळक स्मारकमंदिर. **मोडनिंब**—सार्वजनिक सभा. **सातारा**—सार्वजनिक सभा. **पाचवड**—स्वाध्यायमंदिर. **मडगांव-गोवा**—सरस्वतीसेवक इ० ६ संस्था. **कोल्हापूर**—जनरल लायब्ररी. **नाशिक**—अनाथ वि. गृह. **अकोळ**—( निपाणी ). **नागपूर**—वागीश्वरीमंडळ. **सोलापूर**—साहित्यमंडळ. **नगर**—अनाथ वि.गृह. **उगार**—ग्रामसेवामंडळ. **बोरखळ**—सार्वजनिक सभा. **पुणें**—भारत स्व. से. मंडळ, आयुर्वेदीय रसशाळा, वक्तृत्वोत्ते-जक सभा, महाराष्ट्र चित्रकारमंडळ, नि. भा. आयुर्वेद महामंडळ, संभाजीमंडळ, वारकरीमंडळ, शेतकरी हितवर्धकमंडळ, हिंदुधर्म मठ, सन्मित्र समाज मेळा, वैदिक संशोधन मंडळ, व्हिक्टोरिया टेलरिंग कॉलेज, गोपाळ गायन समाज, बोहरी समाज, वेदशास्त्रोत्तेजक सभा, अस्पृश्यतानिवारक मंडळ, शिवचरित्रकार्या-लय, सारस्वतसेवासंघ, पंचांगप्रवर्तन कमिटी, नाट्यचित्रवस्तुसंग्रहालय, राष्ट्रीय

भैरवनाथमंडळ, हिंदु महासभा, लोकमान्य पंथ, महाराष्ट्र स्वदेशी संघ, मर्चंट्स को–ऑपरेटिव्ह बँक, व्यापारीमंडळ, गीताधर्ममंडळ, आनंद प्रेस, डे. ए. सोसायटी, गीर्वाणवाग्वर्धिनी सभा, नगर वाचनमंदिर, दलितसेवा–संघ, महाराष्ट्रीय व्यायामशाळा, वसंत व्या. माला, डे. इं. ऑफ कॉमर्स, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, शिक्षणप्रसारकमंडळ, मुंबई इ. प्रा. शिक्षक संघ, पोस्टल यूनियन, आर. एम. सर्व्हिस बी डिव्हिजन, यजुःशाखीय ब्राह्मण सभा, राष्ट्रीय शिक्षण मंडळ, डेक्कन–जिमखाना, गणेश महादेव आणि मंडळी, बडोदें साहित्यसेवक, बृहन्महाराष्ट्र ब्रा. परिषद्, गोवर्धनसंस्था पुणें व वांई, भारतमित्र समाज मेळा, मध्वसिद्धान्तप्रचारिणी सभा शाखा, चित्रमयजगत् पुणें, त्वष्टाकासार समाजोन्नति संस्था, कॉमनवेल्थ विमा कंपनी, द. सं. हितवर्धक सभा, ऑ. इं. स्टेट्स परिषद्, द. हैद्राबाद प्रजा परिषद्, दैवज्ञ असोसिएशन, गांधर्व महाविद्यालय, प्रेस–ओनर्स असोसिएशन, ऑ. इं. डि. क्लासेस प्रां. सभा, भारतीय चर्मकार समाज, भारतीय दलितसेवाश्रमसंस्था, महाराष्ट्र ब्राह्मणसभा, ताराचंद रामनाथ धर्मार्थ दवाखाना, **गुर्लेहोसूर**—लोकमान्य वाचनालय. **भगूर**—जाहीर सभा. **पडघवली**—(भोर) शिवाजीउत्सव–संस्था.

या व इतरहि **अनेक संस्था व व्यक्ति** यांजकडून आहेर समर्पण करण्यांत आले. प्रथम महाराष्ट्राचे गुरु श्री. **चाफळकरस्वामी महाराज** यांजकडून आशीर्वचनपर भेट देण्यांत आल्यानंतर मागाहून उपरिनिर्दिष्ट संस्थांकडून सत्कार करण्यांत आला.

या साहित्यसम्राटाच्या चरणावर आपल्या आदराची व प्रेमाची एखादी पाकळी वाहण्यास तरी सांपडावी यासाठी लोकांत अपूर्व ईर्षा दिसून येत होती. दोन स्वयंसेवक पुष्पहार व आहेर घेतांना घामाघूम झाले.

या सत्कारसमारंभानंतर व अध्यक्ष श्री. अणे यांना आहेर समर्पण करण्यांत आल्यावर अध्यक्षांनी थोडक्यांत समारोप केला व श्री. तात्यासाहेबांस त्यांचें इच्छित कार्य तडीस गेलेलें पाहण्याइतकें दीर्घायुष्य लाभो असें सांगितलें. नंतर बडोद्याचें शिल्पकार श्री. डी. एस्. केळकर यांनीं तयार केलेल्या श्री. न. चिं. केळकर यांच्या अर्धपुतळ्याचें अध्यक्षांनीं अनावरण करून त्यास हार घातला. शिल्पकार केळकर यांचा मंडळातर्फें सत्कार करण्यांत आला. डॉक्टर भट यांनीं आभार मानल्यावर राष्ट्रगीत होऊन रात्रीं सुमारें ९ वाजतां हा गोड आनंददायक समारंभ समाप्त झाला.

# केसरी संस्थेंतील हृदयस्पर्शी समारंभ

ता. २४।८।३२ रोजीं सकाळीं केसरी—मराठा संस्थेचें सर्व कामगार व संपादक-मंडळ यांतर्फें **श्री. तात्यासाहेब केळकर** यांना मानपत्र व आहेर समर्पण करण्याचा समारंभ गायकवाडवाड्यांतील नुकत्याच बांधलेल्या ग्रंथशाळेच्या भव्य दिवाणखान्यांत करण्यांत आला. श्री. दा. वि. गोखले यांनीं समारंभाला कौटुंबिक स्वरूप कसें आहे हें विशद करून, श्री. बाबासाहेब विद्वांस यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी विनंति केली व श्री. घोटणें यांनीं अनुमोदन दिलें. अध्यक्ष श्री. धोंडोपंत विद्वांस यानीं केळकरांना मानपत्र अर्पण केरणें म्हणजे एक प्रकारें डाव्या हातानें उजव्या हाताला मानपत्र देण्यासारखेंच होतें. तथापि या दोन्ही डाव्या उजव्या हातांनीं टिळकांच्या हयातींत व त्यानंतरहि एकोप्यानें व गोडीनें सारखीं ३६ वर्षें एकत्र काम केलें, अनेक सुखदुःखांचे प्रसंग अनुभविले, खस्ता खाल्ल्या, निंदा व स्तुति हीं दोन्हीहि समान मानून व आपल्याला ही केसरी संस्था टिकवावयाची आहे असें समजून नेटानें व निर्धारानें कसें काम केलें त्याची आठवण होऊन श्री. विद्वांस व केळकर या दोघानांहि भाषण करितांना उमाळ्यावर उमाळे येत होते. व त्यांची ती स्थिति पाहून प्रेक्षकांनाहि गहिंवरून आल्याशिवाय राहिलें नाहीं. श्री. विद्वांस यांनीं संस्थेचा आतांपर्यंतचा इतिहास व त्यांतील तात्यासाहेबांची कामगिरी वर्णन करणारें आपलें भाषण श्री. धारप यांना वाचावयास सांगितलें. तें वाचून झाल्यावर श्री. वा. कृ. भावे यांनी मानपत्र वाचून दाखविलें. नंतर बाबासाहेबांनी तात्यासाहेबांना चांदीच्या तबकांतून मानपत्र व पगडी, चांदीची फुलदाणीवगैरे आहेर अर्पण केला.

उत्तरादाखल भाषण करतांना **केळकर** म्हणाले—“आजच्या प्रसंगीं मीहि बाबांचें अनुकरण करून माझें भाषण लिहून आणून कोणी तें वाचलें असतें तर बरें झालें असतें असें आतां मला वाटतें. पण आलेल्या प्रसंगाला तोंड देऊन तो कसा तरी निभावून नेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. बाप, आई आणि मुलें मिळून कुटुंब होतें अशी एकानें व्याख्या केली आहे. त्या बिचाऱ्याला काय माहीत कीं कुटुंबाची व्याप्ति याहिपेक्षां मोठी असूं शकते. केसरी संस्थेंतील आपण माणसें म्हणजे व्यापक अर्थानें कुटुंबच आहोंत. आज ही संस्था इतक्या उर्जितावस्थेला आली असली तरी आजच्या प्रसंगीं पूर्वी अनुभविलेल्या सुखदुःखाची आठवण झाल्याशिवाय रहात नाहीं. टिळकांनीं १८९१ सालीं केसरी घेतला. आज केसरी ऑफिसची ही एवढी अवाढव्य जागा व छापखाना आपण पाहतों पण त्यावेळीं केसरीला स्वतःचें ऑफिस अगर छापखाना हीं कांहींच नव्हतीं. विंचुरकरांच्या वाड्यांत डाव्या हातच्या अंगास टिळक रहात. ते फक्त अडीच खण जागेंतच रहात होते. त्या जागेंत बसून त्यांनीं केसरी लिहावा व बाहेर छापून काढावा. पैशाची व ऑफिसची व्यवस्था चित्रशाळेचे

वासुदेवराव जोशी यांनीं पहावी असें होतें. पुढें १८९६ सालीं मी केसरीला येऊन मिळालों त्यावेळीं केसरी कर्जांतच होता ही गोष्ट मी मुद्दाम येथें सांगतों. पुढें १८९७ सालीं टिळकांच्यावर राजद्रोहाचा पहिला खटला झाला त्यावेळीं अशी खडतर वेळ आली कीं, आर्यभूषण छापखान्याचे मॅनेजर हरीपंत गोखले यांनीं अवचित सांगितलें कीं, केसरी छापण्याची व्यवस्था तुम्ही दुसरीकडे करा. तेव्हां टिळकांनीं त्यावेळीं हाताशीं असलेले बाबा विद्वांस यांना ऑफिसचें काम सांगितलें व मला ही गोष्ट पक्की आठवते कीं त्यावेळीं विंचुरकरांच्या घरांतील पुढल्या अर्ध्या खणांत न पुसलेलीं किंवा रंधलीं सवरलेलीं तीन देवदारी खोकीं मांडून बाबांनीं कामाला सुरुवात केली. ही गोष्ट मी डोळ्यांनीं पाहिलेली आहे. ही केसरीच्या पहिल्या ऑफिसची स्थिति. पुढें १९०१ सालीं ताईमहाराजांचा खटला निघाला. त्यावेळीं तर टिळक कर्जांत बुडूनच गेले होते. लॉ क्लास बंद केल्यानें तेंहि उत्पन्न नव्हतें; पण केसरी चालवून दुसरीकडे ताईमहाराजांचा खटला टिळक लढत होते. खटला सुरू झाला म्हणजे किती तोंडानें खर्च सुरू होतो हें आपणांस माहीत आहेच. एकीकडे कामाची चिंता व दुसरीकडे पैसा कोठून द्यावयाचा ही विवंचना. या खटल्यांत कित्येक प्रसंगीं तक्रार सांगण्याकरितां मी स्वतः अनेकदां वकीलपत्रें हजर करून काम चालविलें आहे. १९०४ सालीं फौजदारी खटल्यांत टिळक निर्दोषी सुटले तेव्हां पैशाची विवंचना कमी न झाली तरी हृदयावरचें एक मोठें दडपण किंवा ओझें हलकें झालें असें वाटलें. तेथून जरा जम बसतो तों सुरत कॉंग्रेसची वेळ आली. टिळक पैसा मिळवीत तसा तो खर्चहि करीत. एकट्या टिळकांनीं या कॉंग्रेसच्या वेळीं आपल्या पदरचे ७००० रुपये खर्च केले ही गोष्ट कोणाला सांगून तरी खरी वाटेल काय? १९०८ सालीं टिळकांना सहा वर्षें काळेपाण्याची शिक्षा झाली तेव्हांचे दिवस अत्यंत चिंतेंत गेले. केसरी जगला म्हणजे मिळविली असें वाटूं लागलें. टिळकांना वासुदेवराव जोशांनीं मदत केली तशी अनेक प्रसंगीं शंकरराव जोशी यांचीहि मदत मला झाली हें सांगितलें पाहिजे. त्यांना खरोखर मी भाऊ मानतों. केसरीकडून १९१२ सालीं जामिनकी मागण्यांत आली ती रविवारीं रात्रीं व फक्त सोमवारचा एकच दिवस-मध्यें होता. त्या वेळची सांपत्तिक स्थिती इतकी चमत्कारिक होती कीं, जामि-नकीचे पाच हजार रुपये द्यावयाला केसरीची शिल्लक नव्हती, तेव्हां बाबांनीं व मी स्वतःच्या विम्याची पॉलिसी गहाण टाकून त्याच्या तारणावर पांच हजार रुपये भरण्याचें ठरविलें. पुढें उरवणे शेटजींनीं टिळकांच्या प्रेमाखातर अयाचित रीतीनें मदत करून पांच हजार रुपये कर्जाऊ दिले. पुढें टिळक सुटून आल्यानंतर १९१४ सालीं युद्धाचा सूर लागला आणि तेथून केसरीच्या सुस्थितीला सुरवात झाली असें म्हणतां येईल. नंतर होमरूल लीगची चळवळ निघाली आणि टिळकांच्या कामाचा व्याप व हिम्मत तर एवढी दांडगी पहा कीं, मिळालेल्या लाखाच्या पर्सपैकीं एकदम एका रकमेनें पन्नास हजार रुपये त्यांनीं परदेशांत

चळवळ करण्याकरितां डॉ. रवींद्रनाथ टागोर यांना पाठवून दिले. पुढें रवींद्रनाथ-बाबू परदेशला गेले नाहींत ही गोष्ट निराळी व ती रक्कम त्यांनीं परत केली. त्यानंतर झालेल्या चिरोल खटल्यानें तर टिळकांना तीन लक्ष रुपयांचें कर्ज झालें व आम्हीं त्यांना पर्स देण्याची कल्पना काढून व खटपट करून लोकांकडून हे तीन लाख रुपये जमवून टिळकांना दिले नसते तर आज केसरी संस्था ही आकंठ पाण्यांत बुडून राहती व नुसते हतेबंदीनें त्या कर्जाचें व्याज फेडतां फेडतां चालकांचे नाकीं कसे नव आले असते याची कल्पना आपणच करा म्हणजे झालें. १९२० सालीं टिळक वारल्यानंतर केसरीची संख्या थोडीफार घटली; नाहीं असें नाहीं. तथापि २५ ते ३० हजारचे दरम्यान आजहि केसरीचे अंक आम्ही काढतों. केसरी विपन्नावस्थेंत असतांना मी केसरीस मिळालों तेथपासून मी सर्व हकीकत सांगितली; टिळक असेपर्यंत केसरीच्या सुस्थितीचें सर्व श्रेय टिळकांना कोणी दिलें तर त्याला माझी हरकत नाहीं. पण त्यानंतर १०-१२ वर्षांत आम्ही केसरी संस्था टिकविली इतकेंच नव्हे तर काटरकसरीनें वागून व शिल्लक टाकून तीन लाख रुपयांचा ट्रस्ट परवां करून लोकांनीं चिरोल केसकरितां कर्ज म्हणून दिलेली रक्कम महाराष्ट्रास परत दिली, या तरी कामगिरीचा किंवा श्रेयाचा थोडाबहुत भाग घेण्याची आमची पात्रता आहे किंवा नाहीं? टिळकांना लोकांनीं तीन लाख रुपये दिले, ते आम्ही परत केले ही गोष्ट मी अहंकारबुद्धीनें सांगत नाहीं., या बारा वर्षांत खरोखर टिळकांना आम्ही पैसे दिले असें कोणा एकाहि व्यक्तीनें आम्हांला प्रत्यक्षपणें दर्शविलेंहि नाहीं, पण टिळकांच्या पुण्याईनें जरी केसरीला एका अर्थानें या मदतीमुळेंच आज निष्कर्जी राहण्याची व संपन्नता प्राप्त करून घेण्याची सुस्थिति लाधली तरी तो उपकार स्मरून हें ऋण आपण सार्वजनिक ट्रस्टच्या रूपानें ज्या त्या प्रांतांना हिस्सेरशीनें कां परत करू नये असें मनांत आलें व म्हणून आम्ही हा ट्रस्ट केला-अहंकार बुद्धीनें नव्हे. आज मी व बाबांनीं या संस्थेंत एकसारखें ३६ वर्षें काम केलें, आतां आम्ही जाग्यावर बसून स्वस्थपणानें स्वतः कांहीं काम न करितां इतरांनीं काम केलेलें पाहिलें म्हणजे झालें. यापेक्षां आमच्यावर जबाबदारी नाहीं. बाबा खालच्या ऑफिसचे मालक व मी वरच्या ऑफिसचा मालक; तथापि उभ्या ३६ वर्षांत आमचें एकदांहि भांडण होण्याचा प्रसंग आला नाहीं हें मी अभिमानानें सांगतों. असे ऋणानुबंध, अशी मैत्री नुसत्या वरच्या व खालच्या नव्हे तर अगदीं खालच्या खालच्या म्हणजे कामगार वर्गाच्या खात्यांत नांदली व सर्वांना एकमेकांविषयीं बंधुभाव वाटला तरच संस्था टिकेल व भरभराटेल.

मंगळवार उजाडला व केसरी वेळच्यावेळीं निघाला नाहीं असा प्रसंग गेल्या पन्नास वर्षांत एकदाहि आला नाहीं. वर्तमानपत्राचा अंक अचूक बाहेर पडणें याला मी एक Weekly Miracle म्हणजे साप्ताहिक चमत्कारच म्हणतो. व

खरोखरीच ही अभिमानाची गोष्ट आहे व हें ब्रीद आम्ही आजवर टिकविलें आहे. केसरी द्विसाप्ताहिक केल्यामुळें पुढल्या पिढीवरील जबाबदारी वाढली आहे हें मी जाणतों; पण तो द्विसाप्ताहिक केल्यामुळें तशी अनुकूलताहि अधिक वाढली आहे. आज केसरीला स्वतःचें ऑफिस आहे, छापखाना आहे, स्टाफ भरपूर आहे, प्रुफांचीहि दगदग नाहीं. १८९७सालीं प्लेग होता तेव्हां तर सर्व लोक गांव सोडून बाहेर रहावयास गेलेले असत, पण छापखाना गांवांत. मी रात्रीं दोन वाजतां आर्यभूषण छापखान्यांत येऊन दाराच्या दिंडींत थंडींत कुडकुडत बसें व मला एका मिणमिण्या दिव्याच्या प्रकाशांत मराठ्याचीं सर्व प्रुफें पाहून देऊन अरुणोदयापर्यंत काम करावें लागे. त्यावेळीं थंडीचा अगर वाऱ्याचा झोत अंगावर येऊन असें वाटे कीं कांहीं विचारूं नका. आज ती स्थिति राहिली नाहीं. संध्याकाळीं ५ च्या नंतर कोणाला कामही पडत नाहीं. हाताशीं नोकर माणसेंहि लागेल तशीं आहेत. मी टिळकांना १८९६ सालीं येऊन मिळालों, त्या वेळीं एकटे टिळक व मी असे दोघेच होतों. हाताखालीं एकही नोकर नव्हता व आज प्रुफें ने आण करणारा नोकर जो झाडलोटीचें किंवा घड्या उलघडून ठेवण्याचें काम करतो तें सुद्धां कित्येक दिवस प्रथमतः माझें मीच केलें आहे हें लक्षांत ठेवा. मनुष्य लहान झाला म्हणून त्यालाहि दर्जा असतो ही गोष्ट माझ्या सदैव ध्यानांत असते. आज ३६ वर्षांत एकाही नोकराला मी एकदाहि अपशब्द बोललों नाहीं, असें मी सांगूं शकतों. अशा एकनिष्ठतेनें संस्थेचें सुखदुःख तेंच आपलें सुखदुःख मानून आम्ही केसरी संस्था टिकविली व चालविली. परद्रव्याच्या अपहाराच्या एका पैशाचाहि डाग या ३६ वर्षांत मला लागला नाहीं हें मी जाहीर रीतीनें सांगतों. केसरीनें प्रथम कर्जांत जीवन काढलें व त्यापुढेंहि स्वावलंबानें व निस्पृहपणानें त्यांनीं आपलें जीवित-कार्य कंठलें. आम्हीं संकटें भोगलीं, टिळकांचीं सुखदुःखें एक मानलीं म्हणूनच टिळकांच्या केसरीचा वारसा क्रमप्राप्त रीतीनें मजकडे आला. कोणी विचारतात कीं, तुमच्याकडे केसरी कसा काय आला? मी या आक्षेपकाला विचारतों 'माझ्या नाहीं तर काय तुझ्या हातीं केसरी यावयाला हवा होता?' पण असल्या निंदकांना उत्तरहि देण्याचें कारण नाहीं. मी माझ्या परीनें केसरी आतांपर्यंत चालविला तसे पुढीलहि कामगार लोक संस्थेची जबाबदारी पाठीमागील हा इतिहास ओळखून पार पाडतील इतकीच आमची इच्छा आहे. मी अष्टपैलु लेखक असलों तरी माझ्यांत सगळे अष्टादश पैलू नाहींत. एकादी नवीन कल्पना काढून सुचेल तसा मनोरंजकपणा करून संपादकानें लिहिलें पाहिजे. वरच्या वर्गानें खालच्या मंडळीशीं स्नेह ठेविला व सर्वांनीं संस्थेचा अभिमान धरला तरच संस्था टिकेल."

नंतर श्री. दिवेकरांनीं आभार मानल्यावर हा कौटुंबिक सन्मानसमारंभ समाप्त झाला.

# मुंबईंतील हीरक-महोत्सव

ता. २२।८।३२ रोजीं संध्याकाळीं येथील 'ब्लॅव्हॅटस्की लॉज'मध्यें **श्री. न. चिं. केळकर**यांच्या एकसष्टाव्या वाढदिवससमारंभानिमित्त प्रचंड जाहीर सभा, येथील केळकर वाढदिवस मंडळ, मराठी ग्रंथसंग्रहालय, ग्रंथप्रसारक व संपादक मंडळ, वाङ्मय मंडळ, नॅशनल मेडिकल कॉलेज, वाङ्मय मंडळ (सेंट झेविअर्स कॉलेज), मुंबई प्रांतिक हिंदुसभा, बॉम्बे नॅशनल यूनियन, यंग मेन्स् हिंदु असोसिएशन, दाक्षिणी ब्राह्मण सभा, दैवज्ञ असोसिएशन, पाठारे प्रभु सोशल समाज महाराष्ट्र चेंबर आफ कामर्स, डेक्कन मर्चेंटस् असोसिएशन, लोकमान्य सेवासंघ (पार्ले) स्वस्तिक लीग, प्रेस ऑनर्स असोसिएशन, ब्राह्मण भगिनी समाज, माध्यंदिन ब्राह्मण सभा (दादर) वगैरे संस्थांच्या विद्यमानें **सर चुनीलाल मेहता** यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती.

सभेची व्यवस्था 'स्वस्तिक लीग'चे स्वयंसेवक ठेवीत होते. समारंभाकरितां आलेल्या मंडळींत डॉ. जावळे, डॉ. सावरकर, डॉ. गोळे, ब्राह्मण सभेचे श्री. पुणतांबेकर, श्री. के. नटराजन्, श्री. पी. बाळू, डॉ. वेलकर, श्री. सुंदरराव वैद्य, ठाणें जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष श्री. गोविंदराव वर्तक, प्रो. काणे, श्री. एम्. आय्. डेव्हिड, श्री. हरि केशवगोखले, प्रो. हाटे, भारताचार्य श्री. चिंतामणराव वैद्य, श्री. बाबुराव साळवेकर, श्री. नानासाहेब ळळीत, 'प्रभात'चे संपादक श्री. भागवत, श्री. नवेर, श्री. दामोदरपंत मित्र, बॅ. जयकर, मि. हॉर्निमन, श्री. आ. रा. भट, श्री. खानविलकर, श्री. भावे, श्री. मावजी गोविंदजी शेठ, डॉ. पुरंदरे प्रभृति मंडळी प्रमुख होती. पुष्कळ स्त्रियाहि आल्या होत्या.

सभा सुरू होण्याच्या आधीं सुमारें पंधरा मिनिटें श्री. तात्यासाहेबांना भेट म्हणून द्यावयाची **चांदीची सरस्वतीची मूर्ति** सर्वांस पाहावयास मिळावी म्हणून सभेच्या व्यासपीठावरील टेबलावर आणून ठेवण्यांत आली. ही मूर्ति सुमारें एक फूट उंच असून बैठक सुमारें ९" × १०" आहे. मध्यभागीं वीणाधारिणी श्रीसरस्वती देवी असून तिच्या उजव्या बाजूस श्री. केळकर यांच्या 'केसरी' संबंधींच्या कार्याचें द्योतक म्हणून एक सिंह दाखविलेला असून डाव्या बाजुस या देवतेचें प्रिय वाहन मयूर दाखविलेला आहे.

श्री. केळकर हे सरस्वतीकंठाभरण असल्यामुळें या सरस्वतीच्या कंठांतील पुष्पमालेंत मध्यभागीं केळकरांच्या छायाचित्राचें सुंदर लॉकेट घातलें आहे. त्या सरस्वतीला सभा सुरू होण्याच्या आधीं डॉ. वेलकर यांच्या हस्तें पुष्पहार घालण्यांत आला. श्री. सुंदरराव वैद्य यांनीं एका तांदुळाच्या दाण्यावर तात्यासाहेबांचें सुबक रंगीत चित्र काढलें असून हें चित्र एका डबींत बसविण्यांत आलें आहे; हें चित्रहि तात्यासाहेबांस अर्पण करावयाचें असून तें सभेंत दाखविण्यांत आलें.

बरोबर साडेसहा वाजतां सभेस सुरुवात झाली. केळकर वाढदिवस मंडळाचे

अध्यक्ष डॉ. **वेलकर** सर्वांचें स्वागत करतांना आपल्या इंग्रजी भाषणांत म्हणाले, " अठरा सार्वजनिक संस्थांच्या वतीनें श्री. तात्यासाहेबांना ही मंजुषा अर्पण करण्यासाठीं आपण येथें जमलों आहोंत....देशभक्त, वर्तमानपत्रकार इतिहासकार, नाटककार व टीकाकार या दृष्टीनें त्यांची योग्यता मोठी आहे. सुमारें पंचवीस विविध विषयांवरील पुस्तकें लिहून त्यांनीं मराठी भाषेला सौंदर्य आणलें आहे. ते मराठी वाङ्मयाचे अनभिषिक्त राजेच आहेत; आज त्यांचा हीरक महोत्सव करण्याकरितां आपण जमलों आहों. या आनंदाच्या प्रसंगीं सर चुनीलाल मेहता यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी मी सूचना करतों."

यानंतर या सूचनेला वेल्फेअर ऑफ इंडिया लीगचे **मि. डेव्हिड** यांनीं अनुमोदन दिल्यानंतर सर चुनीलाल हे अध्यक्षस्थानापन्न झाले व नंतर डॉ. सावरकर यांनीं जे कित्येक गृहस्थ सभेला येऊं शकले नाहींत त्यांच्या आलेल्या तारा व पत्रें वाचून दाखविलीं. त्यांत सर गोविंदराव प्रधान, डहाणूचे श्री. करंदीकर वकील, नगराध्यक्ष बॅ. चंदावरकर, बॅ. जम्नादास मेहता, श्री. यंदे, रा. ब. बोले, वसईचे डॉ. अभ्यंकर वगैरेंच्या तारा व पत्रें होतीं. यानंतर अध्यक्ष **सर चुनीलाल मेहता** हे बोलावयास उभे राहिले. ते म्हणाले, " माझा तात्यासाहेब केळकरांशीं निकट परिचय आलेला नाहीं; परंतु ज्या गृहस्थानें आज कमींत कमी ३६ वर्षें तरी स्वार्थत्यागपूर्वक राष्ट्रसेवा केली त्याच्या वाढदिवससमारंभांत भाग घेणें हें माझें कर्तव्य आहे असें वाटल्यावरून मी येथें आलों आहें. मी तात्यासाहेबांचें ' प्लेझर्स अँड प्रिव्हिलेजिस् ऑफ् दि पेन् ' हें पुस्तक वाचलें आहे. त्यांत तात्यासाहेबांनीं उगीच कल्पनेच्या भराऱ्या मारलेल्या नाहींत. त्यांची दृष्टि विधायक असून त्यांनीं स्वार्थत्यागाची वृत्ति व निष्कलंक चारित्र्य ह्या गुणांवर जोर दिलेला आहे. हे दोनहि गुण त्यांच्या अंगीं वसत आहेत, हें विशेष आहे. महाराष्ट्रांतील नव्हे तर महाराष्ट्राच्या बाहेरील लोकांचेंहि केळकरांवर प्रेम आहे. त्यांचें कार्य निरनिराळ्या क्षेत्रांत झालेलें आहे. हिंदु समाजांत व राजकीय क्षेत्रांत त्यांची कामगिरी झालेली आहे. असेंब्लीमध्यें त्यांनीं सहा वर्षें काम केलें व त्यांच्या टीकेच्या भडिमाराला तोंड देणें फडणीसांना कठिणच होऊन बसलें असेल. त्यांची निर्भयता, देशभक्ति, विचारशक्ति व बुद्धि या गुणांचा व त्यांच्या अमोल अनुभवाचा देशाला उपयोग होणार आहे." नंतर ' इंडियन सोशल रिफॉर्मर 'चे संपादक **श्री. के. नटराजन्** यांनीं श्री. केळकरांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला. या ठरावावर बोलतांना ते इंग्रजींत म्हणाले, "पुण्यामध्यें सध्यापेक्षां पूर्वी तीव्र मतभेद होते. परंतु केळकरांचा स्वभावच असा आहे कीं ते कोणालाहि तोडींत नाहींत. नामदार गोखल्यांनीं माझ्याजवळ असे उद्गार काढले होते कीं केळकर हे पुण्यांतील दोन राजकीयपक्षांमधील दुवा आहेत. केळकरांसारख्या राष्ट्रीय दृष्टीच्या पुढाऱ्याला दीर्घायुष्य लाभावें व हिंदुसमाजाची व राष्ट्राची त्यांच्या हातून भरीव सेवा व्हावी असें मी इच्छितों."

**मि. बी. जी. हॉर्निमन** या ठरावाला अनुमोदनपर भाषण करतांना म्हणाले, " य

प्रसंगीं भाषण करणें हा मी माझा हक्क समजतों; इतकेंच नव्हे तर केळकरांचा समव्यवसायी वृत्तपत्रकर्ता व त्यांच्या खांद्याला खांदा लावून लढणारा राजकारणी संवगडी या नात्यानें हें माझें कर्तव्यच आहे.

वृत्तपत्रकार या नात्यानें केळकरांची योग्यता दांडगी आहे. हिंदुस्थानांतील सर्वांत पहिल्या दर्जाच्या आजच्या वृत्तपत्रकारांत त्यांची गणना केली पाहिजे. कदाचित् ते पहिल्या प्रतीच्या विद्यमान वृत्तपत्रकारांत पहिले आहेत असेंहि म्हणावें लागेल. दोन भाषांतील वृत्तपत्रें एकाच वेळीं चालविणें व तींहि उत्कृष्ट रीतीनें चालवून वाचकांवर आपली छाप पाडणें ही गोष्ट सोपी नाहीं.

संपादकाचा धंदा हा वास्तविक फार धोक्याचा. त्याला शाश्वती मुळींच नाहीं. स्वास्थ्याचें नांव नको. म्हातारपण मुळी नसतेंच. मी केळकरांच्यापेक्षां फार तर दोन वर्षांनीं लहान असेन. संपादक या नात्यानें आम्ही म्हातारे होऊं शकत नाहीं. असो. लो. टिळक व श्रीयुत केळकर यांजसारखे मोठे लोक हिंदु समाजांत निपजतात हें हिंदुस्थानचें भाग्य होय."

**श्री मावजी गोविंदजी** ठरावला पाठिंबा देतांना आपल्या गुजराथी भाषणांत म्हणाले, "मी गुजराथ, काठेवाड व कच्छ यांच्या वतीने केळकरांचें अभिनंदन करतों. हिंदूंचा बचाव करणारा, भूतकाळाकडे भक्तीनें पाहणारा, भविष्यकाळाकडे आशेनें नजर देऊन राहणारा, असा महाराष्ट्रांतला माणूस असतो आणि केळकर तसेच आहेत."

**बॅ. मुकुंदराव जयकर** आपल्या इंग्रजी भाषणांत म्हणाले, "श्री. केळकर हे गेलीं छत्तीस वर्षें राजकारणांत आहेत. आज एकसष्टाव्या वर्षीहि त्यांच्यावर देशांत अनुकूल प्रतिकूल टीका केली जाते हेंच त्यांच्या मोठेपणाचें लक्षण आहे. अलबल्या-गलबल्या मनुष्य प्रिय अगर अप्रिय होऊं शकत नाहीं. आज मुंबई शहरांतील **सतरा-अठरा संस्था** हा समारंभ करण्यास एकवटल्या आहेत, यावरून त्यांच्याबद्दल जनतेला आपलेपणा किती वाटतो हें स्पष्ट होत आहे.

केळकरांची कामगिरी बहुविध आहे. ते म्हणजे मानवी बुद्धीचा एक सर्वसंग्रहच होत. साहित्याच्या विविध शाखांत त्यांनीं संचार केलेला आहे. वृतपत्रकार या नात्यानें तर त्यांचें स्थान फारच श्रेष्ठ आहे. आज असें महाराष्ट्रांतील गांव नाहीं कीं, जेथें केसरी जात नाहीं. केळकरांच्या लेखणीनें लोकांना चटका लावला आहे. राजकीय विषयांवरील लेखांबद्दल तर विचारावयासच नको. ते राजकीय लेखनाचे व्यासमुनि आहेत. ता. १ ऑगस्ट १९३१च्या केसरींतील सहासात कॉलमी लेख तर राजकीय विषयांवरील उत्कृष्ट लेखांचा नमुना आहे. तो लेख मी पुनःपुनः चारदा वाचला. केळकरांच्या लेखांतील विवेचनपद्धति तर्कशुद्ध, व उच्च प्रतीची आहे.

केळकरांनीं हिंदुमहासभेची मोठी सेवा केली आहे. कित्येक हिंदू पुढाऱ्यांना हिंदू म्हणवून घेण्यांत कमीपणा वाटतो तसा तो मला अगर केळकरांना वाटत नाहीं. आम्हांला ज्ञातिनिष्ठ म्हणतात. जो हिंदु असून स्वतःला हिंदु म्हणवतो,

तो ज्ञातिनिष्ठ अशी विपरीत व्याख्या सध्या रूढ झाली आहे. मुसलमानांनीं सवता सुभा स्थापला व कांहीं मागण्या केल्या तरी ते मात्र ज्ञातिनिष्ठ ठरत नाहींत. आम्ही मुसलमानांच्या अराष्ट्रीय मागण्यांना विरोध करतों. असें असतां आम्हांलाच ज्ञातिनिष्ठ म्हणतात. वास्तविक जे ब्रिटिशांच्या मैत्रीमुळें आपला अधिक फायदा होईल असें मानतात तेच खरे ज्ञातिनिष्ठ होत. तुम्ही तेलाचा दिवा घ्या नाहींतर विजेचा दिवा घेऊन शोधा, तुम्हाला केळकरांच्या एका शब्दांतहि असली हिणकस ज्ञातिनिष्ठा सांपडणार नाहीं. केळकरांची राष्ट्रीय वृत्ति खणखणीत आहे. आम्ही असेंब्लींत असतांना देशाला विघातक असे कायदे ज्या ज्या वेळीं विचारार्थ पुढें आले अगर पास झाले त्या वेळीं रात्रीच्या रात्री केळकरांनीं झोपेविना काढल्याचें मला माहीत आहे ! ”

सिंधचे कॉंग्रेस पुढारी **डॉ. चोइथराम गिडवानी** यांनीं आपल्या हिंदी भाषणांत असें सांगितलें कीं, टिळकांचे सहकारी या नात्यानें केळकरांनी केलेली कामगिरी संस्मरणीय आहे. आम्हा परप्रांतीयांना केळकरांचें नांव आठवलें कीं टिळकांची मूर्ति डोळ्यापुढें उभी राहते. यानंतर **डॉ. सावरकर** आपल्या ओजस्वी भाषणांत केळकरांच्या टीकाकारांना उद्देशून असें म्हणाले कीं, टीकाकारांनीं वायफळ टीका न करतां टिळकांनीं त्यांच्यावर सोपविलेलें कोणतें कार्य केळकरांनीं केलें नाही हें दाखवावें.

हीं भाषणें झाल्यावर व हा अभिनन्दनाचा ठराव मतें घेता सर्वानुमतें संमत झाल्यावर श्री. केळकरांना मुंबईकरांचा आहेर समर्पण करण्याकरितां पुण्यास शिष्टमंडळ पाठविण्याचा ठराव **प्रो. पां. वा. काणे** यांनीं मांडला. ते म्हणाले, “मी केसरीचा सतत चाळीस वर्षें वाचक आहें. केसरीच्या वाचकांतर्फे मला श्री. केळकरांना असें सांगावयाचें आहे कीं, त्यांनीं केलेली केसरीची सेवा महाराष्ट्राजवळ रुजू आहे. मग ‘ का पुरुष ’ कांहींहि म्हणोत.” ठरावाला अनुमोदन देतांना सुप्रसिद्ध क्रिकेटपटु **श्री. पी. बाळु** हे म्हणाले “......श्री. केळकरांनीं केसरीपत्रांतून अस्पृश्योद्धाराच्या चळवळीला उचलून धरलें आहे, व वेळोवेळीं सक्रिय सहानुभूतिहि दाखविली आहे. श्री. केळकर हे राजकीय क्षेत्रांतील खेळाडू आहेत. खेळाडूला जे गुण लागतात ते गुण त्यांच्या अंगीं आहेत. मनुष्याची सेवा हाच खरा धर्म होय; व ही सेवा केळकरांनीं अविरत चालविली आहे. ” स्त्रियांच्यातर्फें **सौ. सरस्वतीबाई कावनईकर** यांनीं केळकरांच्या अभिनंदनपर भाषण करून ठरावाला पुष्टि दिल्यावर हा दुसरा ठरावहि सर्वानुमतें संमत झाला.

शेवटीं श्री. विनायकबुवा पटवर्धन यांनीं वंदेमातरम् गीत म्हटल्यावर तीन तासपर्यंत चाललेली ही संस्मरणीय सभा रात्रौ साडेनऊ वाजतां समाप्त झाली.

# साहित्यसंस्थांतर्फे मानपत्र

## साहित्याचार्य श्री. नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर !

श्रीपरमेश्वरकृपेनें आपणांस नुकतेंच एकसष्टावें वर्ष लागलें याबद्दल आपलें अभीष्टचिंतन व अभिनंदन करण्याकरितां आज आम्ही महाराष्ट्रांतील अनेक साहित्यसंस्थांचे प्रतिनिधी स्थानिक व परस्थ मराठी साहित्यसेवक येथें जमलों आहों. आपणांवर आम्हां साहित्यसेवकांचा जितका हक्क आहे तितका दुसऱ्या कोणाचाहि नाहीं, ही गोष्ट आपणांसहि मान्य होईल. कारण,आपण प्रथम साहित्य-प्रणेते व नंतर इतर सर्व कांहीं आहां.

विष्णुशास्त्री चिपळूणकर, टिळक व आगरकर या थोर पुरुषांप्रमाणें आपणहि वकीलीचा किंवा सरकारी नोकरीचा मोह आवरून वाङ्मयाच्या द्वारां देशसेवेचें पवित्र व्रत स्वार्थत्यागपूर्वक स्वीकारिलें व तें आजपर्यंत अखंड पाळलें. यांत आपल्या सात्त्विक मनोवृत्तीचें व एकांत वाङ्मयोपासनेच्या दृढ निश्चयाचें बीज आहे. इ. स. १८९४ पासून तों आजपर्यंतची आपली वाङ्मयात्मक कामगिरी सर्वश्रुत व सर्वसंमत आहे. या दीर्घ कालांतील आपला वाङ्मयप्रपंच विस्तृत, विविध व बहुरंग आहे. यांत आपली विद्वत्ता, व्यासंग, लेखनकौशल्य, बुद्धि-स्वातंत्र्य व विचारवैशिष्ट्य हीं दिसून येतात. सात्त्विकपणा, उदात्तपणा, रंजकता, बोधपरता व ज्ञानसंग्राहकता हे अभिजात वाङ्मयाचे प्रधान गुण आपण निर्मि-लेल्या वाङ्मयांत चहूंकडे दृष्टीस पडतात. हें वाङ्मय स्फूर्तिदायक, विचारप्रवर्तक, ज्ञानसंवर्धक, आनंददायक आणि म्हणूनच आदर्शभूत आहे. तें निरंतर टिकणारें व उपकारक आहे.

आपण वाङ्मयाच्या कोणत्याही शाखेंत निर्भयपणें संचार करतां हा आपल्या कर्तृत्वाचा अनन्यसाधारण विशेष आहे. काव्य, नाटक, इतिहास, कथा, साहित्य-ग्रंथ, टीका, ग्रंथपरिक्षण, पुस्तकप्रस्तावना, वृत्तपत्रांतील लेख व अनेक मासिक पुस्तकांत लिहिलेले विविध लेख अशा सर्वच ठिकाणीं आपली लेखणी लीलेनें विहार करते. तशीच आपली रसनाही अनेक वाङ्मयविषयांचा परामर्श घेण्यास समर्थ आहे. लेखणी व रसना हीं आयुधें कुशलतेनें योजणारे आपल्यासारखे सव्यसाची वाङ्मयवीर फार विरळ !

सुंदर कल्पना, प्रतिभेची चमक, चमत्कृतिजनकता व सभ्य विनोद हे वाङ्म-याचा उत्कर्ष करणारे गुण आपल्यांत सहजात आहेत. आपण त्यांचें संवर्धन करून त्यांचा चातुर्यानें उपयोग केला आहे. सदभिरुचि व औचित्य यांचा भंग कोठेंही केलेला नाहीं. हा आपल्या वाङ्मयाचा एक विशेष आहे. प्रसादगुण-प्रधान वैदर्भी रचनापद्धति आपल्या वाङ्मयांत सर्वत्र आदरिलेली आहे. यामुळें आपलें सर्व लिखाण रसिकमान्य झालेलें आहे.

प्रतिपाद्य विषयाची पुरी माहिती, तिचा सांगोपांग, समतोल व समंजस विचार व तिची तर्कशुद्ध, प्रमाणबद्ध व सुबोध मांडणी हा कोणत्याही चांगल्या ग्रंथाचा प्राणभूत अंश होय. अभिनव कल्पनांनीं, मनोहर अलंकारांनीं व संभावित विनोदानें नटलेल्या आपल्या वाणीचा या प्रमाणभूत अंशाशीं केव्हांही वियोग होत नाहीं. यामुळें आपला कोणताही लेख सरस, रमणीय व उद्‌बोधक वाटतो.

मराठी वाङ्मयांतील टीकेचें दालन पूर्वी फार संकुचित व एकदेशीय होतें. तें विशेषतः आपण विस्तृत व सर्वांगपरामर्शी केलें. आपले टीकालेख भारदस्त, समतोल, माहितीनें भरलेले व ग्रंथकारास व लेखकास प्रोत्साहक असतात. कित्येक पुस्तकांना आपण लहानमोठ्या प्रस्तावना लिहिल्या आहेत. त्या फार मार्मिक, सुंदर, सारग्राही व उद्‌बोधक आहेत.

प्रस्तुतच्या लहानशा मानपत्रांत आपल्या प्रचंड वाङ्मयनिर्मितीचा ओझरतासुद्धां योग्य परामर्ष घेतां येणें शक्य नाहीं. तथापि टिळकचरित्र, तोतयाचें बंड, सुभाषित आणि विनोद, मराठे व इंग्रज, विलायत व सिमला येथील बातमीपत्रें, आयर्लंडचा इतिहास, बडोद्याच्या साहित्यप्रसंगीं आपण अध्यक्ष या नात्यानें केलेलें भाषण व नाट्याचार्य श्री. कृ. कोल्हटकर यांच्या नाटकाचें परीक्षण एवढेंच आपलें लिखाण कोणी वाचलें तरी त्यावरून सुद्धां आपल्या बहुश्रुतपणाची, विद्वत्तेची, लेखनकुशलतेची, रसिकतेची व सहृदयत्वाची एकदम ओळख पटल्याशिवाय राहणार नाहीं. अर्थशास्त्र, हुंडणावळ, सुवर्णचलन, शुद्धलेखन, छन्दोरचना अशांसारखे स्वभावतः रुक्ष व दुर्बोध विषयसुद्धां आपल्या सरस लेखणीनें सुगम व मनोरम करून सोडले आहेत.

श्रीसरस्वतीची दिव्य उपासना आपण जातीनें केली इतकेंच नव्हे तर महाराष्ट्र भाषाभिवृद्धीसाठीं जे जे प्रयत्न झाले आणि ज्या ज्या संस्था स्थापण्यांत आल्या त्यांना आपण ‘ केसरीद्वारा ’ व इतर रीतीनें अनेक प्रकारचें बहुमोल साहाय्य दिलेलें आहे, हेंही कृतज्ञतापूर्वक येथें नमूद करणें आमचें कर्तव्य होय. सारांश, आपली वाङ्मयसेवा सर्वांगिण व सर्वमान्य आहे. हिच्याबद्दल आमच्या मनांत वसणाऱ्या आदराचें अल्पसें चिन्ह म्हणून हें मानपत्र आपणांस आजच्या शुभप्रसंगीं प्रेमादरपूर्वक अर्पण करीत आहों. त्याचा स्वीकार व्हावा अशी विनंति आहे.

सरतेशेवटीं परमेश्वराजवळ एवढीच प्रार्थना आहे कीं, त्यानें आपणांस दीर्घ आयुष्य व आरोग्य द्यावें व आपल्यासारख्या अभिजात व अष्टपैलू ग्रंथकारांची परंपरा कायम ठेवून तिच्या द्वारें मराठी वाङ्मयाचा उत्कर्ष व महाराष्ट्राचें कल्याण करावें. ही सदिच्छा तो सफल करो अशी आशा प्रदर्शित करून आम्ही आपली रजा घेतों.

पुणें, शनिवार ता. २७ ऑगस्ट १९३२ इ.

मि. श्रावण वद्य ११।१८५४ शनिवार.

## साहित्य संस्था—

महाराष्ट्र साहित्य परिषद्; भाषाशास्त्र मंडळ, पुणें; सरस्वती मंदिर, पुणें; मयूर मंडळ, पुणें; भारतवर्षीय चरित्रकोश मंडळ, पुणें; गोमांतक साहित्य सेवक मंडळ, पणजी; महाराष्ट्र साहित्य सभा, इंदूर; राजवाडे संशोधन मंडळ, धुळें; देवल क्लब, सांगली; कविमित्र मंडळ, दादर; भारत इतिहास-संशोधक मंडळ, पुणें; साहित्य मंडळ, सांगली; काव्यरत्नावली संस्था, जळगांव; व्यापारी मोफत वाचनालय, सांगली; नगर वाचन मंदिर, कोल्हापूर; जुम्मा दादा व्यायाम मंडळ, बडोदें; साहित्यसेवामंडळ, कऱ्हाड; विदर्भ साहित्य संघ, नागपूर; धर्मकोश कार्यालय, प्राज्ञपाठशाळा, वांई; शारदा मंडळ, नागपूर; महाराष्ट्र शब्दकोश मंडळ, पुणें; वाङ्मयोपासक मंडळ, अहमदनगर; भारत कविमंडळ, कोल्हापूर; वाचनालय संस्था, विटें; साहित्यसेवा मंडळ, इचलकरंजी; महाराष्ट्र भाषासंवर्धक मंडळ, नागपूर; वाङ्मयचर्चा मंडळ, बेळगांव; साहित्य सरोज मंडळ, औंध; पाठारे प्रभु सोशल समाज, मुंबई; श्रीमहाराष्ट्र शारदा मंदिर, पुणें; मित्रमंडळ, बेळगांव; महाराष्ट्र वाचनमंदिर, नाशिक; वाङ्मय विहार मंडळ, नाशिक; ताम्बे मंडळ, ग्वाल्हेर; मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणें; महाराष्ट्र मंडळ, कराची; मठग्रामस्थ हिंदु मंडळ, मडगांव; ऐक्यसंवर्धक मंडळ, पुणें; महाराष्ट्र वाङ्मयमंडळ, फ. कॉ. पुणें.

## साहित्य सेवक—

चिंतामण विनायक वैद्य. श्री. सरदार माधवराव विनायक किबे. सौ. कमळाबाई किबे. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर. वामन मल्हार जोशी. माधव श्रीहरी अणे. कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर. नारायण गोविंद चापेकर. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर. दत्तो वामन पोतदार. श्रीकृष्ण नीळकंठ चाफेकर. पांडुरंग वामन काणे. द्वारकानाथ गोविंद वैद्य. गोविंद सखाराम सरदेसाई. दाजी नागेश आपटे. लक्ष्मण गणेशशास्त्री लेले. जनरल नानासाहेब शिंदे. प्रो. माणिकराव. नारायण केशव बेहेरे. वसंत नारायण नाईक. माधव दामोदर आळतेकर. रामचंद्र काशिनाथ तटणीस. माधव त्र्यंबक पटवर्धन. चिंतामण विनायक जोशी. बाळकृष्ण गणेश खापर्डे. वासुदेव विनायक जोशी. विनायक सदाशिव वाकसकर. जगन्नाथ रघुनाथ आजगांवकर. शंकर दामोदर पेंडसे. विठ्ठल सिताराम गुर्जर. विष्णु सखाराम खांडेकर. नारायण बाळकृष्ण पराडकर. नारायण हरी आपटे. रे० भास्कर कृष्ण उजगरे. सुंदरराव भास्कर वैद्य. रघुवेल ल्यूकस जोशी. भास्कर रामचंद्र तांबे. चंद्रशेखर राजकवि, बडोदें. यशवंत. वासुदेव गोविंद मायदेव. वैजनाथ काशीनाथ राजवाडे. प्रल्हाद केशव अत्रे. साधुदास. काव्यविहारी. आनंदराव टेकाडे. सदाशिव अनंत शुक्ल. विनायक लक्ष्मण बर्वे, ( आनंद. ) केशव महादेव सोनाळकर. केशव लक्ष्मण टेंभुर्णीकर. ज. वा. पाटणकर. वासुदेव कृष्ण भावे. गणेश गंगाधर जांभेकर. रामकृष्ण गणेश हर्षे. गजानन विश्वनाथ केतकर.

केशव सिताराम ठाकरे. नारायण रामलिंग बामणगांवकर. दत्तात्रय गणेश सारोळकर. नारायण नरसिंह फडणीस. अनंत हरी गद्रे. केशव वासुदेव साठे. यशवंत रामकृष्ण दाते. चिंतामण गणेश कर्वे. कृष्णाजी पांडुरंग कुळकर्णी. श्रीपाद महादेव माटे. बापूजी मार्तंड अंबेकर. नारायण महादेव भिडे. दत्तात्रय विष्णु आपटे. अनंत भा. प्रियोळकर. दामोदर मोरेश्वर भट. शेषाद्रि गोविंद कानडे. द. वि. पारखे. रामचंद्र गोविंद कानडे. वि. धों. कुळकर्णी. ग. स. जोग. प. स. देसाई. वा. ना. शहा. भालचंद्र लक्ष्मण पाटणकर. रा. ल. घरत. दत्तात्रय व्यंकटेश पै. गोविंदराव उपळेकर. यादव शंकर वावीकर. अज्ञातवासी.

**संपादक--**

ज्ञानप्रकाश, लोकशिक्षण, आनंद, रत्नाकर, स्फूर्ती, चित्रमयजगत्, बालबोध, ज्ञानमित्रमाला, गोरक्षण, दीनबंधु, भद्रायु–पुणें; मनोरंजन, खेळगडी, विविधवृत्त, प्रभुप्रभात, भारत गौरव ग्रंथमाला, नवाकाळ, मौज-मुंबई; महाराष्ट्र, वागीश्वरी–नागपूर; किर्लोस्कर व स्त्री-किर्लोस्करवाडी; सहविचार–बडोदें; सुबोध, आर्यविज्ञान–गोवा; रामकृष्ण निकेतन माला–रत्नागिरी; सत्यवादी–कोल्हापूर; विजय–सांगली; निजाम विजय–दक्षिण हैद्राबाद; समर्थ–सातारा; उदय–उमरावती; टणत्कार–विलेपारलें; वैनतेय–सावंतवाडी; प्रबोध–धुळें; बलवंत–रत्नागिरी.

---

## श्रीमहाराष्ट्र शारदामंदिरातर्फे सन्मान

शनिवार ता. २७ रोजीं सायंकाळीं सहा वाजतां 'श्रीमहाराष्ट्र शारदा–मंदिरानें भारत इतिहाससंशोधन मंदिरांत श्री. **न. चिं. केळकर** यांच्या ६१ व्या वाढदिवसाचा समारंभ घडवून आणला. लेखक, नियतकालिकें, व साहित्यमंडळें यांच्या तर्फेचें मानपत्रहि याच समारंभांत त्यांना अर्पण करण्यांत आलें. सभेस स्थानिक व परस्थ, कवि व लेखक असे तरुण व वृद्ध अनेक साहित्यभक्त उपस्थित होते. प्रो. नी. चाफेकर यांनीं श्री. चिं. वि. वैद्य यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी सूचना मांडली, व ते वाङ्मयांतील "एक थोर पुराणपुरुष" ( Grand old man ) आहेत असें निवेदन केलें. त्या सूचनेला प्रो. कृ. पां. कुळकर्णी, कु. मैनाबाई शहाणे, वैद्य पराडकर व यशवंतराव दाते यांनीं अनुमोदन दिलें. नंतर भारताचार्य **श्री. नानासाहेब वैद्य** यांनीं अल्पसें प्रास्ताविक भाषण केलें. त्यांत ते म्हणाले, " मी आजपर्यंत अनेक वेळां अध्यक्ष झालों आहे. पण आजचा

सुप्रसंग हा पहिलाच आहे. आणि तो मी स्वतःला बहुमान समजतों!" यानंतर श्री. दाते यांनीं मानपत्र वाचून दाखविलें. [ पृ. ७९९ पहा ] ते म्हणाले, "या मानपत्रांत इतक्या सह्या आलेल्या असल्या तरी आमचेकडे दाखल झालेलीं साहित्यसेवक व साहित्यसंस्था यांचीं कितीतरी नांवें त्यांत आलेलीं नाहींत. मानपत्राच्या आकारमानामुळें सर्वांचा समावेश करणें अशक्य होतें."

यानंतर निरनिराळ्या साहित्यसंस्थांतर्फे श्री तात्यासाहेब यांना पुष्पहार अर्पण करण्यांत आले. नंतर भाषणांस प्रारंभ झाला.

प्रारंभीं **प्रो. वा. म. जोशी** म्हणाले, "...लोकांनीं प्रेमानें साजरा केलेला असा हा समारंभ आहे. अनेक साहित्यसेवक आज एका साहित्यसेवकाचा गौरव करीत आहेत, हें औचित्यपूर्णच आहे; पण आश्चर्यजनकहि आहे. कारण 'प्रायः समानविद्याः परस्परयशःपुरोभागाः' अशी स्थिति असते. पण येथें तात्यासाहेबांशीं समानविद्य असणारा कोणी नाहीं म्हणून त्यांच्याबद्दल कोणाला असूयाहि नाहीं हेंच खरें. तात्यासाहेबांचें वाङ्मय विविधरंगी, मनोरम व कल्याणप्रद आहे; इतकें कीं, त्याची सर दुसऱ्याला येणार नाहीं 'सत्यं, शिवं, सुंदरम्' हीं उच्च वाङ्मयाचीं सारीं लक्षणें त्यांच्या लेखनाला लागू पडतात. ते सव्यसाची लेखक असल्यामुळें त्यांना अर्जुनाची उपमा देण्यांत येते. पण त्याहिपेक्षां भीष्म किंवा द्रोण यांची उपमा त्यांना अधिक शोभते असें मला वाटतें. कारण दोनहि हातांनीं झाले तरी अर्जुन फक्त बाणच मारी; पण द्रोण हे 'शापेनापि शरेणापि,' आपलें कार्य करीत. तात्यासाहेब हे दुर्मतरूपी शत्रूवर शरसंधान तर करतातच, पण त्याहिपेक्षां ब्राह्मण्याला उचित असा युक्तिवादहि करतात, त्यांत अगतिक झाल्यावरच ते शस्त्र हातीं घेतात."

**रे. भास्करराव उजगरे** आपल्या भाषणांत म्हणाले, "आम्ही ख्रिस्ती असलों तरी आमची मातृभाषा मराठी आहे आणि तिचा अभिमान आपणा सर्वांपेक्षांहि आम्हांला अधिक आहे. तात्यासाहेब हे साहित्यसेवक असून एक राष्ट्रपुरुष आहेत म्हणून त्यांचा सन्मान करण्याचा आम्हांला हक्क आहे" **सौ. सरलाबाई नाईक** म्हणाल्या, "तात्यासाहेबांचें वाङ्मय शाळेंत शिकणाऱ्या मुलांपासून पंडितापर्यंत सर्वांना मनोरंजन व बोधप्रद असें असतें. वाचकवर्गाच्या अभिरुचिबरोबर वहात न जातां ती अभिरुचिच उच्च दर्जाला नेणें हें काम त्यांच्या वाङ्मयानें केलें आहे. स्त्री-पुरुषांनीं स्वच्छंदानें वाचावें इतकें त्यांचें वाङ्मय निर्दोष आहे." **श्री. के. सी. ठाकरे** म्हणाले, "त्यांची टीकावृत्ति ही मूषकप्रवृत्तीची आहे-आंतडें कुरतडणारी पण फुंकर घालणारी आहे. त्यामुळें टीका खाल्लेल्या प्रतिपक्षाच्याहि मनांत द्वेषभाव उत्पन्न होत नाहीं, त्यांचें तडजोडीचें धोरणहि असाच इष्ट परिणाम घडवून आणतें."

शेवटीं **श्री. केळकर** हे बोलावयास उभे राहिले. ते म्हणाले, "मानपत्रांतील स्तुतीमुळे माझी जीभ भारावली आहे; तेव्हां मी फारसें बोलणार नाही. मानपत्रांत

इतकीं विशेषणें मला लावलेलीं आहेत कीं, तीं सारीं अहेतुक वापरलीं म्हणावें, तरी कठिण, आणि खरीं म्हणावीं तरी कठिण. म्हणून मी एवढेंच म्हणतों कीं, चार–पांच लेखकांनीं मिळून आपापलीं दोन–दोन चार–चार विशेषणें त्या मानपत्रांत समाविष्ट केलीं. अर्थात् तीं सर्व यथार्थ म्हणून मी स्वतःला तीं सारीं लावून घेईन तर ती चूक होईल. पण मी एवढें सांगूं इच्छितों कीं तीं विशेषणें खऱ्या बुद्धीनें योजलेलीं असतील तर त्यांपैकीं कांहीं वाचून मला आनंद वाटला. उदाहरणार्थ, ‘ बुद्धिस्वातंत्र्य ’ हा त्यांत उल्लेखिलेला गुण घ्या. त्यावर माझा कटाक्ष आहे. कोणालाहि खूष करण्याकरितां मी जन्मांत कधीं लिहिलें नाहीं. ‘ सात्त्विकपणा ’ हें विशेषण मी मला भूषण समजतों. तसेंच ‘ सभ्यता, सदभिरुचि व औचित्य ‘ हे शब्द मी शिरोधार्य मानतों. कारण वाङ्मय म्हणजे मनुष्याच्या साऱ्या संस्कृतीचें सार आहे, अर्कच आहे म्हणा ना. तो अर्क शंभर टक्के निर्दोष असला पाहिजे. असदभिरुचीचें समर्थन मी स्वप्नांतहि करणार नाहीं. माझे ‘ टीकालेख लेखकास प्रोत्साहक असतात ’ असें मानपत्रांत म्हटलें आहे; तें ठीकच आहे. कारण तरुण लेखकांबद्दल मला भारी कौतुक वाटतें. नवीन लेखकवर्ग मोठा प्रतिभासंपन्न असा निर्माण होत आहे असें मला दिसतें आणि म्हणून त्याच्यावर माझी फार आशा आहे. केळी तोडाव्या व त्यांचे नवे कोंब फुटावे तशी मराठी साहित्याची वाढ चोहों अंगांनीं होत असल्याचें मी पहात आहें. ‘ सुगमता ’ याहि गुणाकडे मी लक्ष पुरविलें आहे. एक वेळ ज्ञानाची गंभीरता कमी असली तरी चालेल. पण लेख सर्वांना सुगम असलाच पाहिजे असें माझें मत आहे. मी असेंच मानतों कीं, एखादा ग्रंथ स्वतः वाचणें काय आणि त्यांतील आशय दुर्बोध रीतीनें व्यक्त करणारा लेख लिहिणें काय, वाचकांच्या दृष्टीनें दोन्ही सारखेच. लेखकाची महत्त्वाकांक्षा अशी असावी कीं, कल्पना सुचली कीं मी तो कागदावर मांडीन,नंतर स्वतः वाचीन तेव्हां स्वतःला आनंद होईल, छापल्यावर लोकांना आनंद होईल आणि त्या आनंदाचे किरण परत मजकडे येतील. असें हें विद्युन्मंडळ ( Electric circuit ) पूर्ण झालें पाहिजे. त्यासाठीं लोकांना सुगम होईल अशाच रीतीनें लिहिलें पाहिजे...... मला ६० वर्षें आयुष्य लाभलें व केसरीच्या चव्हाट्यावर स्थान मिळालें हीं माझ्या यशाचीं दोन बीजें आहेत. नवीन लेखक मला प्रतिभासंपन्न दिसतात. त्यांना माझें सांगणें एवढेंच कीं, सदभिरुचि, औचित्य व बुद्धिस्वातंत्र्य हे तीन गुण अंगीकारा म्हणजे मराठी भाषेचें वैभव खचित वाढेल. तसेंच महाराष्ट्र विद्यापीठ निघालें म्हणजे तिचा उत्कर्ष मोठ्या प्रमाणावर होईल. ”

शेवटीं अध्यक्ष श्री. वैद्य यांचें समारोपादाखल भाषण झाल्यावर प्रो. पोतदार यांनीं सर्वांचे आभार मानले; व हा रम्य समारंभ समाप्त झाला.

# भारत स्नेहसंवर्धक मंडळातर्फे सन्मान

रविवार ता. २७।८।३२ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां पुणें भारत स्नेहसंवर्धक मंडळातर्फे श्री. **न. चिं. केळकर** यांना त्यांच्या षष्ट्यब्दिपूर्तिनिमित्त श्री. **धोंडो केशव कर्वे** यांच्या अध्यक्षतेखालीं टिळक-स्मारक मंदिरांत मानपत्र देण्याचा समारंभ झाला, त्या प्रसंगीं श्री. तात्यासाहेब यांच्या अभिष्टचिंतनपर व गुणगौरव पर अशीं निरनिराळ्या वक्त्यांचीं भाषणें झालीं.

**प्रो. नाईक** यांनीं श्री. तात्यासाहेब यांची राजकीय किंवा सामाजिक कामगिरीची दिशा शक्य तों स्नेह घडवून आणण्याचीच असते, असें सांगून श्री. तात्यासाहेब यांस द्यावयाचें मानपत्र वाचलें. श्री. **त्रिंबकराव आपटे** आपल्या भाषणांत म्हणाले, 'तात्यासाहेबांचें साहाय्य कोणकोणत्या संस्थांना आहे असें विचारण्यापेक्षां तें नाहीं कोणाला असेंच विचारणें सयुक्तिक दिसेल.' श्री. **बाबूराव जगताप** म्हणाले, "श्री. तात्यासाहेबांच्या ठिकाणीं साधक बाधक विचार करण्याचा जो गुण आहे तोच त्यांना यश व कीर्ति मिळवून देण्यास उपयोगी पडला." श्री. **बाबासाहेब कामत** यांनीं कॉलेजमधील श्री. केळकर यांच्या आत्मविश्वासाची एक आठवण सांगितली व ते म्हणाले, "श्री. तात्यासाहेबांचा राजकीय बाबतींत सुसंगतपणा राहिला नाहीं, असा कांहीं जणांचा त्यांच्यावर आक्षेप आहे; पण जो मनुष्य राजकीय परिस्थिति जशी असेल तसा वागतो तोच खरा मुत्सद्दी असें मी समजतों." **प्रि. रॅंग्लर महाजनी** आपल्या भाषणांत म्हणाले, "केळकर हे स्वतः दोनपक्षांतील मध्यबिंदूसारखे आहेत. कोणत्याही अडीअडचणीच्या प्रसंगीं त्यांची सल्ला उपयोगी पडते." **सौ. इंदिराबाई देवधर** आपल्या भाषणांत म्हणाल्या, "राजकारण व समाजकारण यांत प्रत्येकानें श्री. केळकरांचें अनुकरण करण्यासारखें आहे. तसेंच त्यांच्या ठिकाणीं गुणग्राहकता हा गुण विशेष आहे. प्रत्येकाचें कार्य गोड करून घेऊन त्याला अधिक प्रोत्साहन देण्याकडे त्यांची प्रवृत्ति असते." यानंतर श्री. **के. के. सकट** यांनीं अस्पृश्यता निवारणार्थ व मंदिर प्रवेशाच्या बाबतींत श्री. तात्यासाहेब यांनीं किती हरतऱ्हेची खटपट केली हें सांगितलें. **प्रो. द. वा. पोतदार** म्हणाले, "माझा व तात्यासाहेब यांचा ३० वर्षांचा संबंध आहे; आणि इतक्या वर्षांच्या जुन्या स्नेहसंबंधांत इतर अनेक गुणांबरोबर त्यांच्या साधेपणाचा गुण मला विशेष दिसला. सर्व लोक त्यांच्या समतोलपणाचे गोडवे गातात पण माझ्या मतें समाजाला मदत करण्याच्या बाबतींत ते आपला बॅलन्स पेटींत घालून ठेवतात."

यानंतर अध्यक्ष श्री. कर्वे यांनीं श्री. रानडे यांनीं काढलेल्या नक्षीच्या चौकटींत श्री. निजामपूरकर यांनीं सुंदर व वळणदार अक्षरांत लिहिलेलें मानपत्र व चांदीचें कलमदान आणि लेखणी तात्यासाहेबांना अर्पण केल्यावर भारत स्नेहसंवर्धक-मंडळ, अस्पृश्य-समाज, शिवाजीमहाराज-पथक, समर्थ-व्यायाम-मंडळ,

वाजीपथक, वगैरे संस्थांतर्फें श्री. केळकर यांना हार घालण्यांत आले. नंतर श्री. **अण्णासाहेब कर्वे** म्हणाले, "लोकमान्यांच्या मागून महाराष्ट्रांत तरी आज दिसून येत आहे अशा प्रकारचा मान जनतेकडून मिळाल्याचें हें तात्यासाहेबांचें एकच उदाहरण आहे. हा सबंध आठवडा अशा प्रकारच्या समारंभांनीं गजबजून गेला व पुढील आठवड्यांतहि तोच प्रकार चालणार आहे. पुण्यांतच काय पण साऱ्या बृहन्महाराष्ट्रांत जी ती संस्था, जी ती व्यक्ति अहमहमिकेनें आपला तात्यासाहेबांविषयींचा आदर कोणत्या ना कोणत्या रूपांत व्यक्त करीत आहे आणि वर्तमानपत्रें व मासिकें विशेषांक काढीत आहेत. महाराष्ट्रापुरताच विचार केला तर ज्यांच्या अंतःकरणांत लोकमान्यांविषयीं जेवढें प्रेम उत्पन्न झालें नाहीं तेवढें तात्यासाहेबांविषयीं झालें अशा किती तरी व्यक्ति व संस्था सांपडतील. तात्यासाहेबांना महाराष्ट्रीय जनतेच्या अंतःकरणांत अत्यंत स्पृहणीय असें स्थान मिळालें आहे हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट आहे."

वरीलप्रमाणें अध्यक्षांचें भाषण झाल्यावर श्री. **केळकर** यांचें खालील आशयाचें उत्तरादाखल भाषण झालें. ते म्हणाले, "आजचा समारंभ म्हणजे सर्व रंगांचें मिश्रण असलेल्या इंद्रधनुष्यासारखा आहे. कारण यांत सर्व-पक्षीय लोकांची बांधणी झाली आहे. तसेंच ज्या संस्थेतर्फें आज माझा गौरव करण्यांत येत आहे ती संस्था म्हणजे एखाद्या तबकांत निरनिराळीं फळें भरावींत व त्यांवर एक सुंदर सरपोस घालावा अशासारखी आहे. या संस्थेंत पक्षाभिमान नाहीं. आपल्या पुणें शहराचें हें एक सुदैवच समजलें पाहिजे कीं, अशा तऱ्हेची उच्च दर्जाची संस्था एक तरी येथें आहे; आणि अशा तऱ्हेची संस्था दर जिल्ह्यागणिक निघावी असें मला वाटतें. या संस्थेला मला मुंबईच्या भर रहदारीच्या रस्त्यावर पादचारी लोकांना इकडून तिकडे अपघात न होतां जातां यावें म्हणून रस्त्याच्या मध्यावर बनविलेल्या 'आयलंड्स' ची उपमा द्यावीशी वाटते.

पादचारी लोक अलीकडचा रस्ता सोडून पलीकडचा रस्ता गांठतांना या आयलंड्सचा विश्रांतिस्थानासारखा व सांध्यासारखा उपयोग करतात, तसाच या संस्थेचा पक्षाभिमान सोडून एकमेकांमध्यें मित्रत्व जोडण्याला उपयोग होतो. 'मी पक्षाभिमानापासून थोडा च्युत झालेला' असा माझा एक दोष सांगण्यांत येतो तो खराच आहे. जे खरे कट्टर पक्षाभिमानी असतात ते मारीन किंवा मरेन अशा वृत्तीचे असतात. असे कट्टर जसे एका दृष्टीनें उपयोगी असतात तसे माझ्यासारखे दोन पक्षांत समेट घडवून आणणारेहि लोक लागतात हें विसरून चालावयाचें नाहीं. मी राष्ट्रीय पक्षाचा असलों तरी 'राइट वुइंग्' चा आहें, लेफ्ट वुइंगचा नाहीं. म्हणजे मी दोन पक्षांमधील सरहद्दीनजीक आहें. ज्यांनीं युद्धाच्या हकीकती वाचल्या असतील त्यांना माहीत असेल कीं, केव्हां केव्हां शत्रुपक्षांतील लोकहि परस्परांना बंधु मानतात. दोनहि पक्षांतले योद्धे हीं माणसेंच असतात. तेव्हां केव्हां समेट, तर केव्हां तह, तर केव्हां युद्ध असें चाललेलें असतें. मग माझें धोरण

केव्हां केव्हां समेटाचें असतें हा गुन्हा कां मानला जातो हें मला समजत नाहीं. मी अगदीं सरहद्दीवरच असल्यामुळें साहजिकच परपक्षांतील लोकांशीं माझी सलगी होते व गप्पागोष्टीहि होतात; पण त्याबरोबर हेंहि खरें आहे कीं, युद्धाचा बिगुल वाजला कीं, मी स्वपक्षांतील योग्य स्थानीं येऊन खडा राहतों व आपलें काम बजावतों. लोकमान्य टिळक असतांनाहि माझा गोखले यांच्याशीं स्नेह होता. तरी पण वेळीं मी त्यांच्यावर खरमरीत टीकाहि केली आहे. याचा अर्थ मी कट्टर पक्षाभिमानी नसून मर्यादित पक्षाभिमानी आहें. ही गोष्ट टिळकांना दिसत असून-सुद्धां त्यांनीं कधीं माझा अव्हेर केला नाहीं; व त्यांच्या हातून केसरी कट्टर पक्षाभिमान्यांपैकीं कोणाला न मिळतां मलाच मिळाला! ...उदार मतवादित्वाचा जो दोष म्हणून माझ्यावर लादण्यांत येतो तें भूषण मानूनच मी आजपर्यंत वागलों आहें व पुढेंहि वागणार आहें." या आशयाचें भाषण झाल्यावर संस्थेच्या चिटणिसांनीं सर्वांचे आभार मानले. मग राष्ट्रगीत झाल्यावर हा समारंभ संपला.

## अ. म. हिंदुधर्ममठातर्फें सन्मान

सोमवार ता. २९ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत अखिल महाराष्ट्र हिंदुधर्ममठातर्फें श्री. ल. ब. भोपटकर यांच्या अध्यक्षखालीं श्री. न. चिं. केळकर यांना त्यांच्या षष्ट्यब्दिपूर्तीदिनानिमित्त मानपत्र देण्याचा समारंभ झाला. उत्तरादाखल श्री. केळकर यांचें खालील आशयाचें भाषण झालें. ते म्हणाले, "आज ज्या वस्तू मला नजर करण्यांत आल्या आहेत त्या निःसंशय अमूल्य आहेत. पूर्वीं माझ्या शक्तीप्रमाणें मी हिंदुधर्माचें कार्य केलें तसेंच पुढेंहि करीन. आज अशी स्थिति उत्पन्न झाली आहे कीं हिंदु असून हिंदू म्हणवून घेण्यांत कमीपणा वाटूं लागला आहे. मुंबई येथें परवां जी वाढदिवसानिमित्त सभा झाली तींत श्री. नटराजनसारख्या 'विश्वचि माझें घर' असें म्हणणाऱ्या समाजसुधारकानें माझ्याविषयीं असे उद्गार काढले कीं, केळकर आपणाला नेहमीं हिंदूच म्हणवून घेतात व त्यांना 'मी ब्राह्मण आहें' असें म्हणण्यांत कधींच कमीपणा वाटत नाहीं. नटराजनसारख्या माणसालाहि हें कळून चुकलें कीं, 'विश्वचि माझें' घर असें म्हणण्याला गोड वाटतें, पण प्रत्यक्ष कृतींत उतरविण्याला मात्र तें तितकेंच कठीण असतें. आम्हांलाहि 'विश्वबंधुत्व' मान्य नाहीं असें मात्र कोणींहि समजूं नये. पण अद्वैताला मिळावयाचें झाल्यास द्वैताची पायरी एकदम ओलांडून चालत नाहीं. अद्वैतबुद्धीची परिणति क्रमाक्रमानें संघटित व्हावयाला पाहिजे."

# पुणें मराठी ग्रंथालयातर्फे पानसुपारी

शुक्रवार ता. २६।८।३२ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां पुणें मराठी-ग्रंथालयातर्फे श्री. न. चिं. केळकर यांना त्यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त पानसुपारी झाली. व श्री. केळकर आर्टिस्ट यांनीं काढलेल्या तात्यासाहेबांच्या तैलचित्राचा अनावरणसमारंभ ग्रंथालयाचे उपाध्यक्ष **श्री. ल. रा. गोखले** यांचे हस्तें झाला.

ग्रंथालयाचे चिटणीस श्री. अ. ना. पावगी यांचें तात्यासाहेबांच्या उत्कृष्ट वाङ्मयसेवेसंबंधीं प्रशंसापर भाषण झाल्यावर **प्रो. श्री. नी. चाफेकर** म्हणाले, " तात्यासाहेबांचा प्रत्येक लेख स्फूर्तिदायक व प्रतिभापूर्ण असून त्यांचा विनोद नाविन्यपूर्ण असतो. " प्रो. **नाईक** यांनीं आपल्या भाषणात सांगितलें, " पंडित मालवीय यांनीं जशी बनारस हिंदु युनिव्हर्सिटी स्थापन केली तशीच श्री. केळकर हे महाराष्ट्र युनिव्हर्सिटी स्थापन करणार आहेत." प्रो. **पोतदार** म्हणाले, 'आज मराठी वाङ्मयाची निकृष्ट अवस्था आहे. ज्या वेळीं जनतेंत वाचनाची हौस कमी होती अशा परिस्थितींत तात्यासाहेबांनीं ग्रंथनिर्मिती केली." श्री. **ता. ने. पांगळ** म्हणाले; " तात्यासाहेबांच्या विद्वत्तेबद्दल व भाषासौष्ठवाबद्दल कोणालाहि अभिमानच वाटेल. या प्रसंगीं अशा थोर पुरुषाला मी '**लोकमित्र**' अशी पदवी देतों.'

नंतर **श्री. न. चिं. केळकर** यांचें उत्तरादाखल भाषण झालें. ते म्हणाले, " या ग्रंथालयाला पूर्वीं नांव होतें पण त्याला स्थान नव्हतें, तें आज प्राप्त झालें आहे. महाराष्ट्रांत ज्या चारपांच ग्रंथालयांचीं नांवें प्रामुख्यानें घेण्यांत येतात त्यांत या ग्रंथालयाचा समावेश होतो. आज सरकार देशी भाषेला जरी विन्मुख असलें तरी आपण मराठी भाषा ही जोरानें पुढें ढकलली पाहिजे. शारदेची संस्कृति किंवा वाढ किती आहे हें अजमावण्याचें स्थान म्हणजे ग्रंथालयें होत. जशी शहराची सांपत्तिक स्थिति अजमावण्याला आपणाला बँकेच्या जमाखर्चाकडे पाहावें लागतें तसेंच वाङ्मयाच्या दृष्टीनें ग्रंथालयाकडे नजर टाकावी लागते. येथील ग्रंथांची संख्या पाहिली तर भावी कार्याच्या दृष्टीनें फारच थोडी आहे. २ कोटि मराठी जाणणारे लोक असतां १०-१२ हजारांचाच ग्रंथ-संग्रह दृष्टीस पडतो. या मानानें पाश्चात्य राष्ट्राकडे पाहिलें तर एकेक माणसाच्या घरींच इतका ग्रंथ-संग्रह सांपडतो. आणि याचें कारण म्हणजे त्यांच्या भाषेची युनिव्हर्सिटी त्यांना आहे तशी सोय आपणास नाहीं. म्हणून विद्यापीठाच्या खालच्या पातळींत असलेलें मराठीचें तळें भरण्यापेक्षां अगोदर मराठीला उंच पातळीवर असलेल्या वॉटर गॅलरीचें स्थान दिलें पाहिजे म्हणजे आपोआपच झरे निर्माण होतील. आणि म्हणूनच मी म्हणतों कीं, अगोदर **महाराष्ट्र विद्यापीठ** स्थापण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अखिल महाराष्ट्रांत बोटावर मोजण्याइतकीं ग्रंथालयें असण्यापेक्षां दर जिल्हानिहाय एक एक ग्रंथालय स्थापन झालें पाहिजे. माझ्या वाङ्मयसेवेबद्दल आजपर्यंत जी स्तुति झाली ती पुष्कळच अधिक झाली असें मला वाटतें. कारण

मी लिहिलेलीं पुस्तकें सर्व जर एके ठिकाणीं केलीं तर एक फळी तरी भरेल कीं नाहीं याची शंकाच आहे. असो. आतांपर्यंत मला ‘ साहित्य–केसरी ’ ‘ साहित्य-सम्राट्’ ‘साहित्य–चक्रवर्ति ’ वगैरे पदव्या दिल्या पण त्या मला आवडत नाहींत. श्री. कोल्हटकर यांच्या सारखें गुरुपीठ निर्माण करून शिष्य तयार करणें मला बिलकूल आवडत नाहीं. वरील सर्व पदव्यांपेक्षां मला ‘ **लोकमित्र** ’ ही पदवी अधिक आवडते. वाङ्मयबाबतींत मी डेमोक्रॅटिक मताचा आहे. म्हणजे वाङ्मयाच्या क्षेत्रांत वाङ्मयाचा आस्वाद घेण्यास प्रत्येकाला सारखाच हक्क आहे.”

---

## रत्नाकर कचेरीतर्फे पानसुपारी

शुक्रवार ता. २६ रोजीं सकाळीं ८॥ वाजता रत्नाकर कचेरीतर्फे **श्री. न. चिं. केळकर,** यांना त्यांच्या शष्ठ्यब्दिपूर्तिनिमित्त पानसुपारी व रत्नाकराचा खास ‘ केळकर अंक ’ समर्पण करण्याचा समारंभ झाला. श्री. न. चिं. केळकर उत्तरादाखल भाषण करितांना म्हणाले, “ रत्नाकराबद्दल विशेष जिव्हाळा वाटण्याचें कारण असें कीं रत्नाकराशीं माझा लेखक या दृष्टीनें तर संबंध आहेच पण विशेष असें कीं रत्नाकरासारखें मासिक काढून संपादक मंडळी नव्या व होतकरू लेखकाला लेख लिहिण्याला पुष्कळ वाव देतात व त्यांचे लेख प्रसिद्ध करून त्यांना अधिक उत्साह देतात. मासिकें नसतीं आणि वर्तमानपत्रेंहि नसतीं तर लेखकांची मनःस्थिति काय झाली असती याची कल्पनाच केलेली बरी. लिहिलें पण छापण्याला कोठेंच वाव नाहीं, अशी परिस्थिति असती तर लेखकांनीं लिहिलें असतें कीं नाहीं याची थोडी शंकाच आहे. जो वाङ्मयप्रकार मी वर्तमानपत्राकरितां लिहितों तो छापला जातो पण त्या व्यतिरिक्त जो एक प्रकार आहे तो लिहिला तरी छापावयाचा कोठें हा प्रश्न पडतोच आणि अशा वाङ्मयाला मासिक पुस्तकें हेंच स्थान आहे. आपण संस्कृतीचा विकास करावा व तो लोकांनीं आनंदानें मानून घ्यावा हीच कोणाहि लेखकाची इच्छा असणार.”

---

## नाट्यसंशोधन मंडळातर्फे सन्मान

गुरुवार ता. २५ रोजीं सकाळीं ९॥ वाजतां नाट्यसंशोधन मंडळातर्फे प्रो. श्री. नी. चाफेकर यांच्या हस्तें श्री. न. चिं. केळकर यांना त्यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त मानपत्र देण्याचा समारंभ झाला. अध्यक्ष म्हणाले, “ ज्या सोशल क्लबातर्फे आज मानपत्र देण्याचा समारंभ होत आहे तो क्लब श्री. तात्यासाहेब यांच्याच हस्तें १९२४ सालीं उघडण्यांत आला. व त्यांनीं लिहिलेल्या ‘ नवर-

देवाची जोडगोळी ' या नाटकाचा प्रथम प्रयोग करण्याचें भाग्य याच क्लबाला लाभलें. तेव्हां तात्यासाहेबांचा व या क्लबाचा किती निकट संबंध आहे हें आतां निराळें सांगावयास नकोच. त्यांना आपण आज जें मानपत्र अर्पण करणार आहोंत तें आपलें कर्तव्य म्हणूनच करीत आहों." यानंतर श्री. गोखले यांनीं मानपत्र वाचून दाखविलें व तें अध्यक्षांनीं तात्यासाहेबांना अर्पण केलें.

यानंतर श्री. बाबूराव जगताप, श्री. शंकरराव मुजुमदार, श्री. रा. ब. गोडबोले, श्री. माधवराव जोशी वगैरेचीं गुणवर्णनपर भाषणें झाल्यावर श्री. तात्यासाहेब यांना नाट्यसंशोधन मंडळ, बलवंत संगीत मंडळी, ललितकलादर्श संगीत मंडळी, नूतन महाराष्ट्र मंडळी, महाराष्ट्र हितचिंतक भ्रातृमंडळ, पूना संगीत टॉकीज वगैरे नाटकमंडळ्यांतर्फे हार घालण्यांत आले व गंधर्व नाटक मंडळी, महाराष्ट्र नाटक मंडळी वगैरे पुण्याबाहेर असलेल्या मंडळींकडून आलेले शुभसंदेश वाचून दाखविण्यांत आले.

नंतर श्री. **न. चिं. केळकर** यांचें भाषण झालें. ते म्हणाले, " नाट्यसंस्थेबद्दल मला अत्यंत प्रेम वाटतें. नाटकें लिहिल्यामुळेंहि नाट्यकलेचा मी ऋणानुबंधीच आहें. मला आज जी नट म्हणून पदवी देण्यांत आली ती योग्य आहे असेंच मी समजतों. नाटकाइतकी खरी करमणूक मला दुसऱ्या कशानेंच होत नाहीं. मला सिनेमाचे मूकपट अथवा बोलपट मुळींच आवडत नाहींत. नागपूर विश्वविद्यालयाचा मी एम. ए.चा परीक्षक असतां विद्यार्थ्यांना मी मुद्दाम असा प्रश्न टाकला कीं, बोलपट तुम्हांला आधिक आवडतो कीं नाटक अधिक आवडतें? यावर शेंकडा ९८ विद्यार्थ्यांनीं नाटकच अधिक आवडतें असें उत्तर लिहिलें व तें सर्वथैव योग्यहि आहे. नाटकांत नेपथ्यरचना, देखावे, हावभाव वगैरे जिवंत प्रकार असतात. थोडक्यांत म्हणजे नाटकांत सर्व प्रकार आहेत. वक्तृत्व आहे, अभिनय आहे, संगीत आहे....मी कोणतेंहि नवें नाटक अत्यंत लक्षपूर्वक पाहातों. जगाला शहाणपणा, नैतिक शिक्षण, वर्तन वगैरे नाटकाच्या द्वारें जितकें बोधप्रद होतें तितकें तें इतर कशानेंहि होत नाहीं. इंग्लंडांत वाङ्मयक्षेत्रांत पहिलें स्थान कवि शेक्स्पियर याला देण्यांत येतें आणि याचें कारण त्याचें उच्च वाङ्मय हेंच होय. वाङ्मय व नाटक हीं वेगवेगळीं आहेत असें मी कधींच मानीत नाहीं. अलीकडे कोणताहि क्लिष्ट विषय निबंधात्मक न लिहितां संवादात्मक लिहितात. ही पद्धत वाचकांना आवडतेहि. याचें कारण निबंधाला एकच आकार असतो तर संवादाला अनेक असतात. प्राचीन ग्रंथ देखील पूर्वपक्ष व उत्तर पक्ष अशा रीतीनें म्हणजे संवादरूपानेंच लिहिलेले आढळतात. हल्लींच्या नटांचीं भाषणें एकाच पद्धतीनें होतात, तीं तशीं होऊं न देतां योग्य प्रसंगीं स्वर वर-खालीं करून त्यांनीं बोललें पाहिजे."

---

## पुणें, महाराष्ट्रीय-मंडळातर्फें सन्मान

येथील महाराष्ट्रीय मंडळाचें उपाध्यक्ष श्री. तात्यासाहेब केळकर यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त ता. २५।८।३२ रोजीं सायंकाळीं श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज यांच्या अध्यक्षतेखालीं सत्कारसमारंभ करण्यांत आला. तात्यासाहेबांच्या अभिनंदनार्थ मंडळातर्फें कु. बाळूताई खरे, श्री. नानासाहेब भोंडे प्रभृतींचीं केळकरांच्या गुणगौरवपर भाषणें झालीं. उत्तरादाखल भाषण करतांना **श्री. तात्यासाहेब केळकर** म्हणाले, "आज येथें सुद्धां कांहीं वक्त्यांनीं माझ्या वाङ्मयाबद्दल स्तुतिच केली आहे ! सदर स्तुती येथील पारिभाषिक शब्दांत होईल अशी मला अपेक्षा होती ( हंशा ) पण ती खरी ठरली नाहीं ! उदाहरणार्थ, केळकर आठवड्यांतून केसरी दोन वेळां प्रसिद्ध करतात, ही गोष्ट आपण केळकर हे केसरीच्या आठवड्यांत दोन जोड्या फिरवितात अशा भाषेंत सांगाल असें मला वाटलें होतें. (हंशा) किंवा केळकर हे केसरींत अमुक विषयाचें चर्वित चर्वण करतात, हें तुम्ही आपल्या भाषेंत, केळकर सदर विषयाच्या एकसारख्या उठाबशा काढतात, असें म्हणाल असें मला वाटलें होतें. ( हंशा ). अथवा केळकरांचें लेखन दुटप्पी असतें हें सांगण्याकरितां कदाचित् , केळकर हे आपल्या लेखांत मलखांबावरची कसरत करतात, असेंही म्हटलें असतेंत असें मला वाटलें होतें !" (हंशाच हंशा).

अशा आशयाचें कांहीं वेळ विनोदात्मक भाषण केल्यानंतर शारीरिक शिक्षण, आरोग्य वगैरे विषयांचें तरुण पिढीला महत्त्व पटण्यासारखें वाङ्मय यथावकाश निर्माण करण्याचें आश्वासन देऊन, श्री. केळकर यांनीं आपलें भाषण संपविलें.

---

## पुण्यांतील बोहरी समाजातर्फें सन्मान

मंगळवार ता. २३ रोजीं सायंकाळीं ४॥ वाजतां पुण्यांतील अंजुमाने दाऊदी बोहरीसमाजातर्फें, रविवार पेठेंतील सदर समाजाच्या एका शाळेच्या आवारांत श्री. नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांचा त्यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त जाहीर सन्मान करण्यांत आला. या समारंभाकरितां सदर समाजांतील मुंबई येथील एक सुप्रसिद्ध साहित्यसेवक **मुल्ला नूरभाई मुल्ला हसनअल्ली डेरापवाला** यांनीं अध्यक्षस्थान सुशोभित केलें होतें.

ईशस्तवन झाल्यावर अध्यक्षांचें प्रास्ताविक भाषण झालें. नंतर अंजुमान **दाऊदी सभेचे सेक्रेटरी मि. ए. के. अबदुलजी** या वृद्ध गृहस्थांचें भाषण झालें. ते आपल्या भाषणांत म्हणाले, " श्री. तात्यासाहेबांनीं पुण्यांतील आमच्या समाजावर जे उपकार केले आहेत ते, ते स्वतः विसरले असतील पण आमच्या स्मरणांत ते अगदीं ताजे आहेत. **पेशव्यांच्या अमदानींत** आमचा समाज पुण्यास येऊन राहिला. तेव्हांपासून आम्ही कात्रजच्या तलावाचें पाणी पीत

आलों. त्यापासून आम्हांला कसलाहि उपद्रव झाला नाहीं. आजतागायत मी तेंच पाणी पीत आहें; पण पण माझी तब्बेत "बिलकूल अच्छी" आहे. परंतु आमच्या इंग्रजी इंजिनियरला तें पाणी घाण वाटलें आणि आमचें तें **कात्रजच्या तळ्याचें पाणी बंद करण्याविषयीं हुकूम** सुटला त्या वेळीं आमचा समाज हवालदिल झाला. आज २०० वर्षांचा आमचा हक्क ते एका हुकमासरशीं हिराऊन घेऊं लागले. त्या वेळीं **श्री. तात्यासाहेब केळकर** हे आमच्या पुणें म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष होते; तेव्हां ही सोन्याची संधि आहे असें जाणून आमच्या समाजाचें एक शिष्टमंडळ त्यांच्याकडे गेलें व आमची पाण्याची तक्रार त्यांच्या कानावर घातली. त्यांनीं आमचें सर्व बोलणें ऐकून घेऊन आमच्याकडून एक अर्ज करवून आणि इतर कांहीं खटपट करून **आमचा कात्रजच्या पाण्याचा पूर्वापार हक्क** आम्हांला परत मिळवून दिला. ही गोष्ट पुण्यांतील बोहरी समाज केव्हांहि विसरणार नाहीं. अशा लोकोपयोगी पुरुषाचा ६१ वा वाढदिवस साजरा करणें हें आमचें कर्तव्य असून त्यांना आणखी आयुष्य लाभो अशी प्रार्थना करून मी रजा घेतों."

नंतर **रा. ब. शेट हणमंतराम रामनाथ,** भाई मुल्ला महंमद, भाई असगर अल्ली यांचीं गौरवपूर्ण भाषणें झाल्यावर उत्तरादाखल भाषण करितानां—

**श्री. तात्यासाहेब केळकर**

म्हणाले, "हा समारंभ होण्यापूर्वीं मला जर कोणी असें विचारलें असतें कीं, "तुम्हांला किती पानसुपाऱ्या होणार आहेत ?" तर मला ज्या पानसुपाऱ्या होणार आहेत त्यांत बोहरी समाजातर्फे एक खात्रीनें होईल, असें मी सांगितलें असतें. इतकें माझें व त्यांचें प्रेमाचें नातें आहे. ( टाळ्या ) **भाषा, धर्म व व्यवहार** ह्या सर्वांनीं मुसलमान समाजांपैकीं बोहरी समाज हा आम्हांला अत्यंत जवळचा व जिव्हाळ्याचा असा वाटतो. ही मंडळी सुरतेहून, **श्रीमंत माधवराव पेशवे यांच्या कारकीर्दींत** पुण्यास आली. मुसलमानांचा जर त्या वेळीं पेशव्यांशीं विरोध असता तर, पेशवे सत्ताधीश होते, त्यांनीं त्यांना येथें वसाहतीस जागा दिली असती काय ? पण या समाजाशीं मुळींच त्यांचा विरोध नव्हता. पेशव्यांनीं त्यांना वसाहतीस जागा दिली, येवढेंच नव्हे तर त्यांच्या **पाण्याचीहि कायमची सोय** करून दिली. बोहरी समाज हा व्यापारी वर्ग आहे. व्यापारीवर्गाचा शहराला एक प्रकारचा आधार असतो. या समाजाचें व आमचे संबंध लक्षांत घेतां हिंदु-मुसलमानांत कांहीं लढा असेल असें खरेंसुद्धां वाटणार नाहीं.

आतांच त्यांनीं मला कात्रजच्या पाण्यासंबंधीं उपस्थित झालेल्या प्रकरणाची आठवण दिली. यावरून **जगांत कोठेंहि कांहीं चांगलें कृत्य केलें तर त्याची स्मृति** राहून कृतज्ञतेचे उद्गार निघतात हें दिसून येतें. त्यावेळीं माझ्या हातून या समाजाची जी कांहीं अल्पस्वल्प कामगिरी झाली, त्याचा इतक्या दीर्घ काळानंतर

असा उल्लेख झालेला ऐकून मला अत्यंत सात्त्विक आनंद वाटला. त्यावेळीं मी **कात्रज व खडकवासले** अशा दोन्ही तलावांतील पाणी दोन निराळ्या बाटल्यांत भरून त्यावर उलटसुटल चिठ्ठया मारून तें पाणी तपासण्यासाठीं मुंबईच्या केमिकल ॲनलायझरकडे पाठविलें. तेव्हां त्यांच्याकडूनही उलटसुलट अभिप्राय आले, व अशा रीतीनें बोहरी समाजाचा २०० वर्षांचा हक्क अबाधित राहिला आणि मला आतां असें समजतें कीं, **कात्रजचें पाणी जास्त चांगलें** असून तेंच सबंध शहराला देण्याची योजना करण्यांत येणार आहे. असो. त्या गोष्टीचा इतक्या वर्षांनीं उच्चार झालेला ऐकून मला खरोखर आनंद होतो. आपला बोहरी समाज आतां शिक्षणाकरितां जास्त जास्त मेहनत घेत आहे. शिक्षण ही अशी गोष्ट आहे कीं, त्या ठिकाणीं बारीकसारीक भेद विसरले जातात व त्यानें उच्चतर संस्कृतीची जाणीव होते. मुसलमान समाज या देशाबाहेर इतरत्र बराच फैलावलेला आहे. इतरत्र त्यांचीं स्वतंत्र राष्ट्रें आहेत; तेव्हां त्यामुळें त्यांना कांहीं जादा हक्क मिळाले आहेत. त्याबद्दल आम्ही त्यांचा मुळींच हेवादावा करीत नाहीं. पुण्याप्रमाणें इतरत्र सर्व ठिकाणीं जर त्यांचे आमचे संबंध राहतील तर त्यांत आम्हांला आनंद आहे. असो. आपण मला प्रेमानें बोलावून हा जो माझा सत्कार केला त्याबद्दल मी आपला आभारी आहे. ''

---

## पुणें शहर म्युनिसिपालिटीतर्फे पानसुपारी

पुणें शहर म्युनिपालिटीचे माजी अध्यक्ष श्री.न.चिं.केळकर यांना ६१ वें वर्ष लागल्याबद्दल पुणें शहर म्युनिसिपालिटीतर्फे त्यांना पानसुपारी देण्याचा समारंभ मंगळवार ता. २३।८।३२ रोजीं ८॥ वाजतां विश्रामबाग वाड्यांत झाला. त्याप्रसंगीं म्यु. पा. टीचे अध्यक्ष **डॉ. नायडू** म्हणाले, " श्री. तात्यासाहेब केळकर हे या म्युनिसिपालिटीचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष होत. त्यांनीं आपल्या कारकीर्दींत म्यु. च्या अधिकारांतील लोकांच्या सुखसोयीचीं कामें केलींच; परंतु त्यांनीं लोकशाहीचीहि स्थापना केली. जरूर त्याप्रसंगीं लोकसत्तेकरतां ते सरकारशीं भांडले. लोकपक्षाच्या लोकांना मानपत्र देण्याचा पायंडा प्रथम श्री. केळकर यांनींच घातला. लोकांच्या पुढाऱ्यांचे पुतळे उभारून त्यांनीं लोकशिक्षणाचें काम केलें. व हें करण्याचा म्यु. ना हक्क आहे असें कोर्टांत सिद्ध केलें. सर्वांशीं समतेनें वागावयाचें असें त्यांचें समेटाचें धोरण आहे. त्यांनीं राजकारणांत पुनः भाग घ्यावा अशी माझी विनंति आहे." नंतर रा.सा. रघुनाथराव किराड, श्री. वि. आ. गडकरी, श्री. रा. गो. दंडवते, मि. इकमबेग, श्री. नलावडे, रा. ब. हणमंतराम रामनाथ, श्री. का. गो. पाषाणकर वगैरेंचीं तात्यासाहेबांच्या गुणगौरवपर भाषणें झाल्यावर डॉ. नायडू यांनीं तात्यासाहेबांना पुष्पहार घातला.

म्यु. सर्व्हंटस असोसिएशन व म्यु. को. ऑ. क्रे. सोसायटी या संस्थेतर्फेही पुष्पहार घालण्यांत आले. **श्री. केळकर** उत्तरादाखल भाषण करतांना म्हणालेः–

" मी प्रथम सन १८९८ सालीं या म्यु. टींत निवडून आलों व तेव्हांपासून आज २५ वर्षे माझा म्यु.शीं संबंध होता. मी या म्युनिसिपालिटीचा अभिमानी आहें.

आपल्या ताब्यांत अनेकविध सत्ता आली आहे **पण सत्तेबरोबरच जबाबदारीही** आली आहे. एकमुखी सत्ता असली तर एकट्या व्यक्तीलाच नांवें ठेवतां येतात. परंतु तुमच्याच हातांत सत्ता आली मग नांवें तरी कोणास ठेवाल ! त्यामुळें आपण आपलीच निंदा करतों हें लक्षांत ठेवून निंदा करा म्हणजे झालें. **आत्मनिंदेसारखें स्वतःच्या सुधारणेला दुसरें साधन नाहीं.** याच दृष्टीनें म्यु. कडे दृष्टि ठेवून मनुष्य वागेल तर त्याचा फायदाच होईल. रोज सकाळीं उठल्यावर आपण आपली निंदा करावी म्हणजे आपली सुधारणा होईल. मी म्यु.त सारासार विचारानें लोकहिताचें काम केलें. आपण माझी आठवण ठेविली तशीच मीहि आपली ठेविली आहे. राजकारणांत कुणी आमच्याजवळ जास्त मागतात म्हणून मला केव्हांच वाईट वाटत नाहीं. मी मि. बेग यांना असें सांगतों कीं, पुणें शहरांतल्याप्रमाणेंच जर सर्व ठिकाणचे मुसलमान असतील तर भांडणें होणारच नाहींत. आम्हांला चीड कां येते तर आमच्या देवांवर व बायकांवर हात टाकला जातो व कपटानें लोकांचें धर्मांतर केलें जातें याचें आम्हांस वाईट वाटतें. हें सुटेल तेव्हां **तुम्ही आम्ही भाऊभाऊच आहों.** ( टाळ्या ) तसेंच ब्राह्मण–ब्राह्मणेतरांबद्दल होय.

राजकारणाबद्दल मला एवढेंच सांगावयाचें कीं, आपण अंगणांत विजेचा दिवा लावला तरी घरांतला नंदादीप कोणी मालवीत नाहीं. विवेकबुद्धीचा दीप कोणी मालवूं नये. या दृष्टीनें मी राजकारणांत सिद्ध आहें. मला तें नावडतें नाहीं व वावडेंहि नाहीं. परंतु आजच्या स्थितींत माझ्यापेक्षां चांगले लोक आहेत ते राजकारण करीत आहेत. माझ्याप्रमाणें लोक जेव्हां उघड बुद्धीनें बोलूं लागतील तेव्हां **पुन्हां माझें राजकारण मी चालूं करीनच.**

म्युनिसिपालिटी म्हणजे स्वयंपाक आहे. चांगला झाला तर आपण खाऊं. वाईट झाला तर नांवें कोणाला ठेवणार ? मी **जबाबदारीचें भाषांतर स्वयंपाक** असें करतों. सर्वांनीं सामुदायिक दृष्टीनें काम करावें, व्यक्तिद्वेष टाळावा अशी माझी सर्वांना विनंति आहे. शेवटीं म्यु.ला आयुष्य लाभो अशी परमेश्वराची प्रार्थना करून मी भाषण संपवितों."

नंतर श्री. दा. वि. गोखले यांनीं सर्वांचे आभार मानल्यावर वंदेमातरम् पद होऊन पानसुपारी, अत्तरगुलाब वाटण्यांत आला व हा गोड समारंभ खलास झाला.

# सार्वजनिक सभेतर्फें देण्यांत आलेलें मानपत्र

**देशभक्त नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर** बी. ए. एल्‌एल्. बी.
**संचालक, केसरी–मराठा संस्था, पुणें, यांचे सेवेसीः—**

आपणांस आज रोजीं साठ वर्षें पुरीं होऊन एकसष्टावें वर्ष लागत आहे, या गोष्टीबद्दल या पुणें सार्वजनिक सभेस अत्यंत मनःपूर्वक आनंद होत आहे. आपल्या या एकसष्टाव्या वाढदिवसाच्या शुभ प्रसंगीं ही सभा आपलें अभिनंदन करीत असून तिला वाटत असणाऱ्या आनंदाचें निदर्शक म्हणून ही सभा हें मानपत्र आपल्या चरणीं सादर करीत आहे.

लोकमान्य टिळकांच्या निमंत्रणावरून १८९६ सालीं आपण केसरी–संस्थेस येऊन मिळालां, ते आजतागायत, म्हणजे छत्तीस वर्षें, सतत, एकनिष्ठ भावनेने त्या संस्थेची विविध दृष्टींनीं वाढ व सेवा करीत राहिलां आहां, ही गोष्ट आपणांस निःसंशय भूषणावह आहे. अशा तऱ्हेचें एकनिष्ठ सेवेचें उदाहरण इतिहासांत क्वचितच आढळतें, म्हणून आपल्या सेवेबद्दल या सभेस फार धन्यता वाटते. लोकमान्य टिळक विद्यमान असतांना व त्यांच्यामागूनहि केसरी–मराठा संस्थेवर बरींच गंडांतरें आलीं, परंतु ती संस्था आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेनें व चातुर्यानें या सर्वांतून पार पडली या गोष्टीची या सभेस पूर्ण जाणीव आहे. या संस्थेच्या सेवेबरोबर आपण छत्तीस वर्षांपर्यंत महाराष्ट्राच्या व अखिल भारतवर्षाच्या राजकारणांत भाग घेऊन आपण राष्ट्रीय पुढारीपणाचें पद पावलां ही गोष्ट महशूर आहे. या सभेस अशी पक्की खात्री वाटते कीं, भारतवर्षाच्या इतिहासांत गंभीर, राजकारणपटु, बुद्धिवान् , निर्भीड व स्वतंत्र विचारी अशा राष्ट्रभक्तांत व नेत्यांत आपली गणना झाल्याखेरीज रहाणार नाहीं.

राजकारणाबरोबर आपली वाङ्मयसेवादेखील अनर्घ्य व अत्यंत उच्च प्रकारची आहे, हें नमूद करण्यास सभेस अभिमान वाटतो. आपले चरित्रग्रंथ, टीकात्मक निबंध, नाटकें, गोष्टी, प्रस्तावना किंवा इतर लेख व या सर्व लिखाणांचा विस्तार व व्याप पाहिला म्हणजे खरोखर आपण ‘ वाङ्मयचक्रवर्ती ’ या पदवीला सर्वस्वी पात्र आहांत असें वाटतें. मराठी भाषेला आपण जी सुलभता व सजावट प्राप्त करून दिली आहे, तिजबद्दल प्रत्येक मराठी वाचक आपलें निरंतर कौतुकच करील.

आपल्या व्यापक व सुदीर्घ देशसेवेविषयीं, आपल्या बहुमोल वाङ्मयाविषयीं व आपल्या अंगच्या सौजन्यप्रधान गुणांविषयीं या सभेला तर द्विगुणित आनंद व अभिमान वाटतो. कारण या सभेचा व आपला संबंधच फार जिव्हाळ्याचा आहे. आपण १८९६ सालीं सभेचे प्रथम सभासद झालांत व तेव्हांपासून सामान्य सभासद म्हणून, १९०७ ते १९१६ पर्यंत चिटणीस म्हणून, १९१६ ते १९२२ कार्याध्यक्ष म्हणून व पुढें उपाध्यक्ष व अध्यक्ष म्हणून आपण महाराष्ट्रांतील राजकारणाच्या मातृस्थानीं असलेल्या या सार्वजनिक सभेचें कार्य इतक्या उत्कृष्ट

तऱ्हेनें केलें आहे कीं त्यामुळें सभेच्या कीर्तींत चांगलीच भर पडली आहे. विशेषतः १८९६ च्या दुष्काळप्रसंगीं, १९०९ सालीं मोर्लेमिंटो सुधारणांविषयीं सरकारास लेखी लोकमत कळविण्याचे बाबतींत, १९१० सालीं श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांस मानपत्र समर्पण करण्याचे वेळीं, १९१६ सालीं सार्वजनिक सभेचें बंद असलेलें त्रैमासिक सुरू करून १९२० सालापर्यंत चालविण्यांत व १९२० सालीं सार्वजनिक सभेची ज्युबिली करून सभेची कामगिरी जनतेपुढें मांडण्यांत आपण सार्वजनिक सभेला उपकृत करून ठेविलें आहे, याबद्दल ही सभा आपली सदैव कृतज्ञ राहील, यांत शंका नाहीं. सभेबद्दल आपल्या बहुविध कार्यांतहि आपणांस जो आपलेपणा आजपावेतों वाटला तो असाच नेहमीं कायम राहावा अशी सभेची आपणांजवळ नम्र मागणी आहे.

आपलें एकंदर छत्तीस वर्षांचे सार्वजनिक कार्य फार उज्ज्वल स्वरूपाचें असून तें जसें आपणांला भूषणावह आहे, तसेंच महाराष्ट्राला अभिमानास्पद आहे. लोकमान्यांच्या पाठीमागें त्यांचें कार्य पुढें चालविण्यास आपल्यासारखा निरलस, सदिच्छा संपन्न, कार्यतत्पर, व्यवहारनिपुण लोकधुरीण लाभला हें महाराष्ट्राचें सद्भाग्य होय.

शेवटीं सार्वजनिक सभेचें मानपत्र आपणास सविनय समर्पण करतों व आपलें अंगीकृत कार्य नेटानें चालू ठेवण्यासाठीं परमेश्वरानें आपणांस दीर्घायुष्य व उत्तम आरोग्य द्यावें अशी त्या जगत्सूत्रचालकाची मनोभावानें प्रार्थना करतों.

मिति—श्रावण वद्य ६ शके १८५४
ता. २२ ऑगस्ट, सन १९३२
सार्वजनिक सभा, पुणें.

आपले कृपाभिलाषी
**उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष चिटणीस व सार्वजनिक सभेचे इतर सभासद.**

---

## सार्वजनिक सभेकडून केळकरांचा सत्कार—समारंभ

पुणें येथील सार्वजनिक सभेच्या विद्यमानें सोमवार ता. २२।८।३२ रोजीं सकाळीं ८॥ वाजतां सभेच्या दिवाणखान्यांत श्री. **वामन मोरेश्वर पोतदार** यांच्या अध्यक्षतेखालीं सभेच्या सभासदांची व नागरिकांची सभा भरली होती.

प्रथम श्री. पिंपळखरे यांनीं स्वागतपर पद गाऊन दाखविल्यावर सभेचे चिटणीस श्री. वासुदेवराव भावे म्हणाले, “आज सभेपुढें दोन महत्त्वाचीं कामें आहेत. एक दे. भ. तात्यासाहेब केळकर यांच्या तैल चित्राचें अनावरण करणें व दुसरें त्यांना मानपत्र देणें. श्री. तात्यासाहेब यांनीं सभासद, चिटणीस, उपाध्यक्ष व अध्यक्ष या नात्यानें गेलीं ३६ वर्षें या सभेची जी बहुमोल सेवा केली तिजबद्दल संस्थेस अभिमान वाटत आहे......श्री. केळकरांनीं महाराष्ट्राची किंबहुना अखिल हिंदभूमीची जी अनेक रीतींनी सेवा केली तिजबद्दल कृतज्ञता दर्शविण्यासाठीं आज हा समारंभ घडवून आणण्यांत आला आहे.”

वरील आशयाचें भाषण झाल्यावर श्री. पोतदार यांनीं तैलचित्राचें टाळ्यांच्या गजरांत अनावरण केलें. नंतर श्री. तात्यासाहेब हें सभास्थानीं उपस्थित झाले; व त्यांचें सर्वांनीं टाळ्यांच्या गजरांत स्वागत केलें. श्री. पोतदार यांनीं त्यांस मानपत्र देण्याचें अगोदर प्रास्ताविक भाषण केलें. ते म्हणाले, "......तात्यासाहेब, 'मराठा' व 'केसरी' या पत्रांचें संपादक म्हणून आपण बहुमोल सेवा केली आहे. या पत्रांतील लेखांनीं राजकीय व इतरहि कांहीं बाबतींत केवढी मोठी लोकजागृति केली याचा उहापोह त्या पत्रांचे अर्धशत–सांवत्सरिक–उत्सवप्रसंगीं अनेकांनीं लेखद्वारा केला आहे. आपल्या त्या सेवेबद्दल महाराष्ट्रच काय परंतु अखिल भारतवर्ष त्यांचें व आपलें ऋणी राहील......वृत्तपत्रकारांचें संपादकीय लिखाण कसें असावें याविषयीं आपले लेख केवळ आदर्शभूतच होत...... वाङ्मयक्षेत्रांतील असा एकहि भाग नाहीं कीं, ज्यांत आपण संचार केला नाहीं. ......मग एवढा वाङ्मयप्रदेश व्यापणारांस 'वाङ्मय–सम्राट्' म्हणण्यास हरकत कोणती?"

अध्यक्षांचें भाषण झाल्यावर श्री. सदाशिवराव बापट यांनीं मानपत्र[पृ.८१५पहा] वाचून दाखविलें व तें अध्यक्षांनीं श्री. केळकर यांस रौप्य करंडकांतून समर्पण केलें. मानपत्रास उत्तर देतांना **श्री. केळकर** म्हणाले, "...कोणी माझी स्तुति करो वा निंदा करो, माझी किंमत मी नेहमीं बरोबर जाणतों. अशा प्रकारें धन्यवाद मिळणें हें तर एक भाग्यच आहे. विनय झाला तरी त्यानें भाग्याला लाथाडूं नये; या मानपत्रापेक्षांहि येथें असलेल्या अनेक थोर विभूतींच्या चित्रांत आपण माझेंहि चित्र ठेवलें यानें खरोखर मला समाधान वाटतें. माझ्या सात्त्विक अहंकाराला आपण दृश्य असें अधिष्ठान किंवा एक बसायला जागा चित्राच्या रूपानें करून दिली. राजकारण हें अतिशय व्यापक आहे. प्रत्येक वृत्तीच्या मनुष्याचा त्यांत उपयोग होत असतो. या हॉलमध्यें लावलेल्या चित्रांत एकीकडे संस्थानिक, सर्व जन्म सरकारी नोकरींत घालवूनहि हिंदी राजकारणाला मूळ जन्म देणारे न्यायमूर्ति रानडे, हिंदवी प्रक्षोभाचें आद्य गुरु लो. टिळक, रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी, नामदार गोखले इत्यादि अनेक मंडळी आहेत. ही सर्वच मंडळी एका राजकीय पक्षाची नसतांनासुद्धां सार्वजनिक सभेनें देशाला हितकारक अशी व्यापक दृष्टि ठेवून त्यांचें देशकार्य मानून घेतलें, तसेंच माझेंहि कार्य आपण मानून घ्याल अशी आशा आहे. पक्षभेदरहित अशी फार पुरातन असलेली सार्वजनिक सभा ही पुण्यांत एकच संस्था आहे."

वरील भाषण झाल्यातर श्री. दादासाहेब करंदीकर यांनीं विनोदी शब्दांत श्री. केळकर यांचें अभिष्ट चिंतिलें. नंतर सभेचे अध्यक्ष श्री. ल. ब. भोपटकर यांनीं श्री. केळकर व इतर पाहुण्यांचे आभार मानलें; व राष्ट्रगीत होऊन हा गोड समारंभ समाप्त झाला.

---

## नियतकालिकांचे केळकर-अंक.

( पुढील पत्रकार व मासिककार यांनीं ' केळकर–अंक ' काढून श्री. तात्यासाहेबांविषयींचा आपला प्रेमभाव व्यक्त केलाः— )

**श्री. लोकमान्य**, मुंबई; **उदय**, उमरावती; **ऐक्य**, सातारा; **मौज**, मुंबई; **निजामविजय**, दक्षिण हैद्राबाद; **हितचिंतक**, लिंब; **भारत**,केपेंगोवा; **महाराष्ट्र**, नागपूर; **विजय**, सांगली; **दक्षिण–महाराष्ट्र**, सांगली; **बलवंत**, रत्नागिरी; **वैनतेय**, सावंतवाडी; **श्रीशाहू**, सातारा; **लोकसत्ता**, नाशिक व नगर; **विद्या–विलास**, कोल्हापूर; **बारामती–समाचार**, बारामती; **रत्नाकर**, पुणें; **सुबोध**, मुरगांव गोंवा; **शांतिदूत**, पुणें; **खेळगडी**, पुणें; **अभ्युदय**, कऱ्हाड; **सकाळ**, पुणें; **संस्थानी स्वराज्य**, पुणें; **कप्तान**, बडोदें; **प्रभु–प्रभात**, मुंबई; **डोंगरे वैद्य**, पुणें.

---

## सत्कारसमारंभ

( श्री. तात्यासाहेबांचा खालील प्रमुख संस्थांमार्फत सत्कार करण्यांत आला )

**सार्वजनिक सभा**, पुणें; **केळकर वाढदिवस मंडळ**, पुणें; **नाट्यसंशोधन मंडळ**, पुणें; **केळकर-वाढदिवस-मंडळ**, मुंबई; **श्रीमहाराष्ट्र शारदामंदिर**, पुणें; **भारत स्नेहसंवर्धक मंडळ**, पुणें; **सेंट्रल को. बँक**, पुणें; **केसरीमराठा संस्था**, पुणें. **दशिणी ब्राह्मणसभा**, मुंबई. **मराठी ग्रंथसंग्रहालय**, मुंबई. **ब्राह्मणसभा**, कुर्ला. **लोकमान्य सेवासंघ**, विलेंपार्लें. **देवगड तालुका प्रजा-मंडळ**, मुंबई. **सनातनधर्मसभा**, मुंबई. **देशस्थ ऋ. ब्रा. संघ**, मुंबई; **महाराष्ट्र वाङ्मयविहार मंडळ-राजाम कॉलेज**, कोल्हापूर.

## मानपत्रें

( श्री. तात्यासाहेब यांस याप्रसंगीं खालील संस्थांकडून मानपत्रें देण्यांत आलीं )

**सार्वजनिक सभा**, पुणें; **नाट्यसंशोधन मंडळ**, पुणें; **केसरी–मराठा संस्था**, पुणें; **साहित्यसंस्थांतर्फे मानपत्र**, श्री. **महाराष्ट्रशारदामंदिर**, पुणें; **भारत स्नेहसंवर्धक मंडळ**, पुणें; **नाट्यसंशोधन मंडळ**, पुणें; **अखिल महा-राष्ट्र हिंदुधर्म मठ**, पुणें; **गीता–धर्म–मंडळ**, पुणें.

शिवाय रहिमतपूर ( बी. व्ही. कुळकर्णी, न्हावी बुद्रक ) व भगूर येथून मानपत्रें पाठविण्यांत आलीं.

---

## पानसुपारी

( खालील संस्थामार्फत श्री. तात्यासाहेब यांस पानसुपारी झाली )

**भारतीय दलित सेवाश्रम**, पुणें; **अनाथ बालिकाश्रम**, हिंगणें; **अन्जुमने दाउदी**, पुणें; **म्युनिसिपालिटी**, पुणें शहर; **नू. म. वि. शिक्षकसंघ**, पुणें; **महा-**

राष्ट्रीय-मंडळ, पुणें; कॉमन वेल्थ ॲशुअरन्स, पुणें; 'खेळगडी' मासिक पुणें; 'रत्नाकर' कचेरी, पुणें; मराठी ग्रंथालय, पुणें; भारत गायन समाज, पुणें; नगर वाचनालय, पुणें; दे ऋ. बा. शिक्षणोत्तेजक संस्था, पुणें, श्रीगोवर्धन संस्था, पुणें; अनंत परशुराम ऊर्फ बापूराव करंदीकर इंपीरिअल सिनेमा आर्टिस्ट, मुंबई; मर्चंटस को ऑ० बँक लि. चे कौन्सिलर्स व डायरेक्टर्स यांचे तर्फे (मेजवानी व फोटो).

---

## वाढदिवसा निमित्त जाहीर सभा

अकोट—ए. व्ही. स्कूलतर्फे; अकोला—वाङ्मयोपासक मंडळाच्या विद्यमानें; आलिबाग—नागरिकांची जाहीर सभा; अहमदनगर—नागरिकांची जाहीर सभा; वाङ्मयमंडळ व सिटी लायब्ररी या संस्थांतर्फे; इचलकरंजी—साहित्यसेवा मंडळातर्फे; इंदूर—होळकर कॉलेजमधील मराठी साहित्यमंडळातर्फे; कऱ्हाड—शिक्षणमंडळाच्या कोरेगांव येथील इंग्लिश शाळेंत; सार्वजनिक वाचनालयमध्यें साहित्यसेवामंडळ, टिळक हायस्कूल, सार्वजनिक वाचनालय, ज्ञानविकासमंदिर, आरोग्य-मंदिर, श्रीमारुति उपासक मंडळ, हिंदुधर्म मठ, अर्बन को-ऑ० बँक वगैरे संस्थांच्या विद्यमानें; कुंकळी—(गोवा) ज्ञानप्रसारक समाजातर्फे; केळशी—(गोवा) श्रीसरस्वति विद्यालयांत; कोल्हापूर—राजाराम कॉलेजांतील महाराष्ट्र-वाङ्मय-विहार-मंडळाच्या विद्यमानें; गोवा—(नवीन) श्रीसरस्वति मंदिरातर्फे; चाळिसगांव—श्री. पाटसकर वकील यांच्या दिवाणखान्यांत जाहीर सभा; जमखंडी—श्रीरामसेवा संघातर्फे; जळंब—मुक्तेश्वर सेवादलामार्फत; जेजुरी—हिंदुधर्ममठमिशनच्या विद्यमानें; ठाणें—मराठी ग्रंथसंग्रहालय, म्यु० लोक लायब्ररी, श्रीशारदामंडळ, सन्मित्रमंडळ, ब्राह्मणसभा ऐक्यसंघ, नाना शंकरशेठ कार्योत्तेजक मंडळ, थिऑसॉफिकल लॉज वगैरे संस्थांच्या विद्यमानें; तासगांव—नगरवाचनालयातर्फे; शार्दूलसंघाच्या विद्यमानें; दुधगांव—(सातारा) जाहीर सभा; धारवाड—नागरिकांची सभा; नागपूर—सगदेव हायस्कुलांत; हिस्लॉप कॉलेजांतील महाराष्ट्र भाषासंवर्धक मंडळाच्या विद्यमानें; मॉरिस व सायन्स कॉलेजांतील शारदामंडळातर्फे; नाशिक—वाङ्मयविहार मंडळ व महाराष्ट्र नाट्यमंदिर या संस्थांतर्फे; पडूराजेरा—(जि. खामगांव) मुक्तेश्वर सेवादलामार्फत; पंढरपुर—अभिनव भारतमंडळातर्फे; पाली—सार्वजनिक वाचनालयातर्फे; फत्तेखर्डा—(वऱ्हाड) जाहीर सभा; बारामती—जाहीर सभा; बुलढाणा—जाहीर सभा; बेजेगांव—(ता. खानापूर; जि. सातारा) जाहीर सभा; बेळगांव—वाङ्मयचर्चामंडळ व नगरवाचनालय या संस्थांच्या विद्यमानें; भगूर—(जि. नाशिक) जाहीर सभा;

**भोपाळ**—अखिल महाराष्ट्रीयांची जाहीर सभा; **मडगांव**—सुमारें दहा संस्थांच्या वतीनें; **माटरगांव**—( वऱ्हाड ) जाहीर सभा; **मालवण**—शारदोपासक मंडळाच्या विद्यमानें; **मालाड**—जाहीर सभा; **मिरज**—मिरज विद्यार्थीसंघातर्फे **मुरगांव**—(गोवा) सुबोध मासिकालयातर्फे; **मुंबई**—पाठारे प्रभु सोशलसमाज व लोकमान्यगोशाळा या संस्थांतर्फे; **येवलें**—श्री शा. शा. पहिलवान यांच्या घरीं प्रार्थना; **रहिमतपुर**—( न्हावीबुद्रक ) ग्रामस्थांची सभा; **रिवण**—(गोवा) भारतमित्र मासिकाच्या कार्यालयांत; **वानिवडें**—( ता. देवगड ) ग्रामस्थांची सभा; **शिरवळ**—विठ्ठलमंदिरांत जाहीर सभा; **सांगली**—नगरवाचनालयातर्फे; मराठी वाङ्मयमंडळातर्फे; म्यु० पालिटीच्या टाउन हॉलमध्यें नागरिकांची सभा; **सितामहू**—( सें.इंडिया ) महाराष्ट्रमंडळाचे विद्यमानें; **हिडोंशी**—भोरसंस्थानामधील मावळ्यांची सभा; **हैद्राबाद**—श्री. वामनराव नाईक यांच्या बंगल्यावर नागरिकांची सभा. **लखनौ**—महाराष्ट्रीय मंडळीच्या विद्यमानें.

[ वर प्रमुख अशा संस्थांचा, शहरांचा व गांवांचा निर्देश केला आहे, याखेरीज शेंकडों अभिनंदनपर संदेश व तारा व्यक्तिशः व संस्थांमार्फत आल्या त्यांचा नामनिर्देश स्थलसंकोचास्तव करतां येत नाहीं—सं० ]

---

## श्री. न. चिं. केळकर

**ज्ञानप्रकाश**–बुधवार, श्रावण कृ० ८ शके १८५४.

श्री. नरसिंह चिंतामण उर्फ तात्यासाहेब केळकर यांच्या वयाला आज ६० वर्षें पुरीं होऊन, ईशकृपेनें ते ६१ व्या वर्षांत प्रवेश करीत आहेत, याबद्दल आम्ही त्यांचें अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतों, आणि श्री. तात्यासाहेबांचे असेच कित्येक वाढ दिवस साजरे करण्याचें भाग्य महाराष्ट्राला लाभो असें इच्छितों. श्री. केळकर यांचा हा वाढदिवस आज महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं साजरा करण्यांत येणार असून, खुद्द पुण्यांतही त्यांचें जाहीर रीत्या गौरव करण्यांत यावें, हें अत्यंत उचित आणि स्वाभाविक होय. सध्यां महाराष्ट्रांत जे कांहीं थोडे सार्वजनिक कार्यकर्ते सुदैवानें विद्यमान आहेत, त्या सर्वांत दीर्घकालीन देशसेवा, भरीव स्वार्थत्याग बहुविध वाङ्मयव्यासंग व साहित्यसेवा, विनोदी वक्तृत्व आणि प्रशंसनीय सौजन्य या गुणांनीं विशेष विख्यात असलेला श्री. नरसोपंत केळकर यांच्यासारखा दुसरा गृहस्थ क्वचितच आढळून येईल. त्यांच्या अंगच्या याच ठळक गुणसमुच्चयामुळें आज ते लोकादरास पात्र झाले असून, राजकारणांत त्यांचे प्रतिपक्षी समजल्या जाणाऱ्या लोकांनाही त्यांच्या ह्या गौरवपर समारंभांत मुक्तकंठानें व खऱ्या कळकळीनें भाग घेण्याला केव्हांहि संकोच वाटणार नाहीं. श्री. केळकर यांनीं सार्वजनिक कार्याच्या रंगभूमीवर प्रवेश केल्याला आतां उणींपुरीं तीन तपें झालीं.

या तीन तपांपैकीं पहिल्या तपांत ते लो. टिळकांचे दुय्यम म्हणून काम करीत होते. दुसऱ्या तपांत जबाबदार व कुशल संपादक म्हणून त्यांची कीर्ति झाली, व तिसऱ्या तपांत लो. टिळकांच्या शोचनीय निधनानंतर लोकपक्षीय पुढारीपणाचा पेशा त्यांना स्वीकारावा लागला. या तिन्ही तपांत श्री. केळकर यांनीं बजावलेली कामगिरी फार महत्त्वाची व आदरणीय झालेली आहे, हें सांगावयास नकोच. वृत्तपत्राच्या संपादकाचा व विशेपतः दुय्यम संपादकाचा पेशा पतकरणारांना किती नाजूक परिस्थितींत आपलें काम करावें लागतें, हें कोणालाही स्वानुभवावरूनच कळेल. त्यांतही लो. टिळकांसारख्या अशांत, आग्रही, करारी, धाडसी, स्वमताभिमानी संपादकाच्या हाताखालीं थोडींथोडकीं नव्हत, तर तब्बल बारा वर्षें आपला दर्जा कायम ठेवून काम करण्यांत केळकरांनीं जी शिस्त, जी गुरुभक्ति, आणि जी कार्यनिष्ठा व्यक्त केली, ती खरोखर अनुकरणीय नाहीं असें कोण म्हणेल ! या काळांत त्यांनीं वाङ्मय, इतिहास व राजकारण यांचा केलेला अभ्यास, आणि कोणतेंही काम परिश्रमपूर्वक रीतीनें करण्याची अंगीं बाणवून घेतलेली सवंय हीं वाखाणण्यासारखीं होतीं. १९०८ पासून १९२० पर्यंतच्या काळांत केळकरांनीं केलेली संपादकीय कामगिरीहि त्यांच्या विद्वत्तेची व कुशलतेची खरी साक्ष पटविणारी आहे. या काळांत प्रेस ॲक्टाची सार्वत्रिक कदर असतांहि टिळकांच्या मालकीचीं वृत्तपत्रें सुरक्षित रीतीनें चालविणें हें फार नाजुक काम होतें; पण अशी नाजुक कामगिरीहि करण्यांत, किंवा केळकरांच्या टीकाकारांच्या शब्दांत बोलावयाचें झाल्यास अशा तऱ्हेचा कांहींसा धोक्याचा पण देशहितसाधनार्थ आवश्यक असलेला तारेवरील नाच करण्यांत, त्यांनीं व्यक्त केलेलें कौशल्य त्यांचा लौकिक वाढविण्याला निःसंशय कारणीभूत झालें. यापुढील बारा वर्षांत केळकरांचा वृत्तपत्रांशीं संबंध तुटलेला नसला, तरी एका विशिष्ट राजकीय पक्षाचे पुढारी या नात्यानेंच ते राजकारणांत चमकूं लागले, व त्या दृष्टीनेंच त्यांच्या कामगिरीकडे पाहिलें पाहिजे. या असहकारितेच्या काळांतील त्यांची कामगिरी निःसंशय टीकाविषय झालेली असून, खुद्द टिळकपक्षीयांतच तिचा अधिक्षेप करणारे लोक अधिक आहेत.तथापि आम्हांला असें वाटतें कीं, शांत मनानें आणि **निर्विकार बुद्धीनें हे लोक जर तात्यासाहेबांच्या धोरणाचा फेरविचार करतील, तर त्यांना असें दिसून येईल कीं, त्यांनीं त्यांच्यावर उडविलेले कोरडे अनाठायीं होते.** श्री. केळकरयांनीं टिळकांच्या धोरणाप्रमाणें राजकारण पुढें चालविलें किंवा नाहीं,याबद्दल दुमत होणें स्वाभाविक आहे. परंतु एकंदरीनें विचार केल्यास केळकरांनीं व्यावहारिक व कार्यसाधक धोरण ठेवण्याविषयीं वेळोवेळीं जनतेला दिलेला सल्ला हाच अखेर देशहिताचा ठरत नाहीं काय ! १९२० सालापासून आजतागायत सर्व सामान्यरीत्या त्यांनीं प्रतियोगी सहकारितेचें धोरण स्वीकारण्यांत व्यक्त केलेला मनाचा खंबीरपणा हा त्यांच्या दूरदर्शी पुढारीपणाचा खरा निदर्शक आहे. या धोरणाला कित्येक टीकाकार Neo-Liberalism किंवा नवा नेमस्त

पक्ष असे म्हणतात. नेमस्तपक्षाच्या मताशीं हा प्रतिसहकारपक्ष पुष्कळच जुळता आहे, यांत शंकाच नाहीं. पण असहकारितेच्या वावटळींत आपल्या बहिष्कारविरोधक मतांना चिकटून राहण्यांत आणि आपल्या वृत्तपत्रद्वारें त्यांचा प्रचार करण्यांत श्री. नरसोपंत केळकर यांनीं व्यक्त केलेली चिकाटी, आणि लोकनिंदा सहन करण्याची शक्ति ही त्यांच्या कार्यनिष्ठेचें व दमदारपणाचें उत्कृष्ट प्रत्यंतर होय. श्री. केळकर यांच्या हातून यो काळांत घडलेली प्रमुख कामगिरी म्हटली म्हणजे महाराष्ट्र पक्षाची स्थापना ही होय. या पक्षाच्या पंचायतनांतील कांहीं देवता गांधीमतांत व कांहीं नेमस्तमतांत विलीन झालेल्या असून, **खरोखर श्री. केळकर यांच्या एकट्या मुळेंच हा महाराष्ट्र पक्ष किंवा ही विशिष्ट विचारसरणी आज जिवंत राहिली आहे असें म्हटलें तरी चालेल.** केळकरांच्या मार्गदर्शकत्वाखालीं महाराष्ट्र पक्षाची विसकटलेली घडी पुनः पूर्ववत् बसून, महाराष्ट्राच्या राजकारणाला प्रभावशाली स्वरूप प्राप्त होईल, अशी आम्हांस आशा आहे. श्री. तात्यासाहेब केळकर यांच्या हातून गेल्या तीन तपांत झालेली वाङ्मयात्मक आणि सामाजिक कामगिरीहि अभिमानास्पद आहे. सामाजिक बाबतींत ते जरी कट्टे सुधारक नसले, तरी कट्टर दुर्धारकहि नाहींत. स्त्रीशिक्षण, अस्पृश्योद्धार, मिश्रविवाह वगैरे बाबतींत, प्रगतीच्या मार्गावर कांहीं पावलें पुढें टाकून हिंदु समाजाला आपल्याबरोबर नेण्याची त्यांची प्रवृत्ति ही त्यांच्या प्रगमनशीलतेची निदर्शक आहे. त्या बाबतींत त्यांनीं टिळकपक्षाला पुष्कळच पुढें ओढलें आहे. त्यांच्या साहित्यसेवेबद्दल तर कोठेंच मतभेद नाहीं. ते सरस्वतीचे निस्सीम उपासक आहेत. काव्य, कथा, नाटक आणि निबंध या साहित्याच्या चारी दालनांत त्यांनीं आदराचें स्थान संपादन केलें आहे. मार्मिक टीकाकार म्हणूनहि त्यांचा लौकिक आहे, व कोटीबाज वक्तृत्वांत तर आज त्यांचा हात धरणारा कोणीच नाहीं असें म्हटलें तरी चालेल. तथापि श्री. केळकरांचें खरें मोठेपण हें त्यांच्या लेखणींत किंवा वाणींत नसून, त्यांच्या विचारसरणींत आहे. ते मनाचे मृदु व मवाळ आहेत. त्यांच्या स्वभावांतील सौजन्य हें त्यांचें खरें सामर्थ्य आहे. त्यांच्या अंगचा विनय हा त्यांच्या विद्वत्तेला शोभा आणतो. त्यामुळें त्यांच्या देशभक्तीला सात्त्विक व सोज्ज्वल स्वरूप प्राप्त झालें असून, त्यांच्या सुजनतेची व रसिकतेची छाप त्यांच्या सहवासाचा लाभ मिळणारांवर पडल्याखेरीज खचित राहत नाहीं. सर्व लोकांच्या उपयोगी पडण्याची त्यांची बुद्धि वाखाणण्यासारखी आहे. दुसऱ्याचें गुणग्रहण करणें व इतरांना त्यांच्या अंगीकृत कार्यांत उत्तेजन देणें याहि बाबतींत श्री. तात्यासाहेबांची बरोबरी फारच थोडे लोक करूं शकतील. श्री. केळकर हे आज केवळ पुण्याचेच नव्हे, तर बृहन्महाराष्ट्राचे भूषणभूत पुढारी झालेले आहेत. त्यांच्या राजकीय मतांना आज बाजारांत सवंग लोकप्रियतेची मागणी नसली, तरी लवकरच सध्यांची परिस्थिति पालटून ध्येयवाद व व्यवहारवाद यांची उत्कृष्ट सांगड घालणारा अभिनव महाराष्ट्रपक्ष निर्माण करण्याचें श्रेय श्री. केळकरांना

लाभो असें आम्ही आज त्यांच्या षष्ट्यब्दिपूर्तीच्या समारंभाच्या वेळीं मनःपूर्वक इच्छितों. व आजच्यासारखे त्यांच्या अभिनंदनाचे सुप्रसंग वरचेवर येवोत, अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करून हा लेख पुरा करतों.

---

## केळकरांचें मतस्वातंत्र्य

( लेखकः—दिवाणबहादुर अण्णा बाबाजी लट्ठे, बेळगांव. )

...केळकर हे कै० टिळकांच्या मागून त्यांच्या महाराष्ट्रीय पक्षाचे धुरीण मानले गेले आहेत. अर्थातच त्यांच्या सार्वजनिक आयुष्याचा मुख्य भाग टिळकसांप्रदायाचें कार्य पुढें चालविण्यांत समाविष्ट झाला आहे. ही त्यांची राजकीय बाजू एकीकडे ठेविली तरी त्यांच्या कार्यांपैकीं मराठी साहित्याची त्यांची सेवा त्यांचेविषयीं आदर उत्पन्न करण्यास व त्यांचें नांव महाराष्ट्रांत कायम राखण्यास पुरेशी आहे. टिळकांचे पट्टशिष्य या नात्यानें त्यांनीं बजावलेल्या कामगिरीसंबंधानें त्यांच्या अनुयायांतदेखील थोडा फार मतभेद आहे. मग त्यांच्या प्रतिपक्षास त्याबद्दल टीका करितां आली तर त्यांत आश्चर्य कसलें ? किंबहुना, ज्या राजकारणी पुरुषाच्या कामासंबंधानें मतभेद असत नाहीं तो राजकारणी पुरुषच नव्हे, किंवा त्याचें राजकारण अगदीं बिनरंगी पाणीच होय, असें म्हणतां येईल. तथापि त्यांच्यावर नेहमीं होणाऱ्या टीकेंतही त्यांच्या राजकीय किंवा साहित्यविषयक स्वभावाचें वैशिष्टयच दर्शित केलें जातें, यांत संशय नाहीं. जहाल लोक त्यांना मवाळ समजतात, उलट मवाळ त्यांना आपल्यापैकीं समजत नाहींत. सुधारक त्यांचें वर्णन दुर्धारक या शब्दानें नाहीं, तरी असुधारक या शब्दानें तरी खास करतील; पण पुराणप्रिय लोक त्यांना आपल्यापैकीं समजण्यास कधींच तयार होणार नाहींत. रा० केळकरांचा हा पक्षप्रकार पुष्कळांच्या मतें त्यांच्या मतशून्यत्वामुळें उत्पन्न झाला आहे. तात्यासाहेब म्हणजे एक बिनबुडाचें गाडगें, यामुळें ते सगळ्यापक्षांत आहेतही व नाहींतही अशा प्रकारचा त्यांच्याविषयीं अनेकांचा समज आहे. माझ्या मतें, जे लोक एकाच पक्षास आंधळेपणानें चिकटून राहण्याइतके हट्टी स्वभावाच नसतील, ग्राह्य भाग डोळ्याआड करणें ज्यांच्या सदसद्विवेकास पटत नाहीं, ज्यांना स्वपक्षीयांच्या चुकीचें समर्थन करण्यास लागणारा निगरगट्टपणा पसंत पडत नाहीं, त्यांना भिन्न पक्षांच्या मध्यंतरीं लोंबकळत राहणें किंवा एकांडेपणा पतकरणें भाग पडतें. हा मतविहीनपणाचा परिणाम नसून, सौजन्याचा परिणाम आहे. पक्षाचें नेतृत्व स्वपक्षास परम दैवत मानणाऱ्याचे हातीं असलें म्हणजे अनुयायांना अधिक बरें वाटतें. कोणत्याही देवाचें नांव घेतलें तरी खरा देव एकच असें मानणाऱ्यापेक्षां माझा विष्णु शिवाहून श्रेष्ठ म्हणणारे वीरवैष्णव किंवा त्या उलट प्रतिपादणारे वीरशैव सांप्रदायिकांच्या मतें अधिक धार्मिक ठरतात. राजकारणांतही

हा प्रकार दृष्टीस पडतो. राजकीय अथवा सामाजिक सांप्रदायिकांच्या दृष्टीनें रा० केळकर हे टिळकांच्या गादीवर बसण्यास योग्य पुढारी नव्हेत; परंतु पक्षोपपक्षांच्या महात्म्यापेक्षां व्यापक देशसेवेचें महत्त्व ज्यांना अधिक वाटतें त्यांना रा० केळकरांच्या स्वभाववैशिष्ट्याचें मूळ कोठें आहे हें अधिक पटण्यासारखें आहे.

---

## इतिहासांतील अढळस्थान

### ( डॉ० रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे. )

पुणें शहर, महाराष्ट्र आणि हिंदुस्थान यांविषयीं आस्था वाटणारे सर्व लोक श्री. न. चिं. केळकर यांचें ६१ व्या वाढदिवसानिमित्त अभिनंदन करून तत्परतेनें असेंच उपयुक्त कार्य करण्यासाठीं त्यांना दीर्घायुरारोग्य लाभो अशी सदिच्छा व्यक्त करतील. त्यांचीं कार्यक्षेत्रें विविध असून त्या सर्वांत त्यांनीं वैशिष्ट्य संपादन केलें आहे, व त्यामुळें गेलीं बरींच वर्षें महाराष्ट्रांत ते एक स्वतंत्र संस्थाच होऊन राहिले आहेत. सर्वच गोष्टींत त्यांच्याशीं मतैक्य होईलच असें नाहीं. तरी पण त्यांची उत्कट देशभक्ति, अचुक व्यवहारचतुरता, समतोल विचारपद्धति आणि उच्च दर्जाचें सुसंस्कृत बुद्धिवैभव यांविषयीं कोणाचेंही दुमत होणार नाहीं. त्यांची भाषाशैली चटकदार व विनोदगर्भ आहे. प्रतिपक्षाला त्यांनीं दोन ठोसे दिलेही आहेत आणि स्वतः घेतलेही आहेत. तथापि नवभारताच्या इसिहासांत त्यांचें स्थान अढळ आहे.

---

## स्वमतांविषयीं प्रामाणिकपणा

### लेखक—गोपाळ कृष्ण देवधर एम्. ए.

[ अध्यक्ष, सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी. ]

" वास्तविक केळकरांच्या मनाची घडण मवाळ आहे आणि म्हणूनच त्यांची प्राप्त–भूमिका त्यांच्या मनोभूमिकेशीं विसदृश वाटते ( In his present position he is a round ball in a square hole). उदात्त संस्कृतीमुळें त्यांच्या सहानुभूतीचें क्षेत्र विस्तृत झालें आहे. पण या दोहोंमुळेंच मानवी जीविताच्या एकाद्या विवक्षित अंगाविषयींच आत्यंतिक स्वरूपाचीं मतें बाळगणें सामान्यतः दुर्घट होऊन बसतें. अन्यायाविषयीं स्वभावतःच एकाद्या माणसाला चीड वाटत असते. त्याचप्रमाणें एका विशिष्ट क्षेत्रांत समाजावर होत असलेल्या अन्यायांना देखील केळकर अपवाद म्हणून समजणार नाहींत. परंतु राजकीय विचार बरेचसे पुरोगामी असून देखील व्यावहारिक अडचणी व दीर्घकालीन पूर्वसंबंधयांमुळें केळकरांचा समाज–सुधारणेविषयींचा उत्साह दबला गेला आहे. गेलीं कित्येक

वर्षें त्यांचा स्नेही असण्याचें भाग्य मला लाभलें आहे. जरी ते माझ्यापेक्षां वयानें थोडे लहान असले तरी माझ्या पूर्वींच सार्वजनिक कार्याला त्यांनीं प्रारंभ केला आहे. त्यांचें सौजन्य, अष्टपैलू बुद्धिमत्ता आणि त्यांना मिळालेला जगाचा विस्तृत अनुभव यांमुळें मतभेद टाळून शक्य तों मिळतें घेण्याची त्यांची हातोटी विलक्षण आहे. मतभेद हे असणारच; परंतु सार्वजनिक कार्यामध्यें मतांचा बराचसा प्रामाणिकपणा व प्रतिपक्षीयांविषयीं गुणग्राहकता यांची अत्यंत जरुरी असते. कारण त्यामुळेंच तें सार्वजनिक कार्य सुलभ होऊन त्यांतील कार्यकर्त्यांचे परस्पर-संबंध सलोख्याचे व गोडीगुलाबीचे रहातात. सार्वजनिक कार्यकर्त्यांमध्यें या गुणविशेषाचा विकास करण्याचें श्रेय माझ्या मतें श्री. नरसोपंत यांनाच द्यावें लागेल आणि जरी त्यांच्या अंगच्या या सहिष्णुतेमुळें त्यांच्यावर प्रसंगीं प्रतिकूल टीका होत असली तरी माझी अशी खात्री आहे कीं, माझ्याप्रमाणेंच असे पुष्कळ लोक आहेत कीं, ते याबद्दल त्यांची प्रशंसाच करतील. कारण, भिन्नभिन्न मार्गांनीं प्राप्त करून घ्यावयाच्या अनेकविध राष्ट्रहिताच्या दृष्टीनें या सार्वजनिक सद्गुणांची जोपासना करणें अगत्याचें आहे.

---

## श्री. केळकर व सुभाषबाबू

[ केसरी, ता. ६-९-३२.]

बंगालचे सुप्रसिद्ध पुढारी श्री. सुभाषचंद्र बोस यांनीं मद्रासच्या तुरुंगांतून केसरीचे उपसंपादक श्री. आ. रा. भट यांना एक पत्र पाठवून श्री. तात्यासाहेब केळकर यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त त्यांजविषयींची आपली प्रेमादरपूर्ण भावना व्यक्त केली आहे. ते लिहितातः—

......लोकमान्यांचे निधनानंतर श्री. केळकर यांचें महाराष्ट्रांतील सार्वजनिक कार्याशीं अभिन्न असें नातें जडलें आहे. लोकमान्यांनीं त्यांच्यावर टाकलेल्या विश्वासाप्रमाणें त्यांनीं जें कार्य केलें त्याबद्दल महाराष्ट्रांतील त्यांचे सहकारी व अनुयायी हेच माझ्याहून अधिक अधिकारवाणीनें बोलू शकतील; पण त्या कार्या-शिवाय स्वराज्य-पक्षांत त्यांनीं बजावलेली कामगिरी मोठी आहे. देशबंधु दास यांच्या पुढाकाराखालीं बंगल्यांत जें कार्य चालत होतें त्याबद्दल श्री. केळकरांना किती आस्था वाटे हें मी प्रत्यक्ष पाहिलें आहे.

केळकर म्हटले कीं बारा महिने अठरा काळ भरीव स्वरूपाचें कार्य अखंड करीत राहण्याचा गुण डोळ्यांपुढें उभा राहतो. वाङ्मय, इतिहास, समाजशास्त्र वगैरे विषयांकडे त्यांनीं किती लक्ष पुरविलें आहे हें त्यांच्या लेखन—भांडारावरून कळून येतें; त्यांची कर्तव्यनिष्ठा तर एखाद्या पर्वताप्रमाणें अचल आहे. स्थिर—

गंभीर अशा वृत्तीची त्यांची स्मृति त्यांच्या देशबांधवांना एक मोठी जिंदगीच वाटेल यांत शंका नाहीं. मुख्य सांगावयाचें तें हें कीं, श्री. केळकर हे तरुण पिढीचे मित्र आहेत. परिस्थिति शीघ्र गतीनें बदलावी याबद्दल घाई व गडबड करणाऱ्या तरुणांनीं डोळे मिटून आपलें म्हणणें ऐकावें, व आपली बुद्धिमत्ता आपल्यापाशीं गहाण टाकावी, अशी त्यांची कधींच इच्छा नसते."

---

## तात्यासाहेबांच्या अखंड देशसेवेचें असाधारण स्वरूप

[केसरी, अग्र. ता. २६-८ ३२.]

अन्या जगद्धितमयी मनसः प्रवृत्तिः । अन्यैव कापि रचना वचनावलीनाम् ॥
लोकोत्तरा च कृतिराकृतिरार्यहृद्या । विद्यावतां सकलमेव गिरां दवीयः ॥
पंडित जगन्नाथराय.

### मुख्य साहित्यसेवा कीं राजकारण

केळकरांची सर्वत्र साहित्यसेवक म्हणून स्तुति करण्यांत येते व त्या स्तुतीस ते सर्वथैव पात्रहि आहेत. परंतु त्या स्तुतींतून थोडासा निंदेचा गर्भित ध्वनि निघतो हें पुष्कळ चाणाक्ष लोकांच्या लक्षांतहि आलें असेल. सदर स्तुतीचा अर्थ असा होतो कीं, केळकरांची राजकीय कामगिरी महत्त्वाची नसून त्यांची मुख्य देशसेवा म्हणजे साहित्यसेवाच होय. परंतु ही समजूत चुकीची आहे, इतकेंच नव्हे तर अन्यायाचीहि आहे. टिळक असतांना व नसतांनाहि केळकरांनीं मुख्यतः जर कोणत्या कामास वाहून घेतलें असेल तर तें राजकारणासच होय. लो. टिळकांच्या हयातींत महाराष्ट्राच्या किंबहुना हिंदुस्थानाच्या राजकारणाची जबाबदारी टिळकांनीं स्वतःच उचलली होती. तरी राजकीय प्रश्नांचें त्यांच्याइतकेंच चिंतन व मनन केळकर स्वतःच करीत व त्याबद्दल त्यांनीं स्वतंत्रपणें बनविलेल्या मतांची योग्यता ओळखून त्यांचा योग्य तो फायदा टिळक करून घेत. जो राजकारणांत केवळ सांगकाम्या आहे, परप्रत्ययनेय आहे किंवा बेपर्वा आहे तो इतक्या खोल पाण्यांत शिरेल कशाला? ज्या वेळीं जो कोणी राजकीय कर्णधार असेल त्याच्या नावेंत बिनधोकपणें बसावें व लोकनिंदेच्या संकटकक्षेंत न सांपडतां परतीर गांठावें असेंच तो आपलें सुरक्षित धोरण ठेवील. केळकर राजकारणाविषयीं बेपर्वा व बेजबाबदार असते तर त्यानीं आपल्या आवडीच्या अशा साहित्यसंगीतांत बुद्धि व मन रमवून वरील कमी कष्टाचा व अधिक लोकप्रियतेचा धोपट मार्ग चोखाळला असता.

........साहित्य-सेवकाला राजकारणाचें कुपथ्य वाटतें व राजकीय पुढाऱ्याला साहित्यसेवेचें नांव काढलें कीं, त्याच्या कपाळावर आठ्यांचें जाळें पसरतें. इतका या दोन विषयांचा छत्तीसाचा आंकडा आहे. तो आंकडा बदलून त्याच्याऐवजीं त्रेसष्टाचा आंकडा त्यांनीं घातला व जनतेंत केळकरांचें राजकारण

श्रेष्ठ कीं साहित्यसेवा श्रेष्ठ यांविषयीं वाद माजावा इतकी दुतर्फी कामगिरी बजावली याबद्दल त्यांची करावी तितकी स्तुति थोडीच आहे. परंतु त्यांचें कार्य नुसतें राजकीय नाहीं किंवा नुसतें साहित्यविषयकहि नाहीं. शिरोभागीं उध्दृत केलेल्या श्लोकांत पंडित जगन्नाथराय यांनीं म्हटल्याप्रमाणें केळकरांची मनःप्रवृत्ति आपल्या हातून सर्व बाजूंनीं देशाचें होईल तितकें हित व्हावें अशीच असल्यानें त्यांना सामाजिक, धार्मिक, औद्योगिक, शैक्षणिक अशा शेंकडों मार्गांनीं देशहित साधतां आलें आहे. तें साधीत असतां त्यांच्या विद्वत्तेस शोभेल अशा रीतीनें मराठी भाषेस त्यांनीं प्रतिष्ठेस चढविलें, कृति लोकोत्तर केली व पंडित जगन्नाथ राय यांची उक्ति त्यांस सर्वस्वीं लागू पडावी म्हणूनच कीं काय त्यांना देवाच्या दयेनें आकृतिहि सुंदर अशीच लाभली.

---

## टिळक व केळकर

( लेखक—श्री. ग. वि. केतकर, वकील, नाशीक )

.........टिळकांत नव्हते असे पुष्कळ गुण केळकरांमध्यें आहेत. मराठी भाषा ही केळकरांनीं इतकी संपन्न केली आहे कीं, टिळकांची भाषा बोजड वाटते. केसरी पत्राला केळकरांनीं सर्वसंग्राहक स्वरूप दिलें. राजकीयेतर अशा विषयांचा टिळकांपेक्षां केळकरांनीं अधिक परामर्ष घेतला. टिळकांच्या वेळीं प्रसंगानें उत्पन्न झालेले कित्येक वैरभाव केळकरांनीं पुसून टाकले. टिळकांच्या परिवारांतील मंडळीपेक्षां केळकरांच्या परिवारांतील मंडळींना मतस्वातंत्र्य अधिक लाभतें. कारण ठराविक व जरूरीच्या मर्यादेबाहेर एकाद्याला मताचें बंधन घालणें केळकरांना रुचत नाहीं.

टिळकांच्या मागें त्यांच्या कार्याची परंपरा आज टिकली आहे याला कारण केळकर हेच होत. आणि टिळकांचे निकटवर्ती सहकारी अगर दूर राहणारे पट्ट-शिष्य यांपैकीं ज्या ठळक मूर्ति लोकांचे डोळ्यांसमोर आहेत, त्यांपैकीं कोणाहि व्यक्तीला केसरीचें धुरीणत्व मिळालें असतें तर त्याचें आज राहिलें आहे इतकें सर्वांगीण उपयुक्त स्वरूपहि राहिलें नसतें. या अनुयायांत एकेका विशिष्ट गुणानें उत्कट असे लोक आहेत. पण त्यांत केळकरांइतका अष्टपैलू मनुष्य दुसरा कोणी नाहीं. टिळकांसारखा थोर पुरुष झाला तरी तो असलेल्या माणसांतूनच निवड करणार. त्यांनीं केळकरांची निवड केली यांत त्यांची गुणांची पारख व केळकरांचा मोठेपणा या दोन्ही गोष्टी एकदम दिसतात. टिळक ते टिळक व केळकर ते केळकर हें तर केव्हांहि खरेंच. पण टिळकांचे मागें केळकर तरी लाभणें हें महाराष्ट्राचें भाग्यच होय. [‘लोकमान्य’ मुंबई]

---

# राजकारणांतील केळकरांची समेटदृष्टि

(ले.–बॅ. रामराव माधवराव देशमुख, माजी दिवाण 'उदय' उमरावती)

लोकमान्य टिळकांनीं आपल्या ' केसरी-मराठा संस्थेचा भार अत्यंत मोठ्या विश्वासानें देशभक्त तात्यासाहेब केळकर ह्यांच्यावर टाकला, व तात्यासाहेबांनींहि लोकमान्यांच्या सहवासांत अत्यंत स्वार्थत्यागानें अखेरपर्यंत राहून तो सांभाळला. ही एकच तात्यासाहेबांची कामगिरी, वास्तविक पाहिलें असतां अत्यंत महत्त्वाची आहे. पण, ह्याच कामगिरीचा गौरव करावयाचा, म्हणजे तात्यासाहेब कोणत्या दर्जाचे संपादक वा संचालक आहेत या दृष्टीनें त्यांच्याकडे पहाणें अवश्य आहे. परंतु, मी संपादक नव्हे व संचालकहि नव्हे; तेव्हां ह्या गोष्टीसंबंधानें मी कांहीं न लिहिणेंच उचित. परंतु, तात्यासाहेबांची ओळख निव्वळ संपादक म्हणूनच सर्वत्र आहे असें नाहीं; तर लोकमान्य ज्याप्रमाणें संपादकहि होते व राजकारणांतील पुढारीहि होते, त्याचप्रमाणें तात्यासाहेबहि आज महाराष्ट्राचे राजकारणांतील एक पुढारी आहेत. लोकमान्यांचें पुढारीपण स्वयंसिद्ध होतें, त्याप्रमाणें तात्यासाहेबांचें पुढारीपण स्वयंसिद्ध नाहीं हें मात्र खरें. कारण, त्यांचें उमेदीचें सर्व आयुष्य लोकमान्यांच्या सहवासांत लोकमान्यांना विश्वासपूर्वक मदत करण्यांतच खर्चे झाल्यामुळें स्वयंसिद्धवृत्ति प्रायः कमी झाली तर कांहींच आश्चर्य नाहीं.ह्याचा अर्थ स्वयंसिद्धप्रवृत्तीचे त्यांच्यांत गुण नाहीं असें नाहीं; ते आहेत. परंतु एका महान् विभूतीनें करून ठेवलेला लोकसंग्रह चालविणें, त्यांनीं नांवारूपास आणलेल्या संस्था तशाच लौकिकास चढविणें, ही गुरूची जबाबदारी त्यांच्यावर पडल्यामुळें स्वयंसिद्ध गुणांचा त्यांना एकप्रकारें जाणूनबुजून स्वार्थत्याग करावा लागला किंवा लागतो हेंहि स्पष्ट दिसतें. तात्यासाहेब हे ज्या काळांत लोकमान्यांजवळ राहिले, त्या काळांतच त्यांनीं आपलें स्वयंसिद्धत्व स्वार्थत्याग करून गुरुचरणीं अर्पण केलें. लोकमान्यांच्या निधनानंतरचीं बारा वर्षें हिंदी राष्ट्राच्या राजकारणांत अशा विलक्षण रीतीनें वाढीस लागलीं कीं, बरेच नवे विचार व बऱ्याच नव्या गोष्टीहि उत्पन्न होऊं लागल्या. त्या सर्वांत लोकमान्याप्रमाणें केळकर हे आघाडीवर दिसत नाहींत, म्हणून केळकरांच्या पुढारीपणांत स्वयंसिद्धत्व नाहीं असें म्हणण्यांत येतें. वरवर पाहणाऱ्यांच्या दृष्टीनें हें बरोबरहि आहे. परंतु हा प्रश्न सोडवितांना लोकमान्यांचें स्वयंसिद्ध पुढारीपण राजकारणांत कोणत्या वृत्तींत होतें हें प्रथम पाहिलें पाहिजे. व त्या वृत्तीचे केळकर हे परिपोष करणारे आहेत किंवा नाहींत, ह्याचा विचार केला पाहिजे.

लोकमान्यांची राजकारणांतील वृत्ति पहावयाची असली, तर ती त्यांच्या काळांत उद्भवलेल्या कांहीं प्रसंगांतूनच पाहिली पाहिजे. १९०६ इ०ची कलकत्ता-कॉंग्रेस, त्यानंतर सुरत-कॉंग्रेस, १९०८ इ.चा खटला, सुटून आल्यानंतर झालेली

बेळगांव-काँग्रेस, व अखेरची अमृतसर-काँग्रेस, ह्यांत टिळकांची राजकारणांतील स्वयंसिद्धवृत्ति कोणती होती हें स्पष्ट होतें. १९०६ इ.च्या कलकत्ता काँग्रेसला टिळक-पक्षाला शह देण्याकरितां महर्षि दादाभाई नवरोजी ह्यांना मुद्दाम अध्यक्ष म्हणून बोलावण्यांत आले होते. टिळकांनीं त्याबद्दल आनंदच व्यक्त केला. सदर काँग्रेसमध्यें बहुमताच्या जोरावर टिळकांना वाटेल तें करिता आलें असतें इतकें त्यांचें सामर्थ्य होतें. कारण, अरविंद घोष व बिपिनचंद्र पाल वगैरे राष्ट्रीय पुढारी टिळकांच्या छत्राखालींच काम करावयास तयार होते. परंतु बहुमताच्या जोरावर कोणतीहि गोष्ट तेथें न करितां त्यांनीं मोठ्या चातुर्यानें प्रतिपक्षाकडील भीष्म-द्रोणांना आपलेसे करून राष्ट्रीयपक्षाची चतुःसूत्री एकमतानें तेथें मान्य करून घेतली. सुरत काँग्रेसमध्यें टिळकांचा वाद नेमस्तांशीं फाटतें घ्यावें ह्याकरितां नव्हता, तर समेट करण्याकरितांच होता. पण टिळक व त्यांचा राष्ट्रीयपक्ष काँग्रेसमध्यें आपल्या-बरोबर राहिला व आपण त्यांच्याबरोबर राहिलो कीं, आपल्यावर सरकारचा रुसवा होईल व आपलें वजन सरकारांत राहणार नाहीं, ह्या समजुतीनें टिळकांना व त्यांच्या पक्षास दूर ठेवण्याचा अट्टहास प्रतिपक्षाकडून सुरत-काँग्रेसमध्यें झाला, व ती काँग्रेस मोडली. परंतु अरविंद ह्यांच्यासारखे त्या वेळचे जवाहरलाल नेहरू पाठीशीं घेऊन जुळतें घेण्याचा टिळकांचा विचार होता, हा इतिहास स्पष्ट आहे. १९०८ इ.च्या खटल्यांत लोकमान्यांचा स्वतःच्या कायदेशीर निर्दोषीपणावरील वाढता आत्मविश्वास तर प्रगट झालाच झाला; पण शिक्षा झाल्यानंतर जी उज्ज्वल वाणी त्यांच्या मुखांतून त्या वेळीं बाहेर आली, तींतून 'माझ्या क्लेशानेंहि कदा-चित् माझें संकल्पित कार्य पुरें व्हावें असा ईश्वरी संकेत असेल,' असे निश्चयात्मक शब्द बाहेर पडले. ह्या शब्दांत अंगीकृत कार्याविषयींची तळमळ व तें पूर्ण होण्याविषयींची आतुरता प्रगट होते. ह्या क्लेशांतून सुटून आल्यानंतर सुरतेला फाटलेलें जुळविणें ह्याकरितां बेळगांवला प्रांतिक-परिषद् झाली, व तींत जुळविण्या-चाच विचार टिळकांनीं प्रामुख्यानें पुढें मांडला, आणि १९१६ इ.मध्यें राष्ट्रीय-सभेची एकमुखी मागणी तयार केली. आणि एवढा उद्योग केल्यानंतरहि जें मॉन्ट-फर्ड सुधारणांनीं लाभलें, त्यावर अपूर्ण, असमाधानकारक व निराशजनक असें अमृतसर-काँग्रेसमध्यें म्हणून ठेवलें. ह्या सर्व प्रसंगांतून लोकमान्यांची स्वयं-सिद्धवृत्ति कोणती होती हें जर आपण पाहूं लागलों, तर शक्य तितका आपसांत समेट करून लोकपक्षाची शक्ति तयार करणें, आणि सरकारकडून जें मिळेल तें अपूर्ण व असमाधानकारक आहे असें म्हणत पुढचें ध्येय गाठण्याची तयारी करीत राहणें ही. सहकार व असहकार असे शब्द जरी त्या काळीं रूढ झाले नव्हते, तरी सरकाराविषयीं असंतुष्ट असणें, राहणें, व तें प्रस्तुत करणें, हें बीज मात्र कायम होतें. आणि म्हणूनच ज्यांचें कधींच समाधान व्हावयाचें नाहीं, त्यांच्याशीं न बोलणेंच बरें, अशी अधिकाऱ्यांची लोकमान्यांविषयीं समजूत होती. ह्याकरितां भेटीगांठीचें व वादविवादाचेंहि सहकार्य त्या वेळचे अधिकारी टिळकांशीं करीत

नसत. सहकार करा वा असहकार करा, पण पूर्ण स्वराज्य पदरांत पडेपर्यंत असंतुष्ट रहा, हें त्यांच्या सहकाराचें म्हणा, वा असहकाराचें म्हणा, बीज होतें.

टिळकांच्या राजकारणांतील ही स्वयंसिद्धवृत्ति अशा तऱ्हेनें प्रतीत झाल्यानंतर केळकरांनीं ह्या वृत्तीचें पोषण केलें किंवा नाहीं, आणि तेहि स्वतःची स्वयंसिद्ध-वृत्ति विसरून गेले किंवा नाहीं, हाच प्रश्न महत्त्वाचा आहे. टिळक सुटल्यानंतर टिळकांनीं जो समेट बेळगांव येथें केला, तोच समेट टिळक सुटण्याच्या सुमारास सातारा येथें केळकर करा म्हणत होते. पण टिळकांचे अनुयायी म्हणविणारांना त्या वेळीं ती गोष्ट हास्यास्पद वाटली ह्यावरून गुरूची वृत्ति ओळखून कार्याचें बीजारोपण करणारा शिष्य निराळा, व मी गुरूसारखा कसा दिसेन व गुरूच्या पुढें कसा जाईन, असें म्हणणारा शिष्य निराळा. केळकर हे टिळकांचे शिष्य खरे, पण ते गुरूच्या वृत्तींतील मर्म ओळखून तिचें पोषण करणारे शिष्य होत. सोलापूर-परिषदेंत केळकर अध्यक्ष होते आणि त्यांच्या अध्यक्षतेखालीं टिळक व बेझन्ट यांच्या वादाचा निर्णय लागणार होता. केळकरांचीं मतें टिळकांना पूर्ण अनुकूल; पण मतमोजणीच्या प्रसंगीं गडबड न करण्याविषयीं गुरूसहि स्वस्थ राहण्यास बजावणारे निर्भिड शिष्य व सेवक केळकरच. आणि असा निर्भीड व निरपेक्ष सेवक विश्वासांत घेऊन वागणारे टिळक हे गुरूहि धन्य. टिळकांच्या निधनानंतर महाराष्ट्राचें राजकारण सहजगत्याच केळकरांच्याकडे आलें, आणि सहकार कीं असहकार ( काउन्सिल प्रवेश, कीं बहिष्कार ) असा वाद पुढें आला. टिळकांनंतर टिळकांच्या अनुयायांची मोटची मोट कलकत्ता येथें १९२० इ.च्या जादा-कॉंग्रेसमध्यें हजर होती. पण कोणासहि असहकारावर जय मिळवितां आला नाहीं. हें असें घडून यावें असें केळकरांनाहि वाटत नव्हतें; पण घडून आल्यावर फाटाफूट नको, म्हणून, एक वर्षाच्या कराराचा संधि झाला. ह्या संधीनंतर देशबंधु दासाबरोबर काउन्सिल–प्रवेशाला त्यांनीं तोंड फोडण्यास पुढाकार घेतला. पुढें देशबंधूंचें निधन झालें. पं. मोतीलाल नेहरूशीं साबरमतीच्या आश्रमांत महात्माजींपुढें समेट करण्याचा प्रयत्न झाला, त्यांत केळकर होते. समेट फसल्यानंतर जयकर–मुंजे–अणे ह्यांच्यासह प्रतिसहकार पक्षाचें शिंग त्यांनीं फुंकलें. तरी मोतीलाल नेहरूशीं, सरकारशीं झगडतांना त्यांनीं साथ दिली. १९३० इ. च्या चळवळींतहि समेट-बुद्धीनेंच केळकरांनीं भाग घेतला होता. अशा प्रकारें आपसांत शक्य तितकी समेटवृत्ति दाखविण्याकडे त्यांची मनःप्रवृत्ति. ती टिळकांत होती म्हणूनच त्यांच्यांत उतरली. ह्या १९३२ इ. च्या चळवळींत केळकर तटस्थ आहेत असें वाटे. पण त्यांनीं प्रसंग साधून लोकपक्षाची एक जूट करून राष्ट्रीयसभेस नैतिक पाठिंबा देण्याचा निर्धार केलेला दिसतो. होअरच्या नव्या धोरणावर जे सध्यां रुसलेले आहेत ते जाहीरपणें म. गांधीवांचून आम्ही वर्तुळ–परिषदेस जाणार नाहीं, असें म्हणत नाहींत. पण केळकर त्यांना घेऊन चालण्याकरितां त्यांच्या मनांत तसें आहेच असें जाहीरपणें म्हणूं लागले. ह्यांत आपसांतील समेटवृत्ति प्रतिबिंबित

होत असून लोकपक्षाचें बळ वाढतें. लोकपक्षाचें बळ वाढविण्यास लोकमान्यांच्या ठायीं जो एक गुण होता, तो केळकरांत आहे. आणि म्हणूनच लोकमान्यांनंतर ज्या नानास्वरूपाच्या तत्त्वाच्या चळवळी निघाल्या व वाढीस लागल्या, त्या सर्वांत केळकरांनीं पुढारीपण घेतलें नाहीं. पण सरकार त्यांचे विरुद्ध गेलें असतां त्यांना तेवढ्यापुरती साथ दिली आहे व साहाय्य देण्यास पुढाकार घेतला आहे. सरकाराविरुद्ध लोकपक्ष तयार करण्यांत केळकर हे टिळकांप्रमाणेंच समेटवादी आहेत. सरकारानें कांहींहि दिलें तरी जसें टिळकांचें समाधान होत नसे, तसेंच केळकरांचेंहि आहे. केळकरांच्या ‘ केसरीं ’ तून वा भाषणांतून असा समाधानाचा शब्द कधींहि निघाला नाहीं. उलट सरकाराची मुद्देसूद व तर्कशुद्ध रीतीनें आणि कडकपणानें हजेरी घेणारें पत्र म्हणून ‘ केसरी ’ इतकें उत्कृष्ट पत्र अद्याप महाराष्ट्रांत एकहि पक्षाचें नाहीं. तेव्हां राजकारणांत केळकरांकडे पहावयाचें झाल्यास टिळकांमधील जे दोन मुख्य गुण वा वृत्ति, त्या वृत्तींचें ते पोषण करतात किंवा नाहीं, ह्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे. टिळकांना ज्याप्रमाणें संकटें सहन करावीं लागलीं त्याप्रमाणें केळकरांना सहन करावीं लागली नाहींत. पण ज्या गोष्टीकरितां टिळकांनीं संकटें सहन केलीं, त्या गोष्टी प्रतिपक्षाच्या सहज पचनीं पडल्या ही टिळकांची पुण्याई केळकरांना लाभली म्हणूनच. त्या गोष्टी करूनहि केळकरांना टिळकाइतका खडतर तुरुंगवास घडला नाहीं, हा त्यांना गुरुप्रसाद लाभला. तेव्हां त्या भाग्याचा हेवा करून खऱ्या कर्तृत्वाकडे वाकड्या नजरेनें पाहणेंहि समंजसपणाचें नाहीं. टिळकांचें पुढारीपण जसें स्वयंसिद्ध होतें, तसें केळकरांचें तें त्यांच्याच आश्रयानें वाढल्यामुळें नसेल. पण गुरूच्या पुढारीपणांतील मुख्य तत्त्वांचा वा वृत्तींचा, प्रसंग पाहून व परिस्थिति पाहून आणि स्वतःची शक्ति पाहून विकास करावयास अथवा पोषण करावयास ते कधींहि चुकले नाहींत. तेव्हां त्यांना अधिक आयुरारोग्य व बल जर पुढें परमेश्वरानें दिलें तर ते महाराष्ट्र तर संघटित करतीलच करतील, व लोकपक्ष संघटित करून राज्यकर्त्यांशीं झुंज घ्यावयासहि समर्थ ठरतील. ईश्वरानें महाराष्ट्रांतील ह्या त्यागी, विद्वान् व कर्तृत्ववान् पुरुषास अधिक आयुष्य व बल द्यावें अशी सर्व महाराष्ट्राची सदिच्छा तात्यासाहेबांना साठ वर्षें पूर्ण झाल्यामुळें असणें स्वाभाविकच आहे. कारण, आज तात्यासाहेब म्हणजे महाराष्ट्र व महाराष्ट्र म्हणजे तात्यासाहेब, अशीच परिस्थिति आहे.

[‘उदय’ उमरावती ]

## केळकरांचा ग्रहयोग !

( ले.-रा. शं. राजवाडे, सं.-'कर्मयोगी' सोलापूर, 'लोकमान्य' मुंबई )

१९३० सालच्या सत्याग्रहाच्या वेळीं आपले सहकारी किंवा अनुयायी यांना कायदेभंगाची अनुज्ञा देऊनच केवळ नव्हे तर स्वतः मीठ तयार करण्याचा-विकण्याचा-विकत घेण्याचा-तसेंच आक्षिप्त वाङ्मय जाहीर वाचून दाखविण्याचा वगैरे निरनिराळ्या प्रकारचे सत्याग्रह स्वतः करून कायदेभंग करणाऱ्या-केळकरांनाहि-सरकारनें त्यांना तुरुंगांत टाकलें नाहीं याचाहि दोष केळकरांच्याच माथीं मारण्याच्या अंतस्थ हेतूनें-ते कायदेभंगाच्या तात्त्विक दृष्टयाहि विरुद्ध आहेत असें समजणारे, सद्‌गृस्थ पाहिले ऐकले म्हणजे " नावडतीचें मीठ अळणी " कसें असतें याचा चांगलाच प्रत्यय येतो ! लोकमान्यांच्या जीवमानापर्यंतच्या केळकरांच्या आयुष्य-क्रमापेक्षां नंतरचें त्यांचें आजपर्यंतचें सार्वजनिक आयुष्य स्वतंत्र रीतीनें व ताजेपणीं लोकांच्यापुढें आहे. तें ज्यांनीं ज्यांनीं न्यायबुद्धीनें व दक्षतेनें अवलोकन केलें असेल, त्यांना त्यांना दे. केळकर हे आपल्याकडून पराकाष्ठेचें कर्तृत्व दाखवीत असतांहि त्यांच्यावर दोषैकदृष्टीची, अनुदारपणाची, असभ्यपणाचीच काय पण प्रसंगीं कृतघ्नपणाचीहि टीका कां व्हावी व त्यांत खुद्द केळकरांचा दोष किती, परिस्थितीचा किती व टीकाकारांचा प्रामाणिक पण अविचारी किंवा मत्सरग्रस्त व व्यक्तिद्वेषपूर्ण वृत्तीचा असा किती याचा उलगडा होत आला असेल. थोडक्यांत सांगावयाचें तर असेंहि म्हणतां येईल कीं, उभ्या महाराष्ट्रांत व म्हणूनच अखिल भारतांत देखील ज्यांच्याबद्दल निष्कारण गैरसमज झाला आहे किंवा केला जात आहे. ( Misunderstood, misinterpreted & misrepresented ) असा पुढारी आजकाल दे. केळकरांशिवाय दुसरा क्वचितच असेल ! इतकें असूनहि " केळकरांशीं जमत नाहीं व केळकरांवांचून जमत नाहीं " अशी त्यांच्या विरोधकांचीहि स्थिति होत असते ती वेगळीच ! तात्यासाहेबांच्या पत्रिकेंतील ग्रहांचा योग कांहीं बलवत्तरच असला पाहिजे यांत शंका नाहीं......

......" लोकमान्य टिळक पूज्य आहेत पण ते स्नानसंध्या करीत नाहींत अशी तक्रार कोणा कर्मठानें खुद्द केळकरांजवळ केली असतां " " स्नानसंध्या करणारे टिळक आणा म्हणजे या टिळकांना मी सोडतों " असें त्यांनींच उत्तर दिल्याचें ऐकिवांत आहे. तसेंच आम्हीहि म्हणूं इच्छितों कीं, " धडाडीचे केळकर कोणते ते आणा म्हणजे या केळकरांस आम्ही सोडतों. " अस्तु......

# केळकरांनीं केलेलें टिळकांचें कार्य

( ले.–श्री. ना. रा. वामणगांवकर, सं.–'उदय' उमरावती )

...मूल संस्थापक हा जसा आपल्या कार्यक्षेत्रांत पूर्ण स्वतंत्र असतो, तसा शिष्य स्वतंत्र नसतो. शिष्याला गुरूनें टाकलेल्या नैतिक जबाबदारीचें बंधन पाळावेंच लागतें. हें नैतिक जबाबदारीचें बंधन जर शिष्य पाळणार नाहीं, तर त्यास शिष्य म्हणतां येणार नाहीं. उत्तम शिष्य या दृष्टीनें विचार करतां केळकरांत श्रद्धा आहे असें म्हणणें भाग येतें. केसरी व मराठा ही संस्था चिरस्थायी करून तिच्या द्वारें टिळकांनीं नानाविध स्वरूपाच्या चळवळी सुरू केल्या व तिचें पोषणहि केलें. **पण ह्या सर्व कार्याचें मूळ केसरी–मराठा संस्था हें होय.** ह्या संस्थेखेरीज टिळकांनीं जें स्वतः ग्रंथलेखकाचें कार्य केलें तें कार्य त्यांचें त्यांनाच साधण्यासारखें होतें तें कार्य शिष्याकडून होण्यासारखें नव्हतें. तें कार्य चालवावयाचें झालें तर त्याकरितां समानधर्मी पुरुषच लागावयाचा. पण टिळकांमध्यें जे महाराष्ट्राचे गुरुपण सांठविलें होतें तें त्यांच्यांत गीतारहस्यासारखे ग्रंथ निर्माण करण्याचें सामर्थ्य होतें म्हणून सांठविलेलें नव्हतें तर, केसरी-मराठा ह्या संस्थेच्या द्वारें त्यांनीं महाराष्ट्रांत व महाराष्ट्राबाहेरहि जें लोकजागृतीचें कार्य उत्पन्न केलें, पसरविलें व वाढविलें त्या कार्यांत त्यांचें गुरूपण होतें म्हणून. अर्थात् गुरूचें मूलपीठ केसरी-मराठा ही संस्था होय. ही टिळकांच्या संकटकाळीं तर केळकरांनीं जगविली व वाढविली, पण टिळकांनंतर अनेक संकटाशीं झुंज देऊन जगविली व इतकेंच नव्हे तर टिळकांच्या संकटप्रसंगीं लोकांनीं जें त्यांना निरपेक्षबुद्धीनें साहाय्य केलें होतें तें लोकांचें साहाय्य लोकांना सव्याज परत करून टिळकांनीं लोकांच्या ऋणांतून मुक्त केलें आणि केसरी–मराठा ही संस्था पूर्वींप्रमाणेंच सरकारविरोधी तीव्रतर ठेऊनहि अधिक कार्यक्षम ज्यानें ठेविली त्यानें गुरूचें मूळपीठ कायम राखलें असेंच म्हणावें लागेल. आणि अशा प्रकारें गुरूपीठ जो कायम राखतो तोच खरा शिष्य म्हणविला जातो.....

..... टिळकांनीं स्वतःचा काळ स्वतः निर्माण केला त्यांत केळकर वाढले. हा टिळकांत आणि केळकरांत म्हणजे गुरूंत व शिष्यांत फरक आहे हें विसरून चालतां येत नाहीं. यामुळें टिळक परिस्थिति उत्पन्न करणारे ठरतात. आणि म्हणूनच केळकरांत पालनकर्त्यांची वृत्ति अधिक जागृत झाली. टिळकांइतकेच केळकरांना निंदक भेटले; पण केळकरांनीं फारच थोड्या निंदकांना उत्तर दिलें असेल. बहुतेक निंदकाकडे ते ढुंकूनहि पहात नाहींत आणि आपल्या मार्गापासून च्युतहि होत नाहींत. हा गुण पालक बुद्धि जागृत असणारांतच असतो. म्हणून टिळकांच्या पीठाचें पालनपोषण हाच केळकरांच्या टिळक–निष्ठेचा व टिळक-कार्य पार पाडण्याचा विशेष......

......लोकमान्यांचें कार्य अनेक निंदा व असह्य आपत्ति सहन करून निष्ठापूर्वक त्यांनीं पार पाडलें.......

## टिळकांचे ज्ञानी अनुयायी

( लेखक—श्रीयुत के. ल. ओगले, बी. ए. )

......१८९७ सालच्या वावटळीच्या प्रसंगीं केसरीचें सूत्र खंड न पडतां जसेंच्या तसें चालू टेवण्याचें कार्य करून केळकरांनीं त्या अल्पावधींतहि टिळकां-पासून जी शाबासकी मिळविली ती टिळकांच्या पश्चातहि अनेक पटीनें अधिक अशी केसरीच्या वाचक वर्गाकडून त्यांनीं मिळविली आहे आणि चतुरस्र विद्वत्ता, भाषाप्रभुत्व, प्रसंगावधान, उद्योगप्रियता, मनमिळाऊपणा, सहनशीलता इत्यादि गुणांची जोड त्यांना मिळाल्यामुळें त्यांचें कार्य महाराष्ट्रांतील प्रचंड जनसमूहाला उद्बोधक, मार्गदर्शक व स्फूर्तिदायक झालें आहे. केळकरांचे केसरींतील विशिष्ट लेख वाचतांना आपणाला टिळकांचें विस्मरण होतें असें मनःपूर्वक म्हणणारे वाचक अनेक दृष्टीस पडतात. केळकरांच्या संपादकीय कर्तृत्वाच्या उच्चपणाचें प्रमाण याहून काय पाहिजे ! पण केळकर टिळकांचे अंधभक्त नाहींत ही गोष्ट त्यांनीं लिहि-लेलें लोकमान्यांचें चरित्र वाचल्यास सहज दिसून येईल. महत्त्वाच्या बाबतींत मतभेद झाल्यास टिळकांचीहि मुर्वत न धरतां आपलें म्हणणें त्यांनीं स्पष्टपणें सांगून स्वत्व राखिल्याचींहि कित्येक उदाहरणें आहेत. तात्पर्य, केळकर म्हणजे टिळकांची केवळ छाया नसून विशेषतः राजकीय चळवळीच्या दृष्टीनें टिळकाचें धोरण बहुतेक अंशीं मान्य असलेले व म्हणून तें मनःपूर्वक चालविणारे पुढारी होत. टिळक बुद्धिमान् व विद्वान् होते तसे केळकरहि बुद्धिमान् व विद्वान् आहेत. दोघांच्या बुद्धिमत्तेचीं व विद्वत्तेचीं क्षेत्रें सर्वथैव एक नाहींत एवढेंच. सामाजिक सुधारणेसंबंधानें दोघांमध्यें फारसा मतभेद नाहीं; पण टिळक सामाजिक सुधारणां-चा पुरस्कार स्पष्टपणें व चळवळीसाठीं करीत नसत, केळकरांनीं तो स्पष्टपणें व चळवळ म्हणून थोडा तरी केला आहे. टिळकांची शास्त्रीय व तत्त्वज्ञान विषयक वाङ्मयाकडे ओढ असे, केळकरांची साहित्यवाङ्मयाकडे आहे. थोडक्यांत सांगाव-याचें तर केळकर हे टिळकाचें साहाय्यक असे ज्ञानी अनुयायी होत, अंधभक्त नव्हत......

[ 'लोकमान्य' मुंबई ]

## न्यायदीप नरसिंह चिंतामण केळकर

( लेखक—' केळकरांचा अनुयायी ' )

......लोकांना जेव्हां तात्यासाहेब अध्यक्ष पाहिजे असतात तेव्हां त्यांना वाटत असतें कीं न्याय व्हावा, व तो केळकर जितका सूक्ष्मपणानें कांटेतोल व विवेचक

बुद्धीनें देतील तितका महाराष्ट्रांत दुसरा कोणीहि देणार नाहीं ! व ही गोष्ट अगदीं खरी आहे. तात्यासाहेबांच्या इतकें कुशल सभानायकत्व अंगीं असणाऱ्या व्यक्ती हिंदुस्थानांत खरोखर हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्याच आहेत ही गोष्ट राजकारणाच्या निमित्तानें हिंदुस्थानांत फिरलेले अनेक लोक सांगतात. न्यायाधीश ज्याप्रमाणें कोर्टांत दाव्याचा निकाल करितांना दोन्ही पक्षांच्या कबुल्या अगर 'मान्य' गोष्टी आपल्या मुठींत पक्क्या ठेवून वादाचा मुद्दा संकुचित करितो त्याप्रमाणें, वाद मुख्य मुद्द्यावर रोखून धरून, पक्षोपपक्षांना तात्यासाहेब खुशाल त्यावर रण करूं देतात. यावेळीं पर्वताप्रमाणें त्यांची गंभीर शांति पाहण्यासारखी असते. हल्लीं सभा वाटेल तितक्या भरतात. पण केळकर अध्यक्ष असलेली सभा व इतर सभा यांत नेहमीं तफावत पडते व हजारों लोकांच्या जाहीर सभेंत केळकर अध्यक्षस्थानीं बसले कीं जणूं कांहीं सदसद्विवेकबुद्धिच स्वस्थानीं विराजमान झाल्याप्रमाणें ती सभा अत्यंत टापटिपीनें व व्यवस्थित पार पडते. अशा कित्येक परिषदा लोकांनीं पाहिल्या असतील कीं त्यांत प्रतिपक्षी वादाच्या हातघाईवर आले असतां केळकरांची वृत्ति शांत, गंभीर व स्मितयुक्त असते. वादांत सामान्य मनुष्याच्या दृष्टीवर विकारवशतेचें अभ्रपटल येऊं शकतें त्यावेळीं केळकरांच्या होकायंत्रासारख्या सूक्ष्म व चंचल दृष्टीला ध्येयाचा उत्तरध्रुव स्पष्ट दिसत असतो. याचीं दोन चार उदाहरणेंहि सांगतां येतील. १९२० सालीं मॉंटेग्यू-सुधारणानंतर सोलापुरास विसावी प्रांतिक परिषद झाली. ती इतकी महत्त्वाची होती कीं, तिला अमृतसरच्या कॉंग्रेसचीच दुसरी आवृत्ति म्हणतां येईल. त्यांत एकीकडे लो. टिळक व अनेक महाराष्ट्रीय पुढारी असा झाडून अवघा राष्ट्रीयपक्ष व दुसरीकडे मिसेस बेझंट, चंदावरकर, डॉ. रघुनाथराव परांजपे इत्यादि धुरंधर नेमस्ताग्रणींच्या नेतृत्वाखालीं नेमस्तपक्ष सज्ज होता. सुधारणांच्या प्रश्नावर नुसती खडाजंगीच झाली असें नव्हे तर, नेमस्त व ब्राह्मणेतरांनीं मारामारी करून दुसरी 'सुरत' करण्याचाहि प्रयत्न केला ! ! पण तात्यासाहेबांनीं इतक्या खंबीरपणानें ती सभा यशस्वी पार पाडली कीं, ती सभा पाहिलेल्या विरोधी पक्षाच्या लोकांच्या तोंडूनसुद्धां धन्योद्गार निघाल्याशिवाय राहिले नाहींत. मुख्य ठरावावर भाषणें करितांना सर्व वक्त्यांना अध्यक्षांनीं फक्त दहा मिनिटांचा अवधि दिला होता. त्याप्रमाणें मिसेस बेझंट यांनीं दहाच मिनिटांत उत्कृष्ट भाषण केलें. नंतर लो. टिळक उभे राहतांच त्यांना केळकरांनीं वेळ सांगितली व हातांत घड्याळ धरून ठेवून दहा मिनिटें झाल्याबरोबर लगेच घंटा वाजविली ! केळकर अध्यक्ष झाले म्हणून त्यांनीं टिळकांनाहि भाषण थांबविण्याची इशारत द्यावी हें राष्ट्रीय पक्षांतील कांहीं पुढाऱ्यांस आवडलें नाहीं; पण स्वतः टिळकांना या गोष्टीचें कांहीं वाटलें नाहीं हीहि गोष्ट तितकीच खरी. ठरावावर मतें घेतांना हात वर झाल्यावर राष्ट्रीय पक्षाचेंच बहुमत आहे ना ! असें रँगलर परांजपे यांना विचारून त्यांनीं कबूल केल्यावर नंतर अध्यक्ष केळकर यांनीं तसा निर्णय दिला. तात्पर्य, या आणीबाणीच्या प्रसंगीं

सभा चालविण्यांत अमुक एका बाबतींत ‘ अन्याय ’ झाला असें कोणालाच वाटलें नाहीं. परिषद संपल्यानंतर ॲनी बेझंट यांनीं केळकर यांच्याशीं मुद्दाम हस्तांदोलन करून त्यांच्या “ शांतपणानें सभा पार पाडण्याच्या कौशल्याबद्दल ” तारीफ केली व न्या. चंदावरकर केळकर यांना म्हणाले कीं “ या एकाच गोष्टीवरून हिंदी लोक स्वराज्याला पात्र आहेत असें मी म्हणेन ! ” केळकरांहि चंदावरकरांना हंसून म्हणाले–“ आम्ही स्वराज्याला अपात्र आहों असें आम्ही म्हणालों होतों कधीं ? ”......

......तात्पर्य, सभानियमकत्वाला लागणारा निःपक्षपातीपणा हें केळकर यांचें ब्रीद आहे. याला लागणारे अनेक बहुमोल गुण तात्यासाहेबांच्या अंगीं वसत होते म्हणूनच असेंब्लीच्या अध्यक्षपदाकरितां पंडित मोतीलाल नेहरू यांनीं, केळकर यांचा पंडितजींशीं मतभेद होता तरीहि, विठ्ठलभाई पटेल यांचेऐवजीं प्रथम केळकर यांचेंच नांव सुचविलें होतें ही गोष्ट प्रसिद्ध आहे. न्यायदीपाची ज्योति अशीच प्रदीप्त राहो ! सभानियामकत्व ही एक केळकर यांच्या अंगच्या न्यायकौशल्याची बाजू आहे इतकेंच. पण त्यांची न्यायबुद्धि इतकी व्यापक आहे कीं खाजगी अगर सार्वजनिक अशा तात्यासाहेबांच्या हरएक कार्यांचें ती अधिष्ठान आहे. तात्यासाहेबांच्या समक्ष कोणी दुसऱ्यावर गैरहजिरींत टीका करूं लागला तर निश्चित समजावें कीं तात्यासाहेब त्याचा कैवार घेणारे किंवा त्याच्या वतीनें त्याची योग्य बाजू पुढें मांडणारे आहेत ! राष्ट्रीय पक्षांत जेव्हां कोणी गोखल्यांची निंदा करीत तेव्हां तात्यासाहेबांनीं अनेकदां गोखल्यांची योग्य बाजू पुढें मांडली आहे. न्यायनिष्ठुर मनुष्य निस्पृह असावा लागतो. पद्मपत्र ज्याप्रमाणें पाण्यापासून अलिप्त असतें त्याप्रमाणें अत्यंत निराभिलाष रीतीनें सार्वजनिक पैशाबद्दल ज्यांनीं वर्तन केलेलें असतें त्यांची वाणी खऱ्या नाण्याप्रमाणें खणखणीत वाजते. श्री. केळकर यांची भावना अशी निस्पृह व कडकडीत निराभिलाषाची आहे याकरितांच अनेक संस्थांचे ते आज ट्रस्टी आहेत, व लो. टिळकांना जनतेच्या कर्जांतून मुक्त करण्याकरितां परवां नुकताच जो केसरी संस्थेतर्फे त्यांनीं तीन लाख रुपयांचा ट्रस्ट केला तो केळकर यांच्या या बहुमोल गुणाचा पुरावाच होय ! खासगी व सार्वजनिक आयुष्यांत हें जें चारित्र्य आज सतत पसतीस वर्षे केळकर यांनीं प्रगट केलें त्यामुळें खरोखरच हा एक ‘ न्यायदीप ’ तेवत आहे अशी लोकांची भावना असल्यास नवल नाहीं. दीर्घायुष्य व उदंड आरोग्य यांच्या स्नेहानें परमेश्वरकृपेनें हा ‘ न्यायदीप ’ असाच अनेक वर्षे तेवत राहून आपल्या प्रकाशज्योतीनें महाराष्ट्र प्रकाशित ठेवो एवढीच आजच्या शुभ प्रसंगीं लेखकाची परमेश्वरास प्रार्थना आ

[ ‘ऐक्य’

४६०८

REFBK-0004608

# केसरी-प्रबोध

म्हणजेच

## पन्नास वर्षांचा संक्षिप्त केसरी

**किंमत जानेवारी ता. ३० पर्यंत रु. १-१२-० ट. ह. ८१३**

'केसरी' म्हणजेच अखिल महाराष्ट्र होय. गेल्या ५० वर्षांतील महाराष्ट्रमधील विद्वान् व कार्यकर्त्यांची ओळख करून घ्यावयाची असेल; महाराष्ट्रांतील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व वाङ्मयविषयक वगैरे सर्व चळवळींचा उगम, हालचाल व प्रगती ध्यानीं आणावयाची असेल; ऐतिहासिक राष्ट्रीय उत्सवांनीं केलेली जागृती तसेंच सरकारच्या दडपशाहीनें वृत्तपत्रें, वक्ते, लेखक, ग्रंथकार इत्यादिकांवर केलेला जुलूम पहावयाचा असेल; एकंदरींत गेल्या अर्धशतकाचा महाराष्ट्राचा यथातथ्य इतिहास पुढील पिढीस जर समजून घ्यावयाचा असेल तर 'केसरी-प्रबोध' हाच एक ग्रंथ वाचावा. केसरीच्या अडीच हजार अंकांवरून निरनिराळ्या अधिकाऱ्यांनीं ९५ लेखांत ते ते विषय सुबोध व उद्बोधक रीत्या मांडले आहेत. ग्रंथाचीं पृष्ठें ९२५ पण किंमत रु. २। आहे. ट. ह. ८१३.

पत्ता—सेक्रेटरी श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स,

शनवार पेठ, पुणें नं. २.